
# ईशावास्योपनिषद्



डॉ वसुधा विनोद देव

# ईश उपनिषद्

## डॉ. वसुधा विनोद देव

**सहयोगी प्राध्यापक व**

**समन्वयक स्वामी चिन्मयनानंद अभ्यास केंद्र ,**

**शासकीय अध्यापक महाविद्यालय, अकोला.**

ISBN : 33-978-93-8401-15-1

http//:www./chinmayasanskar.com
ह्या पुस्तकातील मुळ लेखांचा स्त्रोत
http//:www./facebook.com/sadaphuli/

**सुनंदा प्रकाशन क्रं. ३३, (ISBN : 33-978-93-8401-15-1)**

# ईश उपनिषद

**लेखक :**
डॉ. वसुधा विनोद देव, ०९४२२९५९७६४
३ चिन्मय, शंकर नगर,
घाटोळ लेआउट, जठारपेठ, अकोला. ४४४००५
श्री. विनोद दत्तात्रय देव ०९४२२९५९७६३

(सर्व हक्क सुरक्षित)

**प्रकाशक :**
श्री. मनीष शांताराम बुटे
सुनंदा प्रकाशन
राजेश्वर अपार्टमेंट, जलाराम शाळेजवळ,
तापडिया नगर, अकोला.
दूरध्वनी :- ०७२४-२४२१२९९
भ्रमनध्वनी :- ०९४२२९२०२२५


**आवृत्ती पहिली : दि. २१ मे २०१८**

**अक्षर रचना :**
संजय आर. अन्नदाते
चिराग ग्राफीक्स, जठारपेठ,अकोला.
९८५०६४७९९२

**मुद्रण :**
किर्ती प्रिंटर्स, जुना कॉटन मार्केट,
अकोला. मो. नं. ९४२२८९३१६५

**मुल्य :**
रु. १५०/-

# अर्पण पत्रिका



**मेरे जीवन के निर्माण की**
**तुम सुंदर अभिव्यक्ती हो.....**

## प.पू. श्री दिढे मामा...
## ह्यांचे चरणी समर्पित



# चिन्मय सदाफुली
# (डॉ. वसुधा विनोद देव)

सहयोगी प्राध्यापक व

समन्वयक स्वामी चिन्मयनानंद अभ्यास केंद्र ,

शासकीय अध्यापक महाविद्यालय, अकोला.

**अध्यापनाचा अनुभव –२८ वर्ष**

**शिक्षण:–** M.COM, M.A. (MARATHI,ECONOMICS,SUBJECT COMMUNICATION), M.ED. PhD.

**प्रकाशन;–**

१.एकूण १२ पुस्तके प्रकाशित

२.एका पुस्तकाला उत्कृष्ट पुस्तक पुरस्कार

३.दोन पुस्तके शासनमान्य

४.एका पुस्तकाचा अमरावती विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात समावेश

५.एकूण २०० लेख प्रकाशित

६.जागतिक आंतरराष्ट्रीय राज्यस्तरीय चर्चा सत्रात सक्रिय सहभाग

७.२०१४ मध्ये अथेन्स ग्रीस येथे जागतिक तत्वज्ञान परिषदेत "SWAMI CHINMAYANAND ON RELIGION" ह्या विषयावर व्याख्यानाला आमंत्रित

८. हा जागतिक स्तरावरील पहिला प्रबंध मानव संसाधन विकास मंत्रालयाकडून

९.विद्यापीठ अनुदान आयोगामार्फत शासकीय अध्यापक महाविद्यालयात स्वामी चिन्मयनानंद अभ्यास केंद्राची स्थापना

१०.स्वत: ची वेबसाईट www.chinmaysanskar.com

११.चिन्मय मिशन ची सक्रिय कार्यकर्ती

१२.संतगाडगेबाबाअमरावती विद्यापीठ अमरावती येथे Ph.D ची मार्गदर्शक एकूण ५ विद्यार्थ्यांना Ph.D प्राप्त

# मनोगत

ईशा वास्य ईदम सर्वम, ह्या श्लोकांचे अगदी लहानपणापासून मला उत्सुकता होती,,हे सर्व जगत ईश्वराने व्यापले आहे,,म्हणजे काय??ईश्वराने जर जग आच्छादले आहे तर हे आच्छादन दिसत का नाही??ते लोकांना का दिसत नाही?? ईश्वराच्या प्राप्तिकरिता लोक किती विविध कृती करतात? कुणी उपासना करतय ,कुणी पूजा करतय,,कुणी ध्यान धारणा करतय,,तर कुणी दान करण्यात सेवा करण्यात ईश्वराचे अस्तित्व मानतय,,,मग नेमके खरे काय आहे??बर ईश्वरही म्हणावा तर एक नाही व्यक्ती तितक्या देवता आहेत,,,मग नेमक्या कोणत्या देवतेची उपासना करावी??मुळातच उपासना करावी की भक्ती?? कुणी तर कर्मकांडात खूप गुरफटलाय,,,, नेमके काय करावे??आणि कशासाठी??मला नेमके काय हवंय??आणि ते मला कोण सांगणार??अनेक प्रश्नांची डोक्यात अक्षरशः काहूर माजविले होते,,,आणि त्या सर्व प्रश्नांची उत्तरे देणारा एकाच ग्रंथ आहे आणि तो म्हणजे ईशा वास्य उपनिषद,,,हे प पू स्वामी पुरुषोत्तमानंदानी केवळ सांगितलेच नाही तर त्याचे संस्कारही मनावर केले,,सर्व संशय दूर झाले,,आणि सर्व कसे एकदम लख्ख दिसायला लागले,,,

उपनिषद तत्त्वज्ञानातील हा अत्यंत महत्वाचा ग्रंथ,,,ह्या ग्रंथावरील हे निरूपण आपल्या हाती देताना मला अत्यंत आनंद होतोय कारण हा माझ्या स्वामीजींचा कृपा प्रसाद आहे,,,,ह्यातील राहिलेल्या त्रुटी ह्या माझ्या अल्प मतीचे निष्पत्ती आहे व ह्यातून आपणास ज्या ज्या उदात्त बाबी मिळतील तो माझ्या स्वामीजींचा कृपाप्रसाद समजून आनंदाने ग्रहण करावा ......

हरिओम ......

*** चिन्मय सदाफुली ***
**(डॉ. वसुधा विनोद देव,)**
**सहयोगी प्राध्यापक ,**
शासकीय अध्यापक महाविद्यालय, अकोला.

# ईश उपनिषद – १

हरिओम ,सुप्रभात,,,गुढीपाडव्याच्या सर्वांच्या ठायी असणाऱ्या चैतन्य तत्वास प्रणाम करते,,,उपनिषदांचे अंतरंग ही नवीन मालिका सुरू करताना मला अतिशय आनंद होतो,,,उपनिषदांचे अंतरंग ह्या शीर्षकाखाली ह्या संपूर्ण वर्षात विविध उपनिषदांचे माझा अभ्यास व्हावा हा माझा नवीन वर्षाच्या निमित्ताने केलेला संकल्प,,ह्यात सर्वप्रथम ''ईशावास्य उपनिषदांचे अंतरंग '''चा अभ्यास मला करायचा आहे,,भारतीय तत्वज्ञानात अनन्य स्थान प्राप्त झालेले उपनिषदे हे मानवी जीवनाच्या विकासाची गुरुकिल्ली आहे,,मानवी व्यक्तिमत्वाचा विकासाचे शास्त्रशुद्ध ज्ञान आपल्याला प्राप्त करावयाचे असेल तर आपणास उपनिषद कडेच वळावे लागेल,,,




मानवी जीवनाचे अतिशय शास्त्र शुद्ध विवेचन उपनिषदात आपणास पहावयास मिळते,,एक गोष्ट महत्वाची की आपणच आपणास प्रश्न विचारला की ''मी जीवन का जगतो??''आहे तर आपल्याला उत्तर मिळेल की ''मला सुख हवे आहे ,आनंद हवा आहे आणि शांती हवी आहे,'',आणि ह्याचसाठी मी आयुष्यभर धडपड करतो आहे,,पण ते मला कुठेही मिळत नाही ,आणि मी कायम दुःखी अशांत असतो,,

ह्याच्या कारणांचा शोध घेतला तर लक्षात येईल की ज्या ज्या गोष्टींवर माझे सुख अवलंबून आहे त्या सर्व गोष्टी विनाशी आहेत ,,सापेक्ष आहेत


,अशा वस्तूंपासून मला अविनाशी सुख मिळणार कसे??अविनाशी आनंदासाठी मला अविनाशी वस्तूंचाच शोध घ्यावा लागेल,,

मग हा शोध कसा घ्यावा??कुठे घ्यावा??का घ्यावा??ह्यासाठी कोणत्या पद्धतीचा अवलंब करावा??आणि सर्वात महत्वाचे की त्यासाठी मला माझ्या व्यक्तिमत्वाची जडणघडण काशी करता येईल??मला माझ्या व्यक्तिमत्वाचे ज्ञान कसे प्राप्त होईल हे सर्व प्रश्न महत्वाचे ठरतात,,मग ह्या साठी आपणास आपलेच खरे प्रतिबिंब दाखविणाऱ्या शास्त्रकडे वळावे लागते,,आणि ते म्हणजे उपनिषद,,,,,,हरिओम,,,

# ईश उपनिषद – २

उपनिषदांचे तत्वज्ञानाकडे वळण्यापूर्वी आपण उपनिषद ह्या शब्दाचा अर्थ पाहिल्यास त्याची उपयुक्तता लक्षात येते,,उपनिषद ह्या शब्दात तीन शब्द आहेत,,

उप ह्याचा अर्थ स्रेष्ठ व्यक्ती, तत्व ,ह्याच्या जवळ बसणे,, जीवनाची




उन्नती प्रगती साधायची असेल तर आपणास अशाच व्यक्तीच्या तत्वाच्या सहवासात रहावे लागेल जीने खऱ्या अर्थाने जीवनाची प्रगती उन्नती साधली आहे,,

नि म्हणजे नेणे,,, कुठे नेणे??कोणी नेणे?ही प्रश्न ह्या संदर्भात महत्वाचे ठरतात,,ह्यावर तत्वज्ञान उत्तर देते

असतो मा सद्गमय,,,अर्थात असत्यकडून सत्याकडे,,,

तामसो मा ज्योतिर्गमय ,,,म्हणजेच अज्ञानाचा अंधकारकडून

ज्ञानप्रकाशकडे नेणे,,,

मृत्यूर्मा अमृतमगमय ,,,अर्थात क्षणिकाकडून शाश्वत तत्वाकडे नेणे,,

षद शब्दाचा अर्थ आहे पकड शिथिल करणे,,अर्थात जीवन जगत असताना आम्ही कोणत्या ना कोणत्या बंधनात अडकलेले असतो आणि ह्या बंधनातून सुटणे हा आमच्या परमार्थाचा उद्देश असतो,,,ही बंधने

कोणती असतात??

आपल्याला माहीत आहे की आपल्याला जीवन मरणाच्या चक्रातून सुटका हवी असते,,पण हा उद्देश जरी असला तरी ही सुटका आपल्याला कळते का??


आपल्या जीवनात कायम अशांती असते ,,ह्यातून आपल्याला सुटका हवी असते,,

आपल्या जीवनात कायम अस्थिरता असते ह्यातून आपल्याला सुटका हवी असते,,,

उपनिषदाच्या अभ्यासच करायचा तो ह्या मुक्तीसाठी,,,ह्या शिथिलीकरणासाठी,,,,आपल्या लक्षात आलेच असेल की उपनिषद चा अभ्यास हा आपल्या जीवनाला उन्नत दिशेने घेऊन जातो,,आपल्याला केवळ आनंद तर देतोच पण आपल्याला सुखरूप होण्याचे दालन खुले करून देतो,,आणि आपल्या जीवनाला स्थिरता प्रदान करतो.

# ईश उपनिषद – ३

उपनिषदांचे अंतरंग,, ईशावास्य उपनिषद भाग ३:-दि २१मार्च १८ ,,ऊचिन्मय पुरुषोत्तम,,,हरिओम सुप्रभात मित्रानो,,,उपनिषदांचे ग्रंथलेखक कोण हा विचार केल्यास हे ग्रंथलेखक अज्ञात आहेत,,पण ''तेन प्रोक्तम,''ह्या उक्तीनुसार ते 'प्रोक्त' आहेत 'कृतम' नव्हेत,, असे म्हटले




जाते की वेद हे ईश्वराचा श्वास आहेत,,ह्याचाच अर्थ वेदांची निर्मिती ही दिव्य ग्रंथ कर्त्यांची अत्यंत नैसर्गिक व सहज कृती आहे,,प्रत्येक वेदांचे मंत्र ,ब्राह्मण आणि उपनिषदे असे तीन भिन्न विभाग आहेत,,हे वेद ग्रंथाचा शेवटचा भाग म्हणून ह्यांना वेदांत ही म्हटले जातं,,

सत्य तत्वाची संकल्पना समजण्यासाठी ती एक विशिष्ट शैलीने अभिव्यक्त झाली आहेत,,,ईशावास्य उपनिषद हे शुक्ल यजुर्वेद संहितेचे शेवटचे प्रकरण आहे,,पण हे साहितेचाच एक भाग आहे,,हे मंत्रोपनिषद आहे कारण हे उपनिषद काव्यबद्ध आहे,,

सदर उपनिषदात सात तरंग आपणास आढळतात ,,१८ श्लोक असणारे हे उपनिषद म्हणजे मानवी जीवनाच्या विकासाचा एक क्रम मार्ग ठरतो,,आणि हा क्रममार्ग मानवाला सत्यातत्वचे आकलन व प्रचिती घडवून आणतो,,

पहिलातरंग म्हणजे पहिला मंत्र ज्यात वैराग्याबाबतसुंदर विचार मांडला

आहे,,

दुसऱ्या मंत्रात दुसरा तरंग आढळतो ज्यात सत्यतत्वाचे आकलन होण्यासाठी कर्ममार्गाचे विवेचन करण्यात आले आहे,,

तिसरा तरंग अर्थात तिसरा श्लोक ह्यात ज्ञानमार्ग कर्म मार्ग नकारल्यास कसे दुःख भोगावे लागते ह्याचे विवेचन आहे,,

चौथा तरंग अर्थात चौथा श्लोक ते अथवा श्लोक ह्यात आंतरिक आनंदी जगतात जीवन कसे व्यतीत करावे ह्याबाबत चे मार्गदर्शन आढळते,,


पाचवा तरंग हा श्लोक क्रमांक ९ ते १४ मध्ये आढळतो व ह्यात प्रामुख्याने ज्ञान व कर्म मार्ग हातात हात घालून कसे चालवण्यास हवेत ह्याचे मार्गदर्शन आहे,,

सहावा तरंग हा श्लोक क्रमांक १५ ते १७ मध्ये आत्मसाक्षात्काराच्या आनंदासाठी आत्मतत्वाने प्रसन्न असावे हे विवेचन आढळते

तर शेवटचा तरंग हा १८ व्या श्लोकात आपणास पहावयास मिळतो,,ह्यात आत्मविकासाच्या सहाय्यर्थ परमेश्वराची प्रार्थना केलेली आहे,,,अतिशय सुंदर असणाऱ्या उपनिषदाच्या अंतरंगात आपण उद्या प्रवेश करणार आहोत.

# ईश उपनिषद – ४

कोणत्याही उपनिषदाची सुरवात ही शांतीपठाने झाली आहे,,गुरू शिष्य संवाद प्रश्नोत्तरे सुरू होण्यापूर्वी शांतीपाठ म्हणणे ही उपनिषदाच्या अभ्यासाची पद्धत आहे किंबहुना आपण त्याला उपनिषदाच्या अभ्यासाची मानसिक पूर्वतयारी पण म्हणू शकू,,




कोणतेही अध्ययन करण्यापूर्वी शिष्यांची मानसिक तयारी असणे खूप गरजेचे असते,,आणि हा शांतीपाठ म्हणजे जणूकाही स्वरूपाची ओळख सुरवातीलाच स्वतः ला करून देण्यासाठी आहेत असे म्हटले तरी वावगे होणार नाही,,

हा शांतीपाठ आपण वाचला तर शब्दशः खूप अनर्थ होईल करण गणिताचे अभ्यासक हे असे काही सूत्र आहे हे मान्य करणार नाही,,ह्या शांती पाठात असे नमूद केले आहे की

‘‘ते पूर्ण आहे,हे पूर्ण आहे,पुर्ण तुनच पूर्ण निर्माण होते आणि पूर्ण तून पूर्ण वजा केले तर पूर्णच शिल्लक राहते,,,‘‘‘

हे तत्वज्ञानात्मक भाष्य आहे,,आणि ह्यात दोन घटकांचे परस्परांचे काय नाते आहे ते वर्णन केले आहे,,ते दोन घटक म्हणजे सीमित आणि असिमीत तत्व,,,जे नामरूपात्मक आहे ते सीमित आहे,,आणि ह्या नामरूपात्मक जे जे काही अधिष्ठान आहे ते असिमीत आहे,,आणि ह्या असिमीत तत्वबाबत उपनिषद विचार करते,,


उपनिषदात ह्या अमर्याद तत्वचेच निर्देशन केले आहे,,जीवनाबाबतचे जे चुकीचे आकलन आपले आहे त्यामुळे आपल्या जीवनात दुःख आहे,,हे चुकीचे आकलन म्हणजे मी स्वतः ला नामरूपात्मक जगात स्वतःला सीमित केले असते,,आणि ह्या संकुचित पणाचा परिणाम म्हणजे आयुष्यात दुःखाची निर्मिती,,,

एक नियम असा आहे की जे बदलणारे अस्थिर तत्व असते त्याचे अधिष्ठान कायम स्थिर स्वरूपाचे असते,,हाच नियम ह्या जगताला आणि पर्यायाने मानवी जीवनाला लागू आहे,,जे बदलते आहे त्यालाच जग म्हणतात,,परिवर्तन हे सतत सुरू आहे पण ह्या परिवर्तनीय तत्वाचे अधिष्ठान जे अपरिवर्तनीय तत्व आहे ते नित्य शाश्वत आहे सनातन आहे,,

मग ते काहितरीसर्वभौम तत्व असायला हवे,,आणि त्यालाच उपनिषदांनी ब्रह्म तत्व चैतन्य तत्व असे नाव दिले,,,समष्टीच्या स्तरावर ब्राह्मतत्व व व्यष्टी स्तरावर आत्मतत्त्व ,,,असा एकदा निर्णय झाला की पुढचे सूत्र सोपे जाते.

# ईश उपनिषद – ५

संपूर्ण जगाताचे अधिष्ठान रूप जे ब्राह्मतत्व आहे ते सार्वभौम असून अमर्याद आहे व नामरूपाशी ऐक्य पावल्यामुळे ते संकुचित वाटते पण मूळ स्वरूपात ते ह्या अमर्याद तत्वचेच प्रगटन होय आणि म्हणूनच जे जे अधिष्ठान ते ते पूर्ण आहे व जे जे नामरूपात्मक आहे ते ही पूर्ण आहे,,,




अशा ह्या अमर्याद पूर्ण तत्व असणारें ब्रह्म तत्वच पूर्ण असणाऱ्या आत्मतत्वाच्या रुपात प्रगट होते म्हणजेच एक पूर्ण तत्वपासून दुसऱ्या पूर्ण तत्वाचे प्रगटीकरण होते,,म्हणजेच अमर्यादित तत्वातून जरी मर्यादित तत्वाची प्रगटीकरण झाली असली तरी निर्माण झालेली वस्तू दूषित होत नाही आपले स्वरूप बदलत नाही,,मूर्तचा उदय झाला पण अमूर्त कुठेही बदललेले नाही,,म्हणजेच अमर्याद तत्वातून चैतन्य मर्यादित तत्वात आल्यावरही त्यात काहीही परिवर्तन झालेले नाही,,आणि म्हणूनच ह्या अमर्यादित पूर्ण तत्वातून मर्यादित पूर्ण तत्व वजा केले तरी शिल्लक पूर्णच राहते,,समष्टी स्तरावर प्रगट झालेले ब्रह्मतत्व व्यष्टी स्तरावर आत्मतत्त्व म्हणून प्रगटते,,, पण त्यातील चैतन्य तत्व एकच आणि त्याचेही रूप पूर्णच,,,

आणि हेच चैतन्य चराचर सृष्टीत व्यापलेले आहे,,म्हणूनच पूर्ण तत्वात पूर्ण तत्व अधिक केले किंवा वजा केले तर शिल्लक पूर्ण तत्वाच राहत,,,पाण्यातून पाणी वजा केले तरी पाणीच राहणार,,,सुवर्णातून

सुवर्ण वजा केले तरी सुवर्णच राहणार आहे,,,हा जीवनाचा मूलभूत सिद्धांत आहे,,,आणि म्हणूनच मी अपूर्ण नाही पूर्ण आहे ही अनुभूती आहे,,,पण अपूर्णता जीवनात वाटत असेल तर ती जीवनाच्या चुकीच्या अकलनामुळे


ह्या ठिकाणी गणिताच्या शिक्षकांना विद्यार्थ्यांना हे गणित मानवणार नाही,,पण हे सत्याचे आकलन व साक्षात्कार जो ऋषींना झाला तो ह्या ठिकाणी व्यक्त केला आहे

शिवाय गुरू आणि शिष्याने ह्याठिकाणी आपल्या सत्य तत्वाशी एकरूप होण्याची आठवण स्वतः ला करून देत आहेत,,

मित्रानो ह्याठिकाणी तीन वेळा ओम शांती हा शब्द आला आहे,,पहिला शब्द हा अधिदैवीक अशांती शी निगडित आहे,,म्हणजेच असे अनेक नैसर्गिक संकटे येतात ज्यामुळे आपण विचलित होतो,,आधिभौतिक स्तरावर अशांती ही दुसऱ्या प्रकारची शांती होय,,आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या घटना ह्या आपल्याला विचलित करतात,,तिसरी अध्यात्मिक अशांती जी आपल्या अंतर्मनाशी निगडित आहे,,,ह्या तिन्ही स्तरावर अध्यानकर्त्याचे मन शांत असावे लागते,,,आता हा अध्ययनकर्ता म्हणजे केवळ उपनिषद पुरते मर्यादित नाही तर संपूर्ण जीवनातच मला शांती हवी असते ,,,मुळातच शांत असणे हे माझे मूळ स्वरूपच आहे,,ही सर्व अध्ययनाची पूर्व तयारी होय,,शांत मनातच सत्यातत्वचे आकलन व्यवस्थित होते,,,,

# ईश उपनिषद – ६

उपनिषदाचा पहिला श्लोक हा आपल्याला उत्कृष्ट साधनापद्धती शिकवितो,,,ईशावास्यम ईदम सर्वम,,,सर्व जगत स्वतः ईश्वराने व्यापलेले आहे,,हा शब्दशः अर्थ,,सर्वप्रथम ईश शब्दाचे विविध अर्थ आपण पहायला हवे,,त्याचसोबत माझे ह्या ईशाशी काय नाते आहे??माझे ह्या जगताशी काय नाते आहे??इत्यादी बाबींचा विचार महत्वाचा ठरतो,,,




हे संपूर्ण जग ईश्वराने व्यापले आहे ही ईश्वराची व्यापकता आहे हे आम्हाला मान्य असतेच ,पण ईश म्हणजे नेमके काय हा विचार केल्यास आपणासमोर सर्व व्यापकतेच्या दृष्टिकोनातून ब्रह्म हा पण शब्द येतो आणि ब्रह्म हे सर्वनाम असल्याने ते सर्वात आहे पण ते निर्गुणनिराकार आहे हे ही आम्हास माहीत असते आणि म्हणूनच ईशवरची परिभाषा मग आपल्यासाठी सुलभ होत जाते ,ती अशी की

ईश्वर म्हणजे सगुण साकार झालेले ब्रह्म,,,

आणि ब्रह्म म्हणजे निर्गुण निराकार ईश्वर,,,

किती छान ही एकदा विचारांची घडी पक्की झाली की ईश्वर आणि ब्रह्म एकच आहे हे आपल्याला आकलन होते,,आता ह्या सर्वात मी कोण हा प्रश्न उरतोच,,

मी माझा देह,,ह्याने किती जागा व्यापली विचार करा,,,फारच

थोडी,,,म्हणून मी अल्पव्यापी,,,

ईश्वराने हे सर्व जग व्यापले म्हणून तो सर्वव्यापी

पण ब्रह्म तर सर्वांना व्यापून उरते,,ते अधिक व्यापक,,

आता अल्पव्यापी सर्वव्यापी ह्यातील अल्प व सर्व हे शब्द गळून टाकले तर फक्त व्यापी हा शब्द राहतो आणि हा निरपेक्ष ठरतो ,आणि म्हणूनच

मी म्हणजेच ईश,,,, मी म्हणजेच ब्रह्म हा निश्चय ही महत्त्वाची साधना ठरते,,आणि मग ह्या संपूर्ण ब्राह्मन्ड त मीच व्यापून उरलो ही अनुभूती ठरते,आणि मग श्रद्धा बळकट होते,,


आपण एक शब्द व्यवहारात नेहमी वापरतो की ईश्वरच सर्व सृष्टीचा नियामक आहे,,माझ्यादृष्टीने विचार केला तर मी नियम्य ठरतो,,,म्हणजेच ह्या संपूर्ण जगाचे अनुशासन करणारा ईश्वर आहे आणि ह्या सर्व अनुशासनाचे पालन करणारा मी आहे,,,हा विचार पक्का झाला की मानवी जीवनातील कितीतरी समस्या दूर होतात,,,

माझे आयुष्य आणि इतरांचेही आयुष्य जर त्याच्याच नियमाने चालत असेल तर प्रत्येकाच्या जीवनात काय घडतंय का घडतंय ह्या प्रश्नांच्या चर्चा आपोआप बंद होतील,,,करण उत्तर असेल जे घडतंय त्याच्याच नियमाने आणि त्याने ठरविले म्हणून,,,मग इतरांवर आरोप प्रत्यारोप बंद होतील,,स्वतः किती निरपराध आहोत हे दाखविण्याची स्पर्धा संपेल,,आपल्याही आयुष्यावर फक्त त्याचेच नियमन आहे हे मान्य केल्यावर माझ्याच आयुष्यात असे का घडले हा प्रश्न त्रास देणार नाही,,,,

# ईश उपनिषद – ७

ईश हा नियामक आहे आणि मी नियम्य,,हा विचार जीवनाचे कितीतरी समस्या सोडविती,,,

ईश शब्दाचा आणखी एक अर्थ आपणास सांगता येईल की जो शरण्य आहे,,ज्याला अखिल चराचर सृष्टी शरण जाते तो शरण्य तो ईश,,,मग ह्या दृष्टीने विचार केला तर मी ईशाला शरण जात असेल तर मी शरणागत ,,,आणि मी जर शरणागत असेल तर मला ईश्वराचे सर्व निर्णय मान्य असायला हवे,,,माझ्या जीवनात ज्या ज्या घटना घडतात त्या त्या घटना त्या ईश्वराच्या मर्जीने घडतात हे एकदा मान्य करणे




हीच खरी शरणागती आहे,,,

आपण संतांचे जीवन पाहिले अवलोकन केले तर लक्षात येईल की त्यांच्या जीवनात घडणाऱ्या घटनेच्या संदर्भात त्यांची कोणतीही तक्रार नव्हती आणि अतिशय दुःखाचे प्रसंग आलेत तरीही ईश्वराचा प्रसाद ह्या दृष्टीने त्यांनी त्या प्रसंगकडे पाहिले,,कधीच तक्रार नाही उलट प्रत्येक प्रसंगानंतर त्यांची साधना अधिकच बळकट झाली,,ही ईश शरणागती आहे,,,

जे जे घडते ती ईश्वराची कृपा,,,ही जीवन दृष्टी पक्की झाली तर जीवनाच्या प्रत्येक क्षणावर फक्त त्याचाच अधिकार,,,आणि त्या ईशा कडे माझ्यासाठी काही नियोजन आहे आणि त्याच्याच नियोजनाने माझे

जीवन चालणार आहे ही धारणा पक्की होणे ही शरणागती आहे,,मग जीवनात तक्रार दुःख अशांती अस्थिरता ह्याला स्थान राहणार नाही,,,


ईश शब्दाचा अर्थ इतका व्यापक आहे,,,ईश्वर आहे का?असेल तर कोठे?त्याचे अस्तित्व काय??ह्या प्रश्नाला काही अर्थ राहत नाही,,,कुणाचा ईश्वरावर विश्वास असो अथवा नसो त्याचा ईश्वराच्या अस्तित्वावर काहीही परिणाम होत नाही,,,अशा ह्या ईश्वरीय सत्तेने हे ईदम म्हणजे हे सर्व नामरूपात्मक जगत व्यापलेले अच्छादलेले आहे,,,व्यापलेले आहे,,,

ईश्वरीय सत्ता सार्वभौम आहे हे ह्यातून आचार्यांना सुचवायचे आहे,,,ही व्यापक जीवन दृष्टी एकदा स्वीकारली की बऱ्याच बाबी सुलभ होतात,,,जीवनात अशांती अस्थिरता दुःख ह्याला थारा रहात नाही. ज्याप्रमाणे माझ्या जीवनाबाबत मी शरणागती पत्करली तशीच इतरांच्या जीवनाबाबत मी स्वीकारणे गरजेचे ठरते,,,म्हणजेच माझ्या जीवनात जसे सर्व ईश्वराच्या मर्जीने सुरू आहे तसेच इतरांच्या जीवनात घडणाऱ्या घटना ह्या ईश्वराच्या मर्जीने घडतात आहेत हा पण निर्धार पक्का होणे गरजेचे आहे,,त्यामुळे आपण जे कायम इतरांच्या आयुष्यात डोकावून त्यांना चुकीचे ठरवितो त्यावर जीवनातील कितीतरी मौल्यवान वेळ वाया घालवतो तसे घडणार नाही ,,,आणि जीवनात कितीतरी सुलभता येईल. कोणी काय म्हटले?? कोण कसे वागले??,,त्याचे वागणे योग्य की अयोग्य,???,कुणाला किती सुधारण्याची गरज आहे,,???ह्याला हे शोभले का??त्याला असे वागणे बोलणे शोभले का??असे कितीतरी विधानांना कात्री लागेल,,कारण आता त्या ठिकाणी ही मान्यता असेल की त्याच्या आयुष्यात घडणाऱ्या घटना ही ईश्वराचीच योजना आहे,,किती छान,,,जमेल,,,हीच तर कला शिकविते हा श्लोक,,,किती मोठी साधना आहे ही,,,ईशा वस्यामिदम सर्वम,,,,

# ईश उपनिषद – ८

ईश शब्दाचे विविध अर्थ आपण पाहिले,,ह्या श्लोकात अजून एक शब्द आला आणि तो म्हणजे जग,,,आपण नेहमी काही विधाने वापरतो की हे जग परिवर्तनशील आहे,,ह्या जगात काहीही सत्य नाही ,,ह्या जगात काहीही स्थिर नाही,,,

अगदी बरोबर,,हे जग परिवर्तनशील ,,असत्य,,आणि अस्थिर आहे,,,आता ह्यातील असत्य ह्या शब्दावर वारंवार खूप आक्षेप घेण्यात येतात,,अगदी आक्षेपांचा कळस म्हणजे असे म्हणणारेच थोतांड आहे,,‘‘‘आम्ही ह्या जगात राहतो जीवन जगतो ते जग असत्य कसे‘‘‘,,,,मित्रानो प्रत्येक संकल्पनांचे अर्थ आपल्या सोयीने लावता येणार नाही,,ते शास्त्र शुद्ध तर हवेच पण त्याच्यात युगानुकूल लवचिकता पण असावी पण त्यातील सत्यता अबाधित ठेऊन,,,ह्या सर्व प्रश्नांची उत्तरे आहेत न,,,ह्याच साठी जग ह्या शब्दाचा अर्थ जाणून घ्यावे लागेल ,,,




जग म्हणजेच जे गतिशील आहे ते,,जे परिवर्तनीय आहे ते,,,ह्या परिभाषेतच खर तर जगाचे स्वरूप काय ते लक्षात येते,,,पहिली परिभाषा लक्षात घेतली तर जग म्हणजे जे गतिशील आहे ,,,म्हणजे काय??एक साधा नियम आहे की ज्याला ज्याला म्हणून उपज आहे त्याचा नाश अटळ आहे,,,माउलींनी सुद्धा म्हटले आहे ,‘‘जे जे उपजे ते ते नाशे,,एरव्ही तत्वतः वस्तू दिसे ती अविनाशी‘‘‘,,,वस्तू निर्माण होते तिला तीन अवस्था

असतात

१)उत्पत्ती २)स्थिती आणि ३)लय ...


आणि ह्या तीन स्थितीमुळे त्या वस्तूला गती प्राप्त होते,,जगाची उत्पत्ती झाली तर त्याचा विनाश अटळ आहे,,,ह्याजगात उत्पन्न झालेल्या प्रत्येक वस्तूला ह्या अवस्था लागू आहेत,,,आणि ह्याच अर्थाने हे जग गतिशील आहे. आणि प्रत्येक अवस्थेत वस्तूचे रूप बदलत असते,,अगदी आपला व्यक्तीचा विचार केला तर जन्मापासून तर आतापर्यंत आपल्यात कितीतरी बदल झाला,,आपण वयाच्या ५ व्या वर्षी असतो तसे आपण ५० व्या वर्षी दिसणार नाही,,मानवी देहाला सुद्धा जयते वर्धते परिनिमियते अपक्षीयते क्षिणते आणि म्रीयते आशा विविध अवस्थेतून जावे लागते,,,मातेच्या गर्भात जीव येतो जन्म घेतो,,वाढतो,,त्यात बदल होतात,त्याला दिवसेंदिवस क्षिणता येते आणि एक दिवस ते मृत पावते,,,,ही मानवी देहाची जीवनाची गतिमानता आहे,,,

गती आहे म्हणूनच प्रगती पण आहे,,आणि ह्या सर्वांना सुरवात आहे तर शेवटही आहे,,,हे जग असत्य म्हणत असताना ह्या जगात शाश्वत काहीच नाही,,म्हणजेच काल जे होते ती आज राहणार नाही आणि आज जी परिस्थिती आहे ती उद्या असेलच असेही नाही,,,आणि सत्य म्हणजे जे तिन्ही काळात अबाधित असते,,,सगळी परिस्थिती वारंवार बदलते आहे,,ही अस्थिरता हे परिवर्तन आपण स्वीकारायला हवेच

पण त्यासाठी ही जीवन दृष्टी हवी की हे जग जरी परिवर्तनीय असले तरी ह्या परिवर्तनीय जगाचे अधिष्ठान मात्र अपरिवर्तनीय आहे,,,त्या अधिष्ठानकडे आपले लक्ष असायला हवे,,स्थिर तत्व असल्याशिवाय अस्थिरता दृग्गोचर होत नाही,,अपरिवर्तनीयत असल्याशिवाय परिवर्तन दिसत नाही,,,आणि गती असल्याशिवाय प्रगती दिसत नाही,,,ह्या सगळ्या विचारांच्या घड्या आहेत आणि ह्या घड्या पक्क्या बसविल्या की विचार पक्के आणि वैश्विक बनतात,,,आशा ह्या परिवर्तनशील जगात आपण जीवनाचा जो उपभोग घेतो तो त्याग भावनेने घ्यायला हवा असे आचार्यांनी सूचित केले आहे,,,,म्हणजे काय???पुढील भागात.......

# ईश उपनिषद – ९

हे जे नामरूपात्मक परिवर्तनीय जग आहे ते ईशाने व्यापले आहे आणि ह्या परिवर्तनीय जगाचे अधिष्ठान अपरिवर्तनीय आहे,,,हा उपनिषदाच्या पहिल्या तरंगा त त्याग भावना व वैराग्याचा उल्लेख आढळतो,,ज्ञान प्राप्त करायचे असेल तर अज्ञानाचा त्याग महत्वाचा ठरतो,,,पण हे अज्ञान म्हणजे काय??आणि त्याचा त्याग करायचा म्हणजे काय??हे दोन्ही प्रश्न महत्वाचे ठरतात,,,




ह्याच अनुषंगाने ह्या जगाचा उपभोग त्याग भावनेने घ्या असे म्हणत असताना त्याग भावनेने उपभोग ही संकल्पना विरोधाभासात्मक वाटते,,,पण ह्यातून काही गोष्टी स्पष्ट होतात की त्याग भावना कशाच्या संदर्भात?? ह्याठिकाणी एक विचार असा येतो की ,,“हे संपूर्ण जगात ईश्वराने व्यापले आहे ,,,आणि त्याने स्वतः त्या सगळ्याच त्याग करून हे जग आपल्याला उपभोग घ्यावयासाठी उपलब्ध करून दिले आहे‘‘‘,,,मग प्रत्येक वस्तूचा उपभोग घेत असताना ज्याने ते मला उपलब्ध करून दिले आहे ते आधी त्यालाच अर्पण करून मग ते प्रसाद म्हणून स्वीकारायचे,,,व्यवहारात प्रसादबुद्धी ठेऊन कृतज्ञता पूर्ण व्यवहार करून विवेकबुद्धीने आत्मवस्तू जाणून घ्यायची आणि त्या आत्मवस्तूचे संरक्षण करायचे,,,म्हणजेच ह्याठिकाणी उपभोग घेणे म्हणजे संरक्षण करणे असाही

अर्थ आपणास घेता येईल,,,

आणखी एक असाही विचार आहे की ज्या ज्या गोष्टींचा आपल्या ज्ञानेंद्रियना अनुभव येतो त्या सगळ्या गोष्टींचा एक दिवस शेवट होणार आहे ही भावना मनात सतत जागृत ठेवायला हवी ,,आणि ह्या सगळ्या नाशवान गोष्टीपासून मिळणारे सुखही नाशिवंत आहे हे भान ठेवणे गरजेचे आहे,,आणि मला तर शाश्वत सुख व आनंद पाहिजे आहे,,,मग शाश्वत सुख जर मला अशाश्वत वस्तूपासून मिळणार नसेल तर मला अशा अशाश्वत वस्तूंचा अनात्म वस्तूचा त्याग करावाच लागेल,, आणि शाश्वत वस्तुंना जाणून घ्यावे लागेल हाच त्यागाने उपभोग घेणे होय,,,

ह्या संदर्भात आणखी एक असाही विचार करता येईल की ही संपूर्ण चराचर सृष्टी ही ईशाची विभूती आहे त्याचेच प्रगटीकरण आहे,,आणि ज्यात माझे कर्तृत्व नाही तेथे भोक्तृत्व भावही संपुष्टात यायला हवा,,मी कर्ता मी भोक्ता ह्या भावनेचा त्याग करून ह्या जगतात अंतिम सत्याचा शोध घेऊन आनंद प्राप्त करायचा,,, हा कामपुरुषार्थ पण आपणास म्हणता येईल,,,भारतीय तत्त्वज्ञानातील तीन पुरुषार्थांचा उल्लेख ह्या श्लोकात आहे असे म्हटले तरी वावगे होणार नाही.

# ईश उपनिषद – १०

ईश उपनिषदाच्या पहिल्या तरंगाचे अंतरंग पाहत आहोत,,,वैराग्याचे वर्णन करणारे व त्याला कोणता भाव सहाययक ठरतो ह्याचे विवेचन आपण ह्यात पहात आहोत,,तीन मुद्दे ह्याठिकाणी मांडलेले आहेत

१)हे संपूर्ण चराचर विश्व हे ईशा ने व्यापले अच्छादलेले आहे

२) त्या जगताचा उपभोग त्याग भावनेने घ्यावा ::




ह्या मुद्द्यांच्या संदर्भात आणखी एक विचार महत्वाचा ठरतो की ह्या जगतात उपभोग घेत असताना भोगी वृत्ती न ठेवता त्यागी वृत्ती ठेवावयास आचार्य सांगत आहे,,,भोगण्याची वृत्तीच्या मुळाशी माणसाच्या इच्छा असतात,,,ह्या इच्छा प्रामुख्याने लोकेषणा,पुत्रेषणा,वित्तेषणा,ह्या तीन माणसाच्या इच्छा असतात,,आणि ह्याची पूर्तता करण्यासाठी व्यक्ती काहीही करावयास तयार असते,,व ह्या इच्छा पूर्ण न झाल्यास त्याला अतीव दु:ख सहन करावे लागते,,,अशा ह्या प्रबळ ठरणाऱ्या ह्या इच्छा चे प्राबल्य न वाढू देत ह्या जगात आपणास वावरता आले पाहिजे,,ह्याचे महत्वाचे कारण म्हणजे मानवी देहाचे प्रयोजन उद्देश हा स्वत: चे स्वरूप जाणणे हे आहे आणि ह्या इच्छा उद्देशाच्या आड येतात,,,आणि त्या इच्छांचा पूर्ततेतच आयुष्य निघून जाते,,आणि आयुष्याच्या शेवटी ‘‘‘आयुष्य ओघळोनी मी रिक्त हस्त आहे‘‘‘ हे दु:ख साचते,,,आणि आयुष्यात काहीतरी अपूर्ण आहे ही भावना प्रबळ होते,,,शेवटपर्यंत दु:ख साथ सोडत नाही,,,आणि व्यक्तीला तर आनंद आणि सुख पाहिजे

असते,,,मजा आहे,,,आयुष्यभर मला हवे काय आणि मी मिळवितो काय ह्याचा मेळच बसत नाही,,,म्हणून वेळीच हे विचार समजून घेणे महत्वाचे आहे,,,

३)तिसरा विचार ह्याठिकाणी आहे की दुसऱ्याच्या धनावर गिधाडप्रमाणे दृष्टी ठेऊ नका,,,हा अर्थपुरुषार्थ आहे,,,

बघा धन कमविणे साठविणे खर्च करणे ही मानवाची सहज वृत्ती आहे,,,हे धन गरजेपेक्षा जास्त कामविण्याकडे त्याचा कल असतो,,ह्या जगात प्रत्येकाला झटपट श्रीमंत व्हायचे आहे,,या वासनेतून मग अनेक कुप्रवृत्ती निर्माण होतात,,,ह्यातीलच एक कुप्रवृत्ती म्हणजे इतरांच्या धनाबाबत लोभ,,,आणि लोभ माणसाचा घात करतो,, वास्तविक पाहता धनासारखे चंचल काहीच नाही आणि धन कुणाच्या एकाच्या मालकीचे नसते,,आज ह्याच्या जवळ तर उद्या त्याच्याजवळ,,,ह्या धनाचा दानाने उपभोग घेणे हा खरा पुरुषार्थ आहे,,,- ईश उपनिषदाचा हा श्लोक ज्ञानमार्ग निर्देशित करतो,,,व्यक्तीला ह्या जगात राहून ईशाची अनुभूती घ्यायची असेल तर त्याला नेमके काय करावे लागेल???

........तर त्याची दृष्टी सर्व व्यापक ठेवावी लागेल,,,

कशी???

संपूर्ण जगात हे ईशाने व्यापले आहे ह्या चराचर सृष्टीत ईश्वर व्यापून उरला आहे ही धारणा पक्की करावी लागेल,,,

पण ह्या जगात रहायचे कसे???

ह्या जगात आनंदाने रहायचे असेल तर अनात्म असार ज्या ज्या गोष्टी आहे त्याचा त्याग करून आत्मभावनेचे रक्षण करावे लागेल,,ह्यालाच त्याग भावनेने जगताचा उपभोग घेणे असे म्हणतात,,,

ह्यासाठी प्रकर्षाने कोणते मूल्य सांभाळावे???

ह्यासाठी धनाबाबतची अनसक्ती महत्वाची आहे,,,विवेक युक्त वैराग्य हे ज्ञान प्राप्तीसाठी अतिशय उपयुक्त ठरते,,,मोक्ष काम व अर्थ पुरुषार्थ वर्णन करणारा हा पहिला तरंग ......

# ईश उपनिषद – ११

सत्य तत्वाची प्राप्ती करून घ्यायची असेल तसेच स्वतः चे स्वरूप जाणून घ्यायचे असेल तर वैराग्य मार्गाने ते कसे प्राप्त करायचे ह्याचे विवेचन पहिल्या तरंगात आचार्यांनी स्पष्ट केले,,

पण प्रत्येकालाच हा मार्ग झेपेल असे नाही,,कारण ह्या मार्गाने स्वतः ला जाणून घेण्यासाठी साधकाला खूप पूर्व तयारी तर करावीच लागते पण त्याला खूप उन्नत अवस्थेला स्वतः ला न्यावे लागते,,,ते प्रत्येकाला साधेलच असेही नाही आणि म्हणूनच ह्या ठिकाणी दुसरा श्लोक म्हणजेच




दुसरा तरंग कर्ममार्ग आपणास सांगतो,,,ह्या श्लोकाचा शब्दशः अर्थ असा की

‘‘‘ह्या जगात कर्म करीत शंभर वर्षे जगण्याची इच्छा करावी,,अशा प्रकारची ईच्छा करणाऱ्या तुला दुसरा योग्य मार्ग नाही,,अश्या वृत्तीच्या पुरुषास कर्म चिकटत नाही म्हणजेच अशुभ कर्माचा लेप त्याला लागत नाही,,‘‘‘

----कर्म करूनच मानवाची प्रगती होते व त्यासाठी सेवाभाव महत्वाचा आहे,,ह्याठिकाणी एवं हा शब्द वापरला तो ह्या साठी की आपल्या अंत:करणाची शुद्धी झाल्यावर हा अर्थ ह्याठिकाणी अभिप्रेत आहे आणि अंत:करणाची शुद्धी ही त्यागभावना जोपासल्याने होते है पहिल्या तरंगात स्पष्ट केलेच आहे,,

आपल्या अहंकाराचा त्याग करून तसेच कर्मफल भावनेचा त्याग करून निष्काम भावनेने कर्म करणे महत्वाचे आहे,,आपल्याला माहीत

आहे कर्मयोगावर भगवद्गीतेत भाष्य आहे,,,आणि ह्यावर बरीच टीका होते,,पण तत्वज्ञानाचा खरा अर्थ जाणून घेतले नाही तर किती अनर्थ होतात ह्याची आपल्याला कल्पना आहेच,,,

व्यक्ती कर्म करतो ती दोन प्रकारची असतात

१) सकाम कर्म,,,


२) निष्काम कर्म,,,

सकाम कर्माचा अर्थ त्याच्या नावातच आहे,,मी जेव्हा कर्म करतो त्याच्या फलश्रुतीची अपेक्षा करतो,,,ह्या फळासक्ती मुळे व्यक्तीत अधिक वासनांची निर्मिती होते आणि ह्या वासना इच्छा त्याच्या पूर्ण झाल्या नाहीत तर त्याच्या जीवनात दुःख निर्माण होते,,हे दुष्ट चक्र जीवनभर चालतच राहते,,,आणि जीवनाच्या शेवटी सुद्धा त्याच्या इच्छांना वासनाना पूर्णविराम लागत नाही,,,आणि त्यामुळे संपूर्ण जीवन दुखातच व्यतीत होते,,,

सकाम कर्माची फलश्रुती ही दुःख आहे,,,हे जर वेळीच कळले तर जीवनातील दुःखाच्या मालिकेला आपण स्वतः पूर्णविराम लावू शकू,,,तू कर्ता म्हणसी तेणे तू दुःखी होसी!!!असे शास्त्र सुद्धा सांगते,,,मग ह्यासाठी एकच करायचे की ह्या कर्मातील अहं करोमि हा भाव काढून टाकायचा जमेल आपल्याला,,,कसे ते पुढील भागात,,,,,

# ईश उपनिषद – १२

कर्म मार्गाचे अनुसरण हे ही सत्य ज्ञान प्राप्तीसाठी कारणीभूत ठरते,,पण प्रश्न हा पडतो की कर्म कोणते??सकाम की निष्काम,,,???शास्त्राने सांगितले की निष्काम कर्म,,अर्थात कोणत्याही फळाची अपेक्षा न ठेवणारे कर्म हे मोक्षाला सत्य ज्ञान प्राप्तीला कारणीभूत ठरतो,,पण कर्माने चित्त शुद्धी होईल हे नक्की,,आणि असे शुद्ध चित्त ज्ञानप्राप्तिकडे वळविता येईल,,




पण कर्म निष्काम असावे म्हणजे काय??ह्याचे उत्तर आहे की जे कर्म ईश्वरार्पण बुद्धीने,भक्ती भावाने व आत्मसमर्पण भावनेने केले जाते ते निष्काम कर्म होय,,ज्ञानाच्या प्राप्तीसाठी ही तयारी खूपच उपयुक्त ठरते,,,कर्माचे वर्गीकरण चार विभागात करण्यात येते

१)नित्य कर्म:–दररोज करावयाची कर्म,,,

२)नैमित्तिक कर्म:–काही विशेष प्रसंगी करावयाची कर्म,,

३)काम्य कर्म:–ज्यांचे आवाहन करून ठराविक इच्छांची पूर्तता होते अशी कर्म,,

४)निषिद्ध कर्म:–शास्त्राने जी कर्म अनैतिक अपवित्र ठरविली आहे ती कर्म,,

ह्याचा अर्थ व्यक्तीने केवळ कर्मकांड करावे असा होत नाही,,पण एक महत्वाचे की कर्म जर विवेकयुक्त अंत:कारणाने केले तर ते बंधनकारक

होणार नाही,,करण त्यात बुद्धीचे अधिक्य असेल,,पण अहंकार युक्त जर कर्म असेल तर ते अज्ञान दुःख ह्याला कारणीभूत ठरेल ,करण हे भावनेच्या स्तरावर असेल,,शास्त्र असे सांगते की यज्ञ कर्मशिवाय केलेले कोणतेही कर्म हे वासनांचे बंध निर्माण करतात व मानवाची आत्मिक प्रगती खुंटवितात,,,


पण ही यज्ञभावना समजून घेणे खूप महत्वाचे आहे,,यज्ञात आहुती देतात तेव्हा स्वाहा म्हटले जाते कारण अग्निमध्ये एकदा टाकलेली आहुती पुन्हा प्राप्त होत नाही,,त्याचप्रमाणे ज्ञानाच्या अग्नीने एकदा बुद्धीचे अग्निकुंड प्रज्वलित झाले की त्यात पडणारी कर्माची आहुतीचा लेप आपल्या ला लागत नाही,,म्हणून यज्ञभावना म्हणजे समर्पणाची भावना,,,कर्मात जेव्हा समर्पण व स्वार्थत्याग येतो तेव्हा ते कर्मयज्ञभावनांनी युक्त होते आणि असे कर्म मोक्ष दायक होते हे प्रत्यक्ष भगवंताने अभिवाचन दिले आहे,,,

ह्याचा सामाजिक आशय असा असेल की आत्मसमर्पणाच्या भावनेने समाजात व्यक्ती कार्यासाठी पुढे येतील तेव्हा कल्याणकारी समाजाची निर्मिती होईल.

# ईश उपनिषद – १३

कर्मयोग करणाऱ्या व्यक्तीस स्वरूपाचे आकलन होईल हे खरे पण हा कर्मयोग करायचा म्हणजे काय,,भगवद्गीतेत भगवंताने ह्याचे मार्गदर्शन केले आहे,,

आपल्या इंद्रियांना आपल्या मनाच्या साहाय्याने नियंत्रित करून आसक्त न होता कर्मयोग करतो तो स्रेष्ठ आहे,,म्हणजे काय??बघा आपली मनाची




धाव इंद्रियांच्या मार्फत सतत बाहेर असते,,ही धाव घेण्याची दरवाजे म्हणजे आपली ज्ञानेंद्रिये होत,,,आपले मन ज्ञानेंद्रियांचा संपर्कात येते आणि विषयाचा भोग घेते,,आणि त्यातही मजा अशी की ह्या विषयाच्या भोगापासून सारखे समाधान मिळत नाही आणि एक क्षण असा येतो की तो भोग नकोसा तर होतोच पण त्याला मन विटून जाते,,,गुलाबजाम आवडतात म्हणून किती खाता येईल आणि पहिल्या घासाचा जो आनंद असेल तो १० व्या घासाला मिळेल का??

मग आता माझ्या मनाचे आणि ज्ञानेंद्रियांचा संबंधच कमी केला तर???आणि हळू हळू सोडण्याचा प्रयत्न केला तर??मनाने ज्ञानेंद्रियना सहकार्याचे केले नाही तर???

पण मन तर स्वस्थ बसणार नाही त्याला संग तर हवाच असतो,,आशा वेळी ह्या मनाला उच्च आणि पवित्र वस्तूचा विषयांचा संग पुरविला तर

???आपले ज्ञानेंद्रियेही त्याच विषयांचा उपभोग घेईल जे विषय मन त्यांना पुरवेल,,,ह्यामुळे अनेक निरुपयोगी कार्यक्षेत्रातून ज्ञानेंद्रियना वाचवून त्याची शक्ती आपण निवडलेल्या कार्यक्षेत्रात आपल्याला कर्मेंद्रियच्या माध्यमातून वापरता येईल,,आणि मनाला जेवढे उच्च क्षेत्र आपण देतो तेवढे ते अधिक शुद्ध व निःस्वार्थ बनत जाते,,आणि ते मग असक्तीरहित बनते,,,किती छान!!


आणि असे असक्तीरहित मन हे यज्ञ भावना जोपासतो आणि मग इंद्रिय ही यज्ञ भावनेने कर्म करतात,आणि असे यज्ञ भावनेने कर्म करता करता अंत:करणं अधिक शुद्ध होते आणि त्याच्या ठिकाणी अधिक समर्पणाची भावना दृढ होते व हे कर्म कल्याणकारी बनते,असे कर्म निष्काम बनते,,

शिवाय असे कर्म करताना आपल्याला खूप समाधान व तृप्ती प्राप्त होते,,,आणि माणूस कर्म करताना मला अधिकाधिक समाधान कसे मिळेल ह्याचा विचार करतो,,आणि ह्याच कर्मचक्रात तो अधिकाधिक कल्याणकारी कर्म करतो,,आणि येणारी जी तृप्ती आहे ती त्याला उन्नत बनविते,,त्याचे मन एकाग्र बनविते,,आशा हृदयात सर्वसामान्य भोगाच्या वासना उद्भवणे शक्यच नाही,,आणि इच्छा नाही तेथे कर्म उद्भवत नाही,,,करण ज्या अज्ञानामुळे कर्म भावनेची उत्पत्ती झाली ते अज्ञानच नष्ट झाले,,आशा वेळी तो कर्म करेल न त्या कर्माचा लेप त्याला लागत नाही,,तो कर्मात हरवत नाही,,,करण कर्म करून त्याला काहीही प्राप्त करायचे नसते आणि कर्म केले नाही तर त्याला काहीही गमावण्याचेही भय नसते,,

# ईश उपनिषद – १४

सर्वसामान्य माणूस नित्य आणि नैमित्तिक कर्म करतोच,,पण हे कर्म निष्काम कसे होईल हा प्रश्न महत्वाचा आहे,,,

बघा जेव्हा आपण नित्य कर्म करतो त्यावेळी ‘मी करतो‘,,‘मी होतो म्हणून सर्व साध्य झाले‘,,असे आणि कितीतरी विधाने व्यक्ती करतो ,,आणि त्यातून त्याचा एकच भाव असतो आणि तो म्हणजे मीकरतो,,,आता समजा मी करतो असे म्हटले तर त्या कर्माचे अधिष्ठान आणि त्या कर्म निर्विघन पार पडणारी जी आहे तिला मी नाकारत असतो,,,




अगदी आत्ताचे उदाहरण घेतले तर उन्हाचा कडाका वाढला आहे,,आणि मी घरात कूलर आणले ,,,माझी विधाने बघा कशी असू शकतात,,

१)‘‘माझ्या घरातील सर्वांसाठी मी किती छान व्यवस्था केली,,

२)कधी चा विचार तरी केला होता का??

३)हे सर्व तुमच्यासाठी माझा पैसे खर्च करून मी आणले आहे,,

४)त्यासाठी मला किती खर्च झाला आणि हा खर्च मी किती माझ्या इच्छा मारून केला आहे,,

५)पण घरात कुणालाही माझी कदर नाही,,

असे कितीतरी विधाने असतात,,ह्याठिकाणी ह्या सर्व विधानाचा केंद्र बिंदू मी असतो,,,आणि हे सर्व मी केले ही भावना त्याठिकाणी दृढ

असते,,आणि ह्याच ठिकाणी आपण दुःखाची व्यवस्था आपल्यासाठी करून ठेवतो,,,

मी माझी कमाई,माझा पैसा, माझा कूलर माझे नातेवाईक ह्यातील किती गोष्टी साठी मी जबाबदार आहे??,,,मी कर्ता आहे??

ठीक ही सगळी व्यवस्था केली पण वीजच नाही,,काय होईल??

आता वीजही आहे पण साधने बिधडली,,तर??

हे सगळे उपलब्ध आहे पण ac कूलर चा ब्रँड घरच्या व्यक्तींना आवडला नाही,,,

किती मजा आहे,,,एव्हढ्या सगळ्या समस्या निर्माण करण्यापेक्षा फक्त एकच भाव आपणास दृढ करता आला तर? आणि तो भाव आहे मी कर्ता नसून भगवंत कर्ता आहे,,,त्याच्याजवळ सर्वांसाठी उत्कृष्ट व्यवस्था आहे,,,फक्त त्याने आपल्यासाठी जो निर्णय घेतला आहे त्याला आपली मान्यता हवी स्वीकार्यता हवी,,,

जो पर्यंत मी कर्ता म्हणतो तोपर्यंत दुःख आहे पण ज्या क्षणी तो कर्ता आहे असे आपण म्हणतो तेव्हा आपल्याला त्या कर्माचा लेप लागत नाही,,आपले नित्य कर्मात हा भाव दृढ करण्याची एकदा आपण आपल्या मनाला सवय लावली की हीच सवय दृढ निश्चयात परिवर्तित होते आणि विशाल बनते मग आता माझ्या जीवनात जे जे काही होते त्याचा कर्ता ईश्वर आहे,माझे जीवनाची संपूर्ण आखणी त्याने केली आहे,,,माझ्या जीवनाची blue print तयार आहे,,आणि आता माझे नित्य किंवा नैमित्तिक कर्म ही त्यानेच ठरविलेली योजना आहे,,माझ्या बळे मी काहीच करीत नाही,,,माझ्या जीवनाचा शिल्पकार जरी मी असलो तरी ह्या शिल्पाची संकल्पना आणि हे शिल्प घडवण्यासाठी जी गुणसंपत्ती आहे ती ईश्वरीय देणगी आहे,,,पण लक्षात ठेवा ही निष्क्रियता नाही,,आधुनिक भाषेत आपण ह्याला attitude म्हणू,,,नित्य आणि नैमित्तिक कर्मात निष्काम कर्म अशाच मार्गाने होईल,,मी करतो मी भोगतो ही भावना प्रयत्नपूर्वक निरास करायला हवा,,,

# ईश उपनिषद – १५

मित्रानो, अनासक्त भावनेने जेव्हा व्यक्ती कर्म करतो तेव्हा ती कर्म त्याचे चित्त शुद्ध करतात आणि अशा शुद्ध अंत:करणात च मग अध्यात्मिक साधनेसाठी लागणारी शांतता व स्थिरता निर्माण होते,,,

पहिला तरंग संन्यास मार्गाचे व त्यायोगे ज्ञानप्राप्ती कशी करावी ह्याचे मार्गदर्शन करतो तर दुसरा तरंग निष्काम कर्मयोगाचे आचरणातून निस्सीम सेवा दीर्घ कालीन करण्याची भावना विचार व्यक्त करतो,,




पण बरेचदा असे घडते की ह्या दोन्ही मार्गाचे अनुसरण करण्यास व्यक्ती तयार नसते,,,कधी ती ज्ञान मार्गावर टीका करते तर कधी निष्काम कर्माला दुबळेपणा,,ह्या दोन्हीही गोष्टी घातक,, संन्यास मार्गाने आहे त्या वस्तूंचा त्यागाने उपभोग घेण्याची मानवाची वृत्ती नसते,,

सध्याचे युग फक्त उपभोगाचा युग आहे,,,उपभोग वृत्तीनेच जगाचा उपभोग घेतल्यास त्याचा परिणाम दुःख हे नक्कीच आहे,,आणि आज आपण पाहतो की जेवढी उपभोगाचा साधनात वाढ झाली माणूस तेवढाच दुःखाच्या गर्तेत चालला आहे,,


शिवाय कर्माचा विचार केल्यास आज मानवाने give and take हे तत्व स्वीकारले आहे,,,आणि आधुनिक युगात ह्याच तत्वाला मान्यता आहे,,ह्या तत्वामुळे माणसाच्या अपेक्षा वाढतात आणि मग अपेक्षाभंगाचे दुःखाला त्याला सामोरे जावे लागते,,,

खूप दुर्दशा आहे आणि खूप केविलवाणी परिस्थिती आहे माणसाची,,,मग ह्या दोन्ही मार्गाचे अनुसरण न केल्यास काय होते ह्याचे सुंदर वर्णन आचार्यांनी केले आहे,,,पुढील भागात,,

# ईश उपनिषद – १६

जे लोक ज्ञान मार्ग किंवा कर्म मार्ग अनुसारत नाही त्याच्या बाबतीत नेमके काय घडते ह्याचे स्पष्टीकरण ह्यात सापडते,,,

ह्या ठिकाणी आपण काही प्रश्न उपस्थित करू आणि त्याच शोध घेऊ,,,




१)असूर्य लोक म्हणजे नेमके कोण??

२)ते अज्ञानाने आवृत्त का झाले आहेत??

३) आचार्यांनी आत्मघातकी कुणाला म्हटले आहे??

४) हे आत्मघातकी का म्हटले आहे??

५) ह्या ठिकाणी मृत्यू म्हणजे काय??

६) पुन्हा असूर्य हा शब्द पुन्हा का वापरला आहे???,,,,

ह्या सगळ्या प्रश्नांची उत्तरे प्राप्त करणे अत्यंत आवश्यक आहे,,,

असूर्य लोक ह्याचा अर्थ देहबुद्धीत रमणारे लोक,,ज्याची देहभावना प्रबळ आहे असे लोक,,बघा आपले व्यवहार हे सगळे देहशीच निगडित असतात,,आणि त्यामुळे ह्या देहाच्याच अस्तित्वावर माझे अस्तित्व मी मानतो,,पण नेमके मी कोण आहे ??हा प्रश्न आपण स्वत: ला विचारला तर मी अनेक प्रकरने माझी ओळखलोकना सांगेल,,पण ती माझी किती काळ टिकणारी ओळख आहे?? हा विचार महत्वाचा आहे ,,,

अगदी आयुष्याच्या शेवटच्या घटकेपर्यंत जरी म्हटले तरी एक वेळ अशी येणारच की माझे सर्व ओळख विसरून हा देह त्यागण्याची वेळ माझ्यावर येणार आहे,,ह्या परिस्थितीत मला माझी ओळख न पडता मी केवळ देह आहे हि माझी धारणा मी पक्की करतो,,,शिवाय ह्या देहाशी निगडित माझे सर्व व्यवहार असतात,,,

वास्तविक पाहता हा देह सतत परिवर्तनीय असतो,,त्याच्यात सातत्याने परिवर्तन होतात ,,,जायते वर्धते,क्षिणते,परिनिमियते,अपक्षीयते,नश्यते,,हे तर कोणत्याही देहाच्या बाबतीत अवस्था आहेतच,,,पण ह्याची जाणीव होई पर्यंत आयुष्य संपून गेलेले असते,,आणि आयुष्यभर आमचे सगळे व्यापार देहशीच निगडित असतात,,वास्तविक नरदेहाला संतांनीघबाड असे म्हटले आहे,,ह्याचे कारण स्वतः ला जाणण्याची व्यवस्था फक्त नरदेहातच आहे,,,करण पशूंना विवेक बुद्धी नाही आणि म्हणून ते स्वतः ला जणू शकत नाही,,,

माझ्या देहाचे प्रयोजन काय??माझा ज्या अर्थी नरदेहात जन्म झाला त्या अर्थी माझ्या जन्माचे प्रयोजन आहेच,,पण ते काय हे जाणून त्यानुसार जीवन जगणारे फार थोडे,,,‘‘तुझे कारणी देह माझा पडावा‘‘ असे आपण म्हणतो पण त्यातील सार महत्वाचा आहेच,,,आणि म्हणून प्रत्येक शब्दाचा वाक्याचा आपल्याला युगानुकूल आशय घेऊन तो पुढच्या पिढीच्या हातात ठेवावा लागेल पण त्याचा गाभा न गमविता,,,पुढील भागात,,,,,,


# ईश उपनिषद – १७

आपला दुसरा प्रश्न आहे की हे लोक अज्ञानरुपी अंधक्कारने आवृत्त का झाले आहेत??

मग हे अज्ञान कशाचे??

ह्याला अंधक्कार का म्हणायचे??

मग ज्ञान म्हणजे काय??खूप प्रश्न उपस्थित होतात मनात,,




संतांनी म्हटले आहे की ज्ञान म्हणजे आत्मज्ञान,,मी कोण आहे ह्या बाबत चे ज्ञान,,ज्या क्षणी देहबुद्धी आत्मबुद्धीत परिवर्तित होते ते खरे ज्ञान होय,,‘‘‘देह बुद्धी ती आत्मबुद्धि करावी‘‘ असे समर्थ ही म्हणतात,,हे ज्ञान आपल्यातच आहे पण त्यावर अज्ञानाचे आवरण आहे,,आपण मूलतः पूर्ण स्वरूप आहोत पण आपण स्वतः ला अपूर्ण समजतो आणि जीवनाची हानी करून घेतो,,आणि हे अपूर्णपण ह्यासाठी वाटते की माझे माझ्याबाबत चे जगताबाबत चुकीचे आकलन,,आणि हे चुकीचे आकलन ह्यासाठी की माझे चुकीचे तादात्म्य,,,कठीण आहे,,,

माझे चुकीचे तादात्म्य मी ह्या करीत म्हणते की आपले तादात्म्य देहाशी असते त्यामुळे देहाच्या स्तरावर मी विविध अनुभव घेतो,,माझ्या अनुभवाची क्षेत्रे वेगवेगळी असतात ,,,कधी हे अनुभव चांगले तरकधी वाईट असतात,,वाईट अनुभव जेव्हा येतात तेव्हा आपण म्हणतो की हे जग खूप वाईट आहे,,शरीराच्या स्तरावर कुणालाही साधी ईजाही होणे


नको असते,,पण व्याधी तर होणारच आहे,,शरीराची हानी तर होणारच आहे,,,शरीराचा नाश तर होणारच आहे,,मग शरीराशी तादात्म्य हे मानवाला दुःख देत,,,

दुसरे आपले तादात्म्य असते आपल्या मनाशी व पर्यायाने विचारांशी,,,आणि मनाच्या स्तरावर अहं सुखी अहं दुःखी हे आंदोलन नेहमी सुरू असते,,माझे मन सुखी तर मी सुखी आणि माझे मन दुःखी तर मी दुःखी,,जीवनभर हा सुखदुःखाचे खेळ सुरू राहतो अगदी दमछाक होईपर्यंत,,,मनाशी असलेले तादात्म्य मनुष्याला सतत हेलकावे देत,,,

आपले तिसरे चुकीचे तादात्म्य असते आपली बुद्धी,,जी निश्चयातमीका आहे,,बुध्दीशी तदात्म्य पावलो की मी निर्णय घेणारा हा अहंकार उत्पन्न होतो,,,‘‘घडी घडी बिघडे हा निश्चयो अंतरीचा,‘‘,,,असे समर्थ म्हणतात,,आणि आयुष्यातील एक जरी निर्णय चुकला तर आयुष्य वेगळ्या वळणावर आपणास नेऊन ठेवते,,,ह्या सर्व घटकांशी तादात्म्य हे आपल्याला निश्चित पणे स्वरूपा पासून दूर नेते,,आचार्यांनी आत्मष्टकम मध्ये ही बाब खूप छान समजावून सांगितली आहे,,,

# ईश उपनिषद – १८

आपले स्वतः बाबत चे तसेच जगत बाबत चे चुकीचे तादात्म्य आपल्याला जीवनात दुःख तर देतेच पण सर्वात महत्वाचे म्हणजे ते अपल्याला ज्ञानापासून वंचित करते,,आणि ह्या अनुषंगाने आपण अज्ञानाच्या अंधकारात तर आहोतच पण आपल्या बुद्धीवर अज्ञानाचे आवरण आहे,,,आणि जसा अंधकार फक्त प्रकाशाने दूर होतो त्याच प्रमाणे अज्ञान फक्त ज्ञानानेच दूर होते,,,असे अज्ञानाने आवृत्त असणाऱ्या लोकांना आचार्यांनी आत्मघातकी असे म्हटले आहे,,




आता प्रश्न उद्भवतो की ह्या लोकांना आत्मघातकी असे का म्हटले??स्वतः चा घात त्यांनी केला,, त्यांनी जीवन मूल्य नाकारली,,ते देहलोलुपतेने अंध बनले आहे,,असे लोक स्वतः ची अधोगती तर करतातच पण ते समाजाचीही अधोगती करतात,,,मग असा समाजही मूल्याधिष्ठित जीवन नाकारतो,,

असे जे लोक आहेत ते कोठेही गेले तरी ते तेथेही विनाशकारी ठरतात,,,भ्रामक जीवन मूल्यांचे आचरण करणारा ,,देहबुद्धीतच रमणारा,देहाचे प्रयोजन न जाणणारा,,शरीर मन बुद्धीच्या स्तरावर तादात्म्य होऊन केवळ दुःख भोगणारा आत्महत्यारा नाही तर त्याला काय म्हणावे??असा परखड सवाल संतानाही विचारला आहे,,

असे आत्महत्यारे वारंवार आशा ठिकाणी जन्म घेतात की ज्या ठिकाणी त्यांच्या ह्या सर्व भोग वासना पूर्ण होतील,,,आता प्रश्न असा उद्भवतो की येथे पुन्हा एक टीका होण्याची शक्यता आहे की एकदा मृत्यू झाला की पुढचा जन्म कोणता असेल हे कोठे कळते???,,आणि माझा मागचा जन्म कोणता होता हेही कोठे कळते??मग आहे तो दिवस का जगू नये??अगदी बरोबर हेच तर आचार्य सांगतात,,,बरे आपण पुनर्जन्माच्या नाही ह्याच जन्माचा जरी विचार केला तरी ज्या ठिकाणी आपण आहोत त्या ठिकाणी थोड्यावेळासाठी जन्म आणि ज्या ठिकाणी नही त्या ठिकाणी थोड्या वेळासाठी मृत्यू,,,,असे गृहीतक जरी धरले तरी असे आत्मघातकी व्यक्ती जेथे जाईल तेथे नकारात्मक ऊर्जा निर्माण करेल,,,

(हे कदाचित मान्य होईल),,,


इंद्रियउपभोग,लोलुप्त,लोभ,अपयश दुःख अवमान निराशा ह्याच गोष्टीचे वलय तो आपल्या भोवती निर्माण करेल,,,जन्म घेणे लगे वासनेच्या संगे,,असे संत म्हणतात तर,, पुनरपि जननं,,,पुनरपि मरणम,,, असे आचार्यांनी पण म्हटले आहे,,,आपण तत्वज्ञानाची वैश्विकता तर स्वीकारलीच पाहिजे पण त्याचसोबत त्याला युगानुकूल आयाम पण द्यायला हवा,,,हा ईश उपनिषदाचा तिसरा तरंग होय,,,

# ईश उपनिषद – १९

ईश उपनिषद भाग १९::: हरिओम,,,,ईश उपनिषदाचा अभ्यास करताना पहिले तीन तरंग आपण पाहिले,,,

१)पहिल्या तरंगात संन्यास मार्गाने सत्य तत्वाची प्राप्ती कशी करायची ह्याबाबतचे विवेचन पाहिले,,

२) दुसऱ्या तरंगात निष्काम सेवेच्या कर्माच्या आनंदातून शंभर वर्षे जीवन जगण्याची इच्छा करण्याचा पुरस्कार केला आहे,,,३) तिसऱ्या तरंगात जे कोणी वरील दोन्ही मार्गाचे अनुसरण न करता जगतात ते कसे आत्मघातकी असतात ह्याचे वर्णन आपण मागील अठरा भागात पहिले,,,




४)आता ह्यापुढील काही भाग हे चवथ्या तरंगा बाबत आहे,,आणि ह्या तरंगात श्लोक क्रमांक ४ ते ८ आशा ५ श्लोकांचा अंतर्भाव होतो,,,आणि ह्या पाचश्लोकात परमतत्वचे निर्देशन केले आहे,,

वास्तविक पाहता परम तत्वाचे वर्णन करता येत नाही कारण ते अनिर्वचनीय आहे ,,,अमूर्त आहे,,पण त्याचे गुणवर्णन केल्याशिवाय ते कसे आहे हे ही समजणार नाही,,शब्द प्रमाणाचा आधार घ्यावाच लागेल,,आणि हे अतिशय दुर्लभ कार्य आचार्यांनी आपल्यासाठी करून ठेवले आहे,,ह्या आत्मतत्वाचे गुण जे ह्या चौथ्या तरंगात आढळतात ते पुढीलप्रमाणे

१) आत्मतत्त्व हे अचल आहे

२) ते मनाहुन वेगवान आहे,,

३) त्याची सर्वत्र सत्ता आहे

४) देवांनीही ह्या तत्वाला अद्याप गाठलेले नाही

५) ते स्वतः हालचाल करीत नाही पण ते सर्वांच्या हालचालींचे करण असते.

६) ते दूरही असते आणि ते जवळी असते

७) ते आताही असते आणि बाहेरही असते,,

८) तो कुणाचीही घृणा करीत नाही

९) तो सर्व भूतमात्रांना आत्मतत्वातच पाहतो

१०) तो आत्म्याला सर्व भूतमात्रामध्ये पाहतो

११) आत्म्याच्या स्तरावर सर्व भूतमात्रे एकच होतात

१२) तोच सर्वांचा ज्ञाता असल्याने त्याला कशाचाही मोह किंवा भ्रांती नाही,

१३) त्याला कशाचाही मोह नाही

१४) तो सर्वामध्ये एकत्व पाहतो

१५) तो सर्व व्यापी आहे

१६) तो परम तेजोमय आहे

१७) तो अशरीरी आहे

१८) तो स्नायुराहित आहे

१९) तो निष्पाप आहे

२०) तो सर्वद्रष्टा आहे

२१) तो मनाचा शास्ता आहे

२२) तो सर्वदूर विद्यमान आहे

२३) तो स्वतः प्रगट होतो

२४) त्यानेच अगदी अनादिकालापासून ज्याच्या त्याच्या योग्यतेनुसार कामे वाटून दिली आहे

परमतत्वाचे वर्णन वरील भाषेत आचार्यांनी केले,,,


पुढील काही भागातून ह्यावर चर्चा करू

# ईश उपनिषद – २०

ईश उपनिषदाच्या ह्या चौथ्या तरंगात परम तत्वाचे वर्णन केले आहे,,आणि हे परमतत्व म्हणजेच ब्राह्मतत्व आत्मतत्त्व चैतन्य तत्व आहे.

जे सर्व सृष्टीत विद्यमान आहे,ज्याच्या सत्तेवर संपूर्ण जगताचे चलन वलन सुरू आहे,,आणि असे चैतन्य तत्व अनेक नसून एकच आहे,,

जड चेतन सर्व वास्तूत ते विद्यमान आहे अशा आत्मतत्वाचे वर्णन ह्याठिकाणी केले आहे,,जसे पाणी हे तत्व आहे असे म्हटले तर समुद्रातील




विहिरीतील पाण्याची चव जरी वेगळी असली तरी पाणीतत्व एकच आहे,,

विज्ञानाच्या भाषेत सांगावयाचे असल्यास संपूर्ण सृष्टीतील प्रत्येक वस्तू अनुरेणुनी व्याप्त आहे,,वास्तूमधील अशी अगदी सूक्ष्म जागाही रिकामी नाही जी अनुरेणुनी व्याप्त नाही,,आणखी एक की हे अणूरेणू वेगवेगळे नाही प्रत्येकात तेच आणि सारखेच आहेत,,ते आतबाहेर सर्वत्र आहेतच,,हे विज्ञानाच्या स्तरावर आम्हाला मान्य होते मग अध्यात्माच्या अद्वैताच्या स्तरावर आम्ही हे मान्य का करीत नाही???मजेशीर बाब आहे,,,असो,,

ज्या तत्वाचे वर्णन ह्या विचारतरंगात आले आहे ते तत्व समष्टी च्या स्तरावर त्यालाचब्रह्म म्हणतात,,व्यष्टीच्या स्तरावर त्याला आत्मतत्त्व म्हणतात,,,पण दोन्ही एकच आहे,,ह्याचे वर्णन करताना आचार्य म्हणतात

''हे तत्व अचल आहे''

ह्याचाच अर्थ त्याला गती नाही ते ह्याठिकाणाहून त्या ठिकाणी जात नाही,,मग ते एकच ठिकाणी असते का?? असेही नाही,,चल आणि अचल ह्यातील फरक समजावून घ्यायला हवा,,समजा माझ्यासमोर एखादी खुर्ची ठेवली आहे,,,मला त्यावर बसायला सांगितले,,,मी केव्हा बसू शकेल जेव्हा ती खुर्ची रिकामी आहे,,त्या खुर्चीवर जागा आहे,,आणि ती खुर्ची व माझ्यापासून दूर आहे,,आशा तीन अटी पूर्ण झाल्या की मी चल बनेल आणि त्या खुर्चीत जाऊन बसेल,,,

पण लक्षात घ्या अशी एकही जागा रिकामी नाही जेथे आत्मतत्त्व विद्यमान नाही ,,,मग ते इकडून तिकडे जाईलच कसे,,,ते अविचल आहे ही त्याच्या व्यापाकतेची खुण आहे,,,कारण गती म्हणजे काळ आणि अंतरात होणारा बदल,,पण आत्मतत्त्व हे ह्या दोन्हीच्या अतीत आहे कारण कोठेही जा ते पूर्वीच विद्यमान आहे,,त्यानेच सर्व जगत व्यापलेले आहे,,,तुकाराम महाराज म्हणतात''अनुरणीया थोकडा !!तुका आकांशा एवढा!!

शिवाय ह्या ठिकाणी अनेजत हा शब्द वापरला आहे,,ह्याचाच अर्थ गतीहीन किंवा स्थिर असा होतो,,,मग आत्मतत्त्व गतीहीन आहे असे म्हणताना ते निष्क्रिय आहे असे आचार्यांना म्हणायचे आहे का??अजिबात नाही,,गतीहीन हा गतीशीलतेच्या विरुद्ध असणारा शब्द आहे,,,विज्ञानाचा सिद्धांत आहे की अपरिवर्तनीय घटक हे परिवर्तनीय घटकाचा मूलभूत आधार असतो,,जगत हे परिवर्तनीय आहे,,आणि ह्या जगताचा जो अपरिवर्तनीय आधार आहे तो म्हणजे हे न बदलणारे तत्व,,,किती छान,,,वेदांत तत्वज्ञान हे खरच वैज्ञानिक आहे,,,पण त्यातील खरे विज्ञान जाणून घ्यायला हवे,,,,आणि त्याचे अर्थनिर्वंचन योग्य व्हायला हवे.

# ईश उपनिषद – २१

आत्मतत्वाचे वर्णन करून आपल्याला अगदी सहजतेने आचार्यांनी आत्मतत्वाची ओळख करून दिली आहे,,ह्याच श्लोकात ते म्हणतात की ‘‘आत्मतत्त्व हे मनाहुन वेगवान आहे‘‘,,ह्याठिकाणी एक गोष्ट लक्षत घ्यायची आहे की आत्मतत्त्व अचल आहे असे म्हणत असताना आचार्यांनी आत्मतत्वाची गती नाकारली होती आणि ह्याठिकाणी आत्मतत्वाचा वेग ते मान्य करीत आहेत,,,काय आहे हे???




बघा मनापेक्षा वेगवान आत्मतत्त्व आहे,,,आपल्याला माहीत आहे मन हे अतिशय चंचल आहे,,आणि अतिशय वेगवान आहे,,,एका क्षणात ते कुठे कुठे जाऊन येते,,पण मनाची एक मर्यादा आहे की अनुभवाच्या प्रांतातच ते जाते,,त्याच्या पलीकडे पाहण्याची क्षमता मनात नाही,,

आता आत्मतत्त्व मनापेक्ष वेगवान आहे ,म्हणजे मन आणि आत्मतत्त्व ह्यात काही स्पर्धा आहे का??अजिबात नाही,,,उलट विचार करा की जेथे जेथे म्हणून माझे मन जाते तेथे तेथे आत्मतत्त्व विद्यमान असतेच,,,कारण ते तेथे अंतरभूतच असते,,,असे होत नाही की ,आता होते ,पण आता नाही,,,आता जेथे मन पोहोचते तेथे ते आधीच पोहोचले असते म्हणजे तेथे ते असतेच कारण अशी एकही जागा नाही जेथे ते

नाही,,,ह्या दृष्टीने ते मनाहुन अधिक वेगवान आहे,,

मन म्हणजे विचार,,,विचारांचा प्रवाह म्हणजे मन,,,आपले विचार आताही जेथे पोहोचले असतील ,तेथे ह्या तत्वाने ते सर्व व्यापलेले असते,,,कारण हे आत्मतत्त्व सर्वव्यापक आहेच,,आणि ह्यादृष्टीने आत्मतत्वाला वेग आहे पण गती नाही

कारण गती ही जगताला आहे ,,,जगत ही गतीवचक संकल्पना आहे,,,परिवर्तन दर्शक संकल्पना आहे,,ज्याला गती आहे त्यालाच जग म्हणतात,,जे परिवर्तनशील आहे त्याला जगत म्हणतात,,,,आणि परिवर्तनीयतेचे अधिष्ठान अपरिवर्तनीय असते,,,


वेदांतच्या भाषेत सांगावयाचे झाल्यास जग हे अध्यास आहे तर ब्राह्मतत्व आत्मतत्त्व अधिष्ठान,,,अधिष्ठान असत म्हणून अध्यास भासतो,,,अधिष्ठानच काढून घेतले तर अध्यासाचाही निरास होतो,,ह्या दृष्टिकोनातून जगताचे अधिष्ठान अपरिवर्तनीय आहे,,,किती छान,,,

आता गती आणि वेग हे शब्द का वापरले ते स्पष्ट झाले,,,ह्यालाच शास्त्राने विरोधाभासात्मक अध्ययनाची पद्धती सांगितली आहे,,,,

# ईश उपनिषद – २२

सर्वव्यापी चैतन्य तत्वाचे वर्णन ,ज्याला समष्टी स्तरावर ब्रह्म व्यष्टी स्तरावर आत्मतत्त्व म्हणतात आचार्यांनी चवथ्या तरंगात केले,,ह्या आत्मतत्वाला अद्याप देवानेही गाठले नाही,,ते तत्व देवाच्याही पुढे असते,,,येथे पुन्हा देव आणि आत्मतत्त्व ह्यांची स्पर्धा आहे असे आचार्यांना सुचवायचे आहे का??? आणि आता प्रश्न पडतो देव म्हणजे कोण,??

मित्रानो आजकाल एक प्रघात आहे की आमचा देवावर विश्वास नाही,,,आचार्यांच्या ह्या विवेचनानंतर हा मुद्दाच रहात नाही,,'दिव' ह्या धातू पासून देव ह्या शब्दाची उत्पत्ती आहे,,दिव म्हणजे प्रकाशमान करणारे,,,,आता एक लक्षात घ्या की व्यक्तिकरिता देव कोण??आपले ज्ञानेंद्रिये ही खरी देवता आहे,,,करण ज्ञानेंद्रियामुळे आपल्यासाठी बाहेरील सृष्टी प्रकाशित होते,,आणि आपण जगाचा अनुभव घेऊ शकतो,,करण प्रत्येक ज्ञानेंद्रियांचा एक स्वतंत्र विषय असतो,,आणि तो इतर ज्ञानेंद्रिय तो विषय घेऊ शकत नाही,,,




डोळ्यांचे काम पाहणे हे डोळ्याशिवाय कोणीही करू शकत नाही,,,जग पाहण्याचा अनुभव डोळेच देतात,,आणि हा अनुभव आपणास का मिळतो??नुसता डोळा आहे म्हणून नाही तर डोळ्यात पाहण्यासाठी डोळ्यांचा डोळा म्हणजेच चैतन्य आहे म्हणून,,डोळ्यांचा डोळा,,कानाचा कान,, मनाचे मन,,प्राणाचा प्राण म्हणजे हे चैतन्य आहे,,,आणि


ज्यादिवशी हे चैतन्य तत्व आपल्यातून निघून जाते तेंव्हा तेव्हा ज्ञानेंद्रिय असूनही ते आपले कार्य करू शकत नाही,,,कलेवराचे डोळे उघडे असतात पण ते पाहू शकत नाही,,हे जरी लक्षत आले न तरी माझा देवावर विश्वास नाही असे विधान नाही करणार कुणी,,कारण ह्या अर्थाने देव म्हणजे ज्ञानेंद्रिय,,,आणि देव नाहींकिवा देवाचे अस्तित्व नाकारणारे स्वतः चेच अस्तित्व नाकारतात,,,आणि स्वतःला नाकारण्यासारखी तीव्र नकारात्मकता मग त्यांच्या जीवनात येते,,,

माझी ज्ञानेंद्रिय ज्या ज्या विषय वस्तूचा अनुभव घेते त्या त्या ठिकाणी चैतन्य ब्राह्मतत्व आत्मतत्त्व विद्यमान असतेच,,आणि ते तेथे असते म्हणूनच ज्ञानेंद्रिय त्याचा अनुभव घेऊ शकतात,,ह्या तत्वाचे हे व्यापकपन ह्या ठिकाणी मांडले आहे,,आणि ह्याचे जर आकलन झाले तर माझ्या ज्ञानेंद्रियचाही आधी हे तत्व तेथे पोहोचले आहे ह्याची प्रचिती आल्याशिवाय राहत नाही,,आणि असा अभ्यास साधकाच्या दृष्टीने खूप महत्त्वाचा ठरतो,,,मग दृश्य काहीही असो त्याचे दर्शन घडताना द्रष्टा मात्र मी म्हणजेच माझ्यातील आत्मतत्त्व आहे,,ज्याचे दर्शन घडते त्यातही ते तत्व विद्यमान आहे,,आणि जे दृश्य आहे त्याचे अधिष्ठानही तत्व आहे ही एकदा घडी बसली की साधकाची साधना खूप सुलभ होते,,ह्यामुळे त्रिपुटीचा बाध करणे शक्य होते,,,,

तत्वज्ञानाचा योग्य अर्थ लावायला हवा,,,व्यंजना आणि लक्षणा ह्यात फरक असतो,,तत्वज्ञानाचा अर्थनिर्वंचन करताना लक्षणा लक्षात घ्यावीच लागते,,,आणि व्याजनेचा बाध करावा लागतो,,,असे जर घडले नाही तर तत्वज्ञान हे कुचकामी ठरते आणि मग ते इतरांना कालबाह्य वाटते,,,वास्तविक पाहता वेदांत तत्वज्ञान हे नित्यनूतन आहे,,,

# ईश उपनिषद – २३

हरिओम,,,उपनिषदाच्या ह्या चौथ्या विचारतरंगात आपण विचार करतो ते आत्मतत्वाचा वर्णनाचा ,,,जे सर्वव्यापी आहे,,,,सर्वप्रकारच्या हालचालींचे परिवर्तनशील जगताचे ते अधिष्ठान आहे,,आणि ह्या अधिष्ठानाच्याच आधाराने सर्व सृष्टीतील व्यवहार घडतात आहे,,,आत्मतत्त्व ब्रह्म तत्व हे मूळ अधिष्ठान आहे आणि आता ह्याच्या व्यतिरिक्त जे जगत आहे तो अध्यास,,,एकदा ही सर्वव्यापी पणाची घडी




आपल्या मनात पक्की झाली की पुढचा अभ्यास सोपा होतो,,

ह्याच श्लोकात एक आणखी सुंदर शब्द वापरला आहे आणि तो म्हणजे मातरीश्वा,,,आणि ह्याचा अर्थ होतो सर्व प्राणांचा स्वामी जो वायू आहे,,ह्याठिकाणी मात म्हणजेआकाश,,,ह्या शब्दाचा अर्थ आपण दोन प्रकारे पाहू शकतो,,,


प्रथम प्राणांचा स्वामी वायू हा त्याच्या सत्तेत राहतो,,,म्हणजे काय??आणि वायूच का???खूप छान संकल्पना आहे,,,जेव्हा आपण पंचमहाभूतांच्या क्रमाचा विचार करतो तेव्हा एक गोष्ट आपल्या लक्षत येईल की पंच महाभूतांच्या उत्पत्तीच्या पण क्रम आहे,,,प्रथम सर्वव्यापक आकाश,,आकाश ज्याला धारण करताय तो वायू,,नंतर अग्नी,,जल आणिपृथ्वी,,,अति सूक्ष्मतेकडून स्थूलकडे हा प्रवास आहे,,आणि जेवढे सूक्ष्म तेवढे व्यापक,,,पण आता ज्याच्या आधारे हा वायू ह्या चराचरात वहन करतो ते आकाश तत्वाचा आधार कोण??कुणाच्या आधारे हे तत्व

एवढ्या व्यापकतेने आपणास दिसते??ह्या प्रश्नाचे उत्तर आहे की आत्मतत्वपासूनच ह्या आकाशाची निर्मिती झाली,,ही पंचधा प्रकृती म्हणजेचब्राह्मतत्वाची मायेच्या सहकार्याने सत्व गुणांच्या एकरूपतेतून झालेली निर्मिती असे आपणास स्थूल रूपाने म्हणता येईल ,,,आणि प्रत्येक महाभूत दुसऱ्या महाभूतांची कारणे ठरतो,,,ह्याच अर्थाने वायू हा पाण्याचेही कारण ठरतो जे पाणी सर्वांसाठी जीवन दायी आहे,,,किती छान विचार आहे,,,आता आपण स्थूलकडून विचार केला तर पृथ्वी,,जल,,अग्नी,,,वायू,,आकाश,,स्थूलकडून सूक्ष्मतेकडे,,, आणि आकाशाचे कारण???अशी विचारांची घडी बसवून घ्यावी लागेल,,आणि ह्या अर्थाने जेव्हा एक महाभूत दुसऱ्या महाभूतांच्या कारण ठरते,,आणि हा कार्यकारण तेचा खेळ आत्मतत्वातच होत असतो,,,

आणखी एक अर्थ ह्या ठिकाणी मांडला आहे की '''त्याच्या सत्तेत राहून वायू प्राण्यांच्या कर्माची धारणा करतो,''',,म्हणजे काय??योग्शास्त्राचा आधार घेतल्यास प्रत्येक प्राणिमात्रामध्ये वायू हा प्राणरूपात संचार करीत असतो,,आणि त्यामुळेच प्राणिमात्र आपली कर्म करू शकतात,,,व्यावहारिक भाषेत प्राण आहे तोवरच आपण काही करू शकतो,,आणि प्राण गेले की???प्राणी कर्म करू शकत नाही,,मग वरील विचनास अनुसरून प्राणरूपातवायूचे अधिष्ठान आकाश आणि आकाशाचे अधिष्ठान आत्मतत्त्व,,म्हणजेच प्राणांचेहीअधिष्ठान आत।तत्वाचा,,,,कर्माचेही अधिष्ठान आत्मतत्वच,,,ही सर्व विचारांची घडी बसली की ''प्राण गेला म्हणजे मी गेलो,''हे भय शिल्लकच राहणार नाही,,करण अधिष्ठान रुपात मी आहेत,,,

# ईश उपनिषद – २४

आत्मतत्वाची सर्व व्यापकता सांगताना आचार्यांनी विरोधाभासात्मक पद्धती मांडली आहे,,आणि आता ह्या ५ व्या श्लोकात तर ह्याची परिसीमा गाठली आहे,,आणि हेच आचार्यांच्या विवेचनातील खरे सौन्दर्य आहे,,हे वेदांताचे खरे सौन्दर्य आहे,,,मी सौन्दर्य ह्यासाठी म्हणते की ह्याठिकाणी अगदी खऱ्या अर्थाने एक साधक म्हणून आपला दृष्टिकोन आपल्याला तपासता येतो,,आणि माझी साधना अधिक खुलविता येते,,,आणि मग जीवनाचे खरे सौन्दर्य कशात आहे ते लक्षात येते,,,ह्या श्लोकात तीन गोष्टी आचार्यांनी विदित केल्या आहेत




१)आत्मतत्त्व हालचाल करते आणि हालचाल करीत नाही,,,

२) ते दूर आहे आणि ते जवळही आहे,,

३) ते सर्वांच्या आत आहे आणि सर्वांच्या बाहेरही आहे,,,,

ह्याचा विचार आपणांस दोन दृष्टिकोनातून करायचा आहे,,तो म्हणजे

१)निरुपाधिक दृष्टिकोनातून,,

२)उपाधीच्या दृष्टिकोनातून,,,

उपाधीच्या दृष्टिकोनातून विचार केल्यास सापेक्षता येते परिछिन्नता येते,,आणि निरुपाधिकतेत ह्या सापेक्षतेची उपाधी गळून पडते,,,आता ह्या दृष्टीने एक एक मुद्द्याचा विचार केल्यास

१)आत्मतत्त्व हालचाल करते,,आणि हालचाल करीत नाही ::हा मुद्दा विचारात घेतल्यास परिवर्तनीयता ही उपाधी घेतल्यास ह्या आधीच म्हटल्या प्रमाणे प्रत्येक परिवर्तनीयतेचे अधिष्ठान अपरिवर्तनीयता


असते,,,आता हालचाल करणारी वस्तू जेव्हा आपण बघतो तेव्हा उपाधीच्या दृष्टिकोनातून ती हालचाल करते आहे कारण तेथे काळ आणि अंतर हे दोन्हीही उपाधी कार्यरत आहेत,,पण ज्याच्या आधारे ही हालचाल होते ते तत्व मात्र स्थिर आहे,,

आज समुद्र शांत आहे आज खवळला आहे हे विधान मी त्याच्या लाटांना अनुसरून करते पण त्याचा सागरावर काहीही परिणाम होत नाही,,,सागरातील नाव हेलकावे खाईल सागर खवळलेला दिसेल पण अंतर्यामी तो अत्यंत प्रशांत आहे,,,ह्याठिकाणी उपाधीच्या दृष्टीने सागर खवळला पण निरुपाधीकतेतून तो शांतच आहे,,,

मी गाडीने प्रवास करते,,वास्तविक गाडी चालत असते गती गाडीला असते आणि त्याच्या आत बसलेली मी मात्र स्थिर असते,,, रात्रीच्या वेळी फिरत असताना मला समोर भूत दिसले पण जवळ जाऊन पाहिले तेव्हा तो खांब होता ,,खांब स्थिर होता,,,मला उपाधीच्या दृष्टीने तो भूत वाटला,,,पण जवळ जाऊन पाहिले उपाधी दूर झाली आणि मला खांबाचे दर्शन झाले,,किती छान,,, पुढे आचार्य म्हणतात की हे आत्मतत्त्व दूर आहे आणि जवळही आहे,,पुन्हा तोच विचार,,,दूर का आहे??कारण मी माझ्या आयुष्यात कायम शरीर मन बुद्धी ह्या उपाधीने सत्य मानले,,आणि त्या अनुषंगाने देहिक सुख सर्वस्व आहे आणि तेच प्राप्त करण्यासाठी आयुष्य खर्ची घातले,,त्यामुळे देह सत्यत्व भ्रांती माझी गेलीच नाही परिणामी जगत सत्यत्व भ्रांती पण माझी गेली नाही,,,पण आता निरुपाधिक पणे पाहिले असता ते तत्व मीच आहे असा मला अनुभव आला,,मी प्रवासाला निघाले तेव्हा माझे गाव ५० किमी होते,,पण आता मी ० मैलाच्या दगडावर उभी आहे आता माझे माझ्या गावपासूनचे अंतर किती,???देहसत्यत्व जगतसत्यत्व ही उपाधी आहे तोवर आत्म तत्व दूर आहे पण जेव्हा ही उपाधी गळून पडली तेव्हा मात्र त्याचे नि माझ्यात अंतरच राहिले नाही नवे ते मीच आहे ही अनुभूती आता ते माझ्यापासून किती दूर??? आणखी एक मुद्दा आचार्य मांडतात की ते सर्वांचा आतही आहे आणि बाहेरही,,,उन्हाळा आहे आजच घरी माठ आणला,,विचार केला की ह्या मठातील आकाश आणि त्याच्या बाहेरील आकाश ह्यात फरक आहे का??उत्तर मिळाले .....

# ईश उपनिषद – २५

स्वरूपाची ओळख करून घेण्याची शास्त्राची एक पद्धत आहे,,,‘‘‘जे माझे आहे ते मी नाही‘‘‘ ही घडी प्रथम बसवून घ्यायची आणि त्यानंतर ‘‘‘मी काय काय नाही ‘‘’’’ह्याचा दृढ निश्चय करीत जायचा,,,‘‘काय नाही ‘’हे बाजूला सारले की ‘काय आहे‘ हे कळत,,आणि हे कळल्यावर




मग काय नाही आणि काय आहे ह्या सर्वांचाच निरास होतो,,,आणि हे सर्व सांगत असताना आचार्यांनी विरोधाभासातून ही गोष्ट मला छान पटवून दिले आहे,,,

एकदा का आत्मतत्त्व जाणले की सर्व भूतमात्रात तेच विद्यमान आहे ह्याची प्रचिती आल्याशिवाय राहत नाही ,,आणि अशी प्रचिती येऊन व्यवहार करणारा आत्मज्ञानीआहे,,,देहाच्या स्तरावर ह्या सृष्टीत कितीतरी देह असतील पण चैतन्याच्या स्तरावर मात्र त्यात काहीही भेद नाही,,,माझ्यात जे चैतन्य आहे तेच चैतन्य अखिल सृष्टीत विद्यमान आहे ही दृष्टी होणे व त्यानुसारच व्यवहार होणे हे आत्मज्ञानाची लक्षण आहे,,,जगामध्ये ब्रह्म दिसेउघडे,,,अशी त्याची स्थिती असते,,,

**** मातीचे कितीही प्रकारचे भांडे आणले तरी भांड्यांचा आकार रूप न पाहता त्यातील माती हे तत्व महत्वाचे: *****सागरावर लाटा कितीही असू देत पण पाणी तत्व हे प्रत्येक लाटेत थेंबात तेच आहे,,,


****दागिना कोणताही असू देत त्यातील सोने तत्व एकच आहे,,

*****देह कोणताही असू देत त्यातील आत्मतत्त्व एकच आहे,,माझा आत्मा वेगळा तुझा आत्मा वेगळा असे म्हणता येणार नाही कारण तो दाखविता येईल अशी जड वस्तू नाही,,,

आता ह्याठिकाणी आणखी एक मुद्दा ह्यातूनच निघतो की अशी तत्वाच्या स्तरावर जरसमत्व बुद्धी माझी झाली असेल तर तत्वाच्या स्तरावर मी आणि इतर ह्याच्यात काहीच फरक नाही,,,मग मी द्वेष कुणाचा करावा,,राग कुणाचा करावा,,कारण राग अथवा द्वेष करण्यासाठी दोन घटकांची गरज असते,,,पण ह्या ठिकाणी मी आणि तू हा भावच नाही,,,ह्याठिकाणी वेगळेपणाचा भावच रहात नाही,,,वेगळेपणाची भावाचा तेथे कायमचावियोग होतो,,,असे जेव्हा घडते तेव्हा व्यक्ती विलक्षण शांतता अनुभवतो,,,आणि अशा शांत चित्तात सात्विक विचारांचे प्रतिबिंब निश्चित पडते,,,हीच अनुभूती ऋषींनी घेतली,,,हीआत्मतत्वाची अनन्यता व्यक्ती भेद वस्तू भेद आंतरिक बाह्य भेद मिटवतो,,,किती छान,,,,

# ईश उपनिषद – २६

गणितात एक नियम असतो की पहिली पायरी चुकली की पुढच्या सगळ्या पायऱ्या तर चुकतातच पण त्या गणिताचे उत्तरही अचूक येत नाही,,,व्यवहारात जीवन जगतानाही असेच असते,,जीवन सार्थक आणि यशस्वी करायचे असेल तर माझ्या जीवनाची पहिली पायरी चुकायला नको,,आणि ह्याठिकाणी आचार्यांनी आपल्याला आपले पहिले पाऊल अचूक दिशेला ठेऊन दिले आहे आणि आपल्याला आपल्याही जीवनाची यशस्वी आणि सार्थक वाटचाल करून आपल्या ध्येयाप्रत पोहोचायचे आहे,,,




सर्वत्र आत्मतत्वाची अनुभूती ,,सर्वामध्ये एकच तत्व पाहणे ही ती पहिली पायरी होय आणि हे एक तत्व पाहण्याकरिता बऱ्याच बाबींचा निरास करावा लागतो,,,पण नेमके घडतंय काय की आमच्या भोवती इतके पाश आम्ही बांधून घेतले आहेत ,,आणि महत्वाचे की हे पाश मीच बांधून घेतले आणि सोडवायचेही मलाच आहेत,,,पण ह्याची जाणीवही मला नाही,,

अगदी कळस म्हणजे हे पाश आहेत हेही मला कळत नाही,इतके ते माझ्याशी एकरूप झाले आहेत,,आणि मी त्यांच्याशी,,,आणि जेव्हा हे पाश मला अवळतात तेव्हा मग मीच ईश्वराचा धावा करतो आणि मला आता ह्या पाशातून सोडावं ही प्रार्थना करतो,,,अशावेळी आचार्यासारखे गुरू आपल्याला ह्याची जाणीव करून देतात आणि मग आपणच आपली

सोडवणूक करण्याची इच्छा बाळगतो,,मग आता हे पाश म्हणजे माझ्या जीवनाचेचुकलेल्या गणिताच्या चुकलेल्या पायऱ्या होत हे जर लक्षात आले तर पहिली पायरी काशी सोडवायची ह्याचे मार्गदर्शन घ्यावेच लागेल,,कारण माझ्या गणिताचे उत्तर मला अचुकच हवंय,,,हे सहा पाश आहेत,,,

१)घृणा:–घृणाचा भाव हा माणसाला माणसापासून दूर करतो,,,बघा माझे शरीर कितीही घाण झाले तरी मला त्याची किळस येत नाही पण तेच इतरांची सेवा करण्याची वेळ येते तेव्हा आपल्याला घृणा वाटते ,,ह्यामुळे भेदाभेद निर्माण होतो,

२)शंका:–माणसाचे मन अत्यंत शंकेखोर आहे,,मनात शंका आली की त्याचे निरसन करण्यात आयुष्य निघून जाते,,,मन संशयी बनते आणि संशयात्म विनश्यति हे ही आपणास महित आहे,,मग ह्या शंकेची जागा ताबडतोब विश्वासाला द्यावी जीवनातील कितीतरी समस्या कमी होतील,,शंकेखोर मन जीवनाची हानी करतो,, आणि जीवन व्यर्थ जाते,,,


३)लज्जा:–बऱ्याचदा चांगल्या गोष्टी करायला आपणास संकोच होतो कुणी काही म्हणेल का ह्याचे विचार आपण जास्त करतो किंवा ज्या करू नये त्या गोष्टी आपण करतो आणि मग जीवनात पाश्चात्तापाची वेळ येते,,,

४)अनादर :–आपला अहंकार इतका वाढतो की त्या अहंकारपुढे इतरांना तुच्छ लेखण्याची वृत्ती बळावते आणि त्यातून अनादर निर्माण होतो घृणा निर्माण होते,,

५) आपल्या कुळाबाबत चा अभिमान:–कुळाबाबत चा अभिमान चांगलाच आहे पण इतरांच्या कुळाला तुच्छ लेखण्याची वृत्ती जर त्यातून वाढली तर ती जीवनाला हानिकारक असते,,म्हणून आपल्या कुळाचा जसा आपल्याला अभिमान आहे तसाच तो प्रत्येकाला आहे आणि प्रत्येकाचा अभिमान सार्थ आहे म्हणून सगळीच कुळे मला अभिमानास्पद आहेत,,,जमेल???,,,पुढील भागात....

# ईश उपनिषद – २७

माझ्या आयुष्याचे गणित मला अचूक सोडवायचे असेल तर मला माझे स्वरूप जाणून घ्यावेच लागेल,,सर्वांभूती असणारे आत्मतत्त्व मला जाणून घ्यावेच लागेल हीच माझ्या जीवनाच्या गणिताची पहिली पायरी आहे ,,ही चुकते तेव्हा आठ पाश व्यक्तीला अवळतात आणि मग फक्त आणि फक्त दुखःशिवाय काहीच नाही,,ह्यापैकी पाच पशांचा विचार आपण ह्यापूर्वी केला,,,




६) शीला बाबत चा अभिमान:-शील चारित्र्य ह्याचे अचूक संदर्भ आपणास ज्ञात असावे,,,प्रत्येकाच्या चारुत्र्याचा आदर महत्वाचा ठरतो,,,पण आज खूप चित्र वेगळे आहे,,जेव्हा आपल्याला कोठेच दोष काढायला जागा मिळत नाही तेव्हा आपण इतरांच्या चारित्र्यावर खूप चिखलफेक करतो,

,७)आपल्याला आपल्या जातीबाबत खूप अभिमान असतो आणि त्याचसोबत इतर जाती बाबत घृणा,,,मित्रानो काळ पुढे सरकतो आहे ,,जग खूप भरारी घेतेय ,,,पण आम्ही कुठे चाललो आहे ह्याचा थोडा विचार जरी केला तरी अंगावर शहारे उभे होतात,,,किती जातीच्या नावाखाली भांडतोय आम्ही,,,जाती व्यवस्था ज्या उद्देशाने झाली तो उद्देश आता संपलाय,,,

व्यवसायाच्या दृष्टीने समाजाचे उत्पादन विनियोग कार्य व्यवस्थित

चालावे ह्यासाठी तत्कालीन गरज म्हणून जाती व्यवस्था निर्माण झाली,,,पण आता व्यवसाय संकर झाला असताना खर तर जाती व्यवस्थेची समाजाला गरजच नाही,,,आम्ही किती कालबाह्य गोष्टीना चिकटून आहोत,,,आणि त्यामुळे घडतंय काय??एक जात दुसऱ्या जातीवर चिखल फेक करते,,द्वेष निर्माण करते,,,वास्तविक पाहता माणसाची जात धर्म संप्रदाय विचार आचार तत्व संस्कृती परंपरा,एकच आणि ते म्हणजे माणुसकी,,,बस,,पटतोय का हा विचार???

८)सर्वात जीवघेणा पाश म्हणजे भय,,,हा शब्दच भीतीदायक आहे,,सतत आपल्या मनात भय असते,,,स्वामी विवेकानंद म्हणतात ‘‘‘निर्भय व्हा‘‘,,बरोबर ,,,हे निर्भय होण्यासाठी मला कोणकोणत्या स्तरावर भय आहे ह्याची अवलोकन करावे लागेल,,, शारीरिक स्तरावर मृत्यूचे भय असते,,,आणि मृत्यू तर अटळ आहे,,, मनाच्या स्तरावर मला दुःखाचे भय असते,,,आणि दुखःशिवाय तर जीवनच नाही,,, बुद्धीच्या स्तरावर मला निर्णय चुकण्याची भय असते,,,आणि आमचे निर्णय हे नेहमीच अचूक असतील असे नाही,,,आता हे भय काढायचे असेल तर एकच मंत्र आहे आणि तो म्हणजे

‘‘‘जे माझे आहे ते मी नाही‘‘‘

शरीर???माझे,,,


मन??माझे,,,

बुद्धी???माझी,,,

मग हे सर्व जर मी नाही तर मी कोण आहे??ह्याचाच तर उत्तर शोधणे हे माझ्या जीवनाचे ध्येय आहे,,,आणि ह्यासाठीच साधनेच्या प्रारंभिक काळात जे माझे ते मी नाही हा विचार पक्का करावा लागतो,,,आणि मग जे माझे आहे ते मी नाही तरी तेमाझ्याजवळ आहे,,जे जवळ आहे ते दूर जाणारच आहे,,आणि जेवढे ते दूर जाईल तेवढेच मी माझ्या जवळ येणार आहे,,तत्वाशी एकरूपता झाली की आनंद आणि फक्त आनंद,,,ह्यासाठी आपली पहिली पायरी महत्वाची आहेच.....

# ईश उपनिषद – २८

हरिओम, जीवनाची यशस्वितेसाठी आपण प्रत्येक पाऊल अत्यंत आत्मविश्वासाने तसेच सावध तेने टाकावे लागते,,आणि ज्या व्यक्तीने आत्मस्वरूप जाणले त्याचे श्रेष्ठत्व काय हे आपण पहिले,,,आचार्यांनी आपल्याला खूप छान पद्धतीने सांगितले,,,ह्या चौथ्या तरंगाचा ह्या अंतिम टप्प्यात आचार्यांनी आत्मसक्षत्काराच्या क्षणाचे व्यावहारिक प्रतिपादन केले आहे,,,




म्हणजे काय?? बरेचदा आपल्याला प्रश्न पडतो की आत्म साक्षात्कार होतो म्हणजे काय??खरच आत्मा नावाची वस्तू आहे का?? ती कशी असते??ती दिसल्यावर काय होते??खूप प्रश्न असतात ह्याबाबत,,,,

पण एक लक्षात घेण्यासारखी बाब अशी की व्यक्तीच्या बाह्य वर्तनावरून नव्हे तरअंतरीच्या स्थितीवरून ती व्यक्ती आत्मसाक्षात्कार आहे असे आपण म्हणू शकतो,,संतांनीही म्हटले आहे ‘‘‘अंतरीच्या खुणा अंतरनिष्ठ जाणती’’‘,,,आणि आत्मा ही कोणती जड वस्तू नव्हे जी पाहता येईल,जीचे वर्णन करता येईल,,आणि ह्याचे वर्णन आपण चवथ्या श्लोकापासून पाहिले,,

आता अशी आत्मसाक्षात्कार व्यक्तीची अवस्था कशी असते ह्याचे वर्णन करताना श्लोकांच्या सुरवातीलाच आचार्यांनी यस्मिन हा शब्द

वापरला,,,ह्याचाच अर्थ ज्या क्षणाला आत्मसक्षत्कार झाला तो क्षण,,आत्मनुभूतीचा क्षण,,ह्या क्षणी त्याला ही अनुभूती येते कीमाझ्यात जे तत्व आहे ते आणि सर्वात असणारे तत्व एकच आहे त्यात भेद नाही,,वर वर सर्व विसंवाद जाणवत असला तरी अंतस्थ ऐक्य सर्वात आहे,,, समुद्रात लाटा वेगळ्या असतील आकार वेगळे असतील पण प्रत्येक लाटेला विचारा तुझे मूळ रूप काय??तिचे उत्तर असेल पाणी,,,मग ह्या पाणी तत्वाचा साक्षात्कार हाआत्मसाक्षात्कार होय,,,

**भेदाभेदच संपला,,,

**आता मी आणि विश्व ह्यांच्यात भेदच नाही,,,

**वैष्णवांचे जग,,वैष्णवांचा धर्म,,,

**सर्वांभूती परमेश्वर,,,

**अहं ब्राह्मस्मि,,

**ते मीच आहे,,

**मीच विश्व आहे,,,

**कोण तो कोण मी??

**हा भेदच नाही,,,

**मीच विविध रुपात अभिव्यक्त झालो,,,

किती छान,,,आता मीच अभिव्यक्त झालो तर भेद कुठे राहिला??हीच अनुभूती संतांची होती,,सर्व चारचरामध्ये मीच व्यापले आहे,,,

आता विश्वात्मकें देवे ही ज्ञानदेवांची ,


आनंदाचे डोही आनंद तरंग ही संत तुकारामांची अनुभूती,

कांदा मुळा भाजी अवघी विठाबाई माझी ही सावता माळी ह्यांची तर

अवघा रंग एक झाला रंगी रंगला श्रीरंग हि सोयरबाईंची अनुभूती होती,,,असा क्षण जेव्हा साधकाच्या जीवनात येतो तेव्हा त्याची दृष्टी काशी होते ते ह्या तरंगात वर्णन केले आहे,,,पुढील भागात ....

# ईश उपनिषद – २९

हरिओम, ह्याठिकाणी यस्मिन हा अतिशय सुंदर शब्द आचार्यांनीवापरला,आत्मसाक्षात्काराचा क्षण ह्याठिकाणी नमूद केलं आहे,,ह्या एक क्षणाचे आपल्या जीवनात अनन्या साधारण महत्व आहे,,,‘‘‘देवचिये द्वारी उभा क्षण भरी‘‘असे संतांनीही म्हटले




आहे,,आपल्या प्रापंचिक जीवनातही बघा न,,एक क्षणापूर्वी चिसौकाअसणारी आपली कन्या अगदी एकाच क्षणानंतर सौभाग्यवती बनते,,,एकाच क्षणात स्त्रीमाता बनते,,एकाच क्षणात नरेंद्र विवेकानंद झाले,,हे आहे,आणि ह्यासाठी एक क्षण पुरेसा असतो,,किती छान,,आता ही पायरी अचूक झाली की ह्याआत्मपरिवर्तनाचा प्रगट अविष्कार कसा असतो ह्याचे सुंदर वर्णन आचार्यांनी केले आहे,,,आणि तीन लक्षणे त्यांनी सांगितले

१)आत्मसक्षत्कार झालेल्या व्यक्तीस मोह उरत नाही,

,२)त्याला शोक उरत नाही,,

३)तो आत्मतत्वाचा अनुसंधानात असतो

१) आत्मसाक्षात्कार झालेल्या व्यक्तीस मोह उरत नाही,,,मोह म्हणजे विपरीत ज्ञान,,,जे जसे आहे तसे दिसत नाही ,,,आणि मग त्याठिकाणी आपल्या मनाची फसवणूक होते,,,अनात्म वस्तू आत्म वस्तू भासते,,वाईट गोष्ट चांगली वाटते,,जे माझे नाही ते माझे वाटायला लागते,,,असत्य


सत्य वाटायला लागते,,,ह्याला मोह म्हणतात,,,पण ज्याने ह्या सर्व चराचर सृष्टीत एकत्व पहिले व ज्याने चैतन्याची अनुभूती घेतली त्याला विपरित ज्ञान होण्याचा प्रश्नच उरत नाही,,आणि तो सर्व दूर आत्मवस्तूचे अनुभव घेतो,,,हा बुद्धीच्या स्तरावरील आत्मनिर्णय होय,

२) आत्मसक्षत्कार झालेल्या व्यक्तीस शोक होत नाही,,शोकाचे मुख्य कारण मोहआहे,,आणि शोक ही संवेदना मनाच्या स्तरावर असते,,आता मोह नाहीस होतो म्हणजेच पाहणारा द्रष्टा,दिसणारे दृश्य ,,आणि जे दिसते त्याचे दर्शन ही त्रिपुटी तेथे संपली आहे,,ही त्रिपुटीच माणसाला खूप त्रास देत असते ,,,आणि तीच संपली म्हणजे मोहच संपला,, दुःखाचे शोकाचे कारणच नष्ट झाले,,‘‘,पाहता पाहणे गेले दूरी‘‘असे संतांनी म्हटले ती हीच अनुभूती होय,,अर्थात मानसिक स्तराच्या पलीकडे ही व्यक्ती गेलेली असते,,

३)ती सर्वात एकत्व पाहते,,, मित्रानो हे अनुसंधान आहे,,हेच ध्यानाची प्रक्रिया आहे, सर्वदूर आता केवळ आणि केवळ आत्मतत्वच अनुभवायला येतंय,,,भरला हरी घनदाट ही ती अनुभूती आहे,,,चालता बोलता आत्मतत्वाचे अनुसंधान,,, त्याचेच ध्यान,,ह्यालाच तर Open eye Meditation म्हणतात,,,,किती छान.

# ईश उपनिषद – ३०

हरिओम,,,भारतीय तत्वज्ञानाचे वैशिष्ट्य म्हणजे ''अधिकार तैसा करू उपदेश''ज्याचा जसा अधिकार आहे ,ज्याची जशी कुवत आहे तेथूनच त्यांची प्रगती व विकास करण्याची सुविधा तत्वज्ञानात आहे,,माझ्या व्यक्तिमत्वाचा जो घटक प्रबळ आहे त्याचाच उपयोग करून व त्याच्याच साहाय्याने क्रमविकासाची योजना जी वेदांत तत्वज्ञानात आहे तेवढी विकासाची सुंदर योजना आपल्याला कोठेच आढळत नाही,,




जे शरीर प्रधान आहेत त्यांना कर्ममार्ग सांगितलं आहे,कर्म करण्यासाठी ज्ञानेंद्रियाने अनुभव व कर्मेंद्रियच्या माध्यमातून कार्य ही क्रिया असते,,,ज्ञानेंद्रिय ज्ञान ग्रहण करतात व कर्मेंद्रिये त्याचे उपयोजन करतात ,,मग ग्रहण व उपयोजन ह्या दोन्हीही गोष्टींना योग्य वळण लावणे आणि ह्याच कर्माला निष्काम कसे करावे ह्याचे मार्गदर्शन तत्वज्ञान करते,,,,आणि निष्काम कर्मकडून नैशकर्म्य सिद्धी कडे नेतो व त्यातून स्वतःचा विकासाची परिसीमा गाठून आनंदाची प्राप्ती कशी करायची हे शिकवितो,,ह्यासाठी तत्वज्ञान उपासनासेवा हा मार्ग शिकविते

जी लोक भावनाप्रधान आहेत त्यांच्यासाठी तत्त्वज्ञानाने भक्तिमार्ग सांगितला आहे,,ह्याचे कारण भक्ती म्हणजे प्रेमाची पराकाष्ठा,,,प्रेमाची अत्युच सीमा किंबहुना त्याच्याही पलीकडे,,अविभक्त ,,,जो अविभक्त आहे तोच भक्त,, प्रेम भक्ती ही भावना आहे आणि हे कार्य आपल्या

व्यक्तिमत्वात मनाकडे दिले आहे,,मनाच्या माध्यमातून सुख दुःख ह्या भावना कळतात आणि मग मी म्हणते मी भावुक आहे,,, भक्तीच्या माध्यमातून मग ह्या मनाचे उन्नयन कसरून स्वविकसन कसे करावे हे तत्वज्ञानानी सांगितली आहे,,

बुद्धी प्रधानतेसाठी ज्ञान मार्गाची योजना आहे,,ज्ञान म्हणजे आत्मज्ञान,,आणि ज्ञान प्राप्तीसाठी आत्मनिर्णय महत्वाचा असतो आणि निर्णय करण्याचे कार्य बुध्दिकडे देण्यात आले आहे,,बुद्धीच्याच स्तरावर जे माझे आहे ते मी नाही हा निर्णय होतो आणि मग मी काय आहे कोण आहे ह्याचा विवेक शक्य होते,,,

आपल्या लक्षात आले असेल की उपासना भक्ती आणि ज्ञान हे तीन मार्ग जे तत्त्वज्ञानाने सांगितले आणि त्याच्या उपयोजनेचे स्वातंत्र्य पण दिले,,,कोणतीच उपासना कमी नाही,कोणतीच भक्ती कमी नाही आणि आत्मज्ञान तर सर्वश्रेष्ठ आहेच,, पण ह्यात आणखी एक महत्वाचा मुद्दा असा की हे तिन्ही मार्गात समन्वय असणेही महत्वाचे आहे,

निष्काम कर्मानेच चित्त शुद्धी होते,,

शुद्ध अंतःकरणात भाव प्रेम शुद्ध उत्पन्न होतात ,

आणि अशा शुद्ध अंतकरणाने केलेल्या भक्तीतून आत्मज्ञान प्राप्तीसाठी ची मनोभूमी तयार होते . आणि ह्याच मनाचा बुद्धीत लय होऊन आत्मज्ञान साठी सिद्ध होते


ही प्रक्रिया होत असताना शरीर मन बुद्धीचे ऐक्य होते ,,,कर्म उपासनेत,उपासना भक्तीत ,आणि भक्ती ज्ञानात ,,,आणि मग ज्ञानही ब्रह्मतत्वात विलीन होते,,,आणि उजेडी राहिलो उजेडी होऊन ही अनुभूती येते,,,किती छान,,,

ह्या दृष्टीने पाहता ईश उपनिषद म्हणजे आत्म विकसनाची गुरुकिल्ली आहे असे म्हटले तर वावगे होणार नाही,,,हा विचार आपण आतापर्यंतच्या चार तरंगमध्ये केलेला आहे .....

# ईश उपनिषद – ३१

ईश उपनिषदाच्या चौथ्या तरंगात शेवटच्या टप्प्यावर आचार्यांनी आत्मतत्वाचे नित्य लक्षण विशद केले आहे,,आता ह्याठिकाणी जिथे आत्म्याचे वर्णन करता येत नाही तेथे आचार्यांनी कसे केले,,मग त्यांना तो दिसला होता का असे विविध प्रश्न ह्याठिकाणी उपस्थित होतात,,

पण हे वस्तूचे वर्णन नसून त्याच्या लक्षणाचे वर्णन आहे हे आपण




जाणून घ्यायला हवे,,या ठिकाणी आचार्यांनी जणूकाही आत्म्याचे शब्द चित्रच आपल्या समोर उभे केले आहे,,वास्तविक पाहता आत्म्याचे वर्णन करता येत नाही कारण वर्णन हे ज्ञेय वस्तू चे होते पण आत्मा ज्ञाता आहे,,,वर्णन दृश्याचे होते पण आत्मा द्रष्टा आहे,,तो कारणाचेहीकारण आहे आणि त्याचे कारण कोणीच नाही,,म्हणून त्याच्या वर्णनाकरिता कोणतेहीप्रमाण वापरता येत नाही,,पण त्याची लक्षणे मात्र आपण जाणून घेऊ शकतो आणि ही लक्षणे नेती नेती ह्या मार्गाने ऋषींनी आपणास सांगितली,,आणि आपला मार्ग सोपा करून दिला,,,ह्याठिकाणी आठव्या क्रमांकाच्या श्लोकांचे शब्द शः भाषांतर केले तर ते पुढीलप्रमाणे होईल

‘‘तो म्हणजेच आत्मा सर्वत्र असलेला शुद्ध अशरीरी,कोणताही डाग नसलेला,स्नायू नसलेला,निर्मल व पापशून्य आहे,,तो कवी आहे,मनाचा शास्ता आहे,,तो सर्वात विद्यमान आहे,स्वतः प्रगत होणारा असा


आहे,,त्याने अनादिकालापासून ज्याच्या त्याच्या योग्यतेनुसार कामे वाटून दिली आहे,,‘‘‘

अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण असा हा श्लोक आहे,,,ह्यात जो आत्मतत्वाचा वर्णनाचा क्रम आचार्यांनी सांगितलं त्याचे वैशिष्ट्य आहे,,ही संस्कृत साहित्याचे सौन्दर्य आहे,,ह्याठिकाणी आणखी एक बाब महत्वाची की शब्दशः अर्थ घेतला तर विपर्यास होऊ शकेल,,,आपल्याला व्यंजना लक्षत ठेवायची नाही तर त्याची लक्षणा बघायची आहे,,,

पुष्कळदा तत्त्वज्ञानाच्या बाबतीत हाच प्रमाद झाला की आम्ही त्याचे अनेक चुकीच्या पद्धतीने अर्थनिर्वचन करीत बसलो,,शब्दश अर्थ काढीत बसलो,,आणि आपणच त्यावर टीका केली,,कोणत्याही शास्त्राची अध्ययनाची जी पद्धत असते त्याच पद्धतीने ते झाले पाहिजे,,,नदीच्या काठावर बसून पोहायचे कसे हे शिकता येणार नाही,,त्यासाठी नदीत उडी घ्यावी लागेल,,आणि आम्ही नेमके आमच्या तत्त्वज्ञानाच्या बाबतीत हेच केले,,,वास्तविक वेदांत तत्वज्ञान हे सनातन नित्यनूतन सार्वभौम आहे,,,भेदरहित आहे,,,आत्मतत्वाचे जे क्रम बद्ध वर्णन आचार्यांनी केले आहे ते पुढील भागात,,,

# ईश उपनिषद – ३२

आत्मतत्वाचे नित्यलक्षण आचार्यांनी ह्याठिकाणी वर्णन केले आहे,,,ह्याठिकाणी आत्मतत्वाचे वर्णन करताना पर्यगात हा शब्द वापरला आहे आणि पर्यगात ह्याचा अर्थ दूर गेलेला किंवा सभोवार गेलेला,,आत्मतत्त्व विस्तार पावण्यासाठी बाहेर गेले हा त्याचा शब्दशः अर्थ,,,मग पुन्हा प्रश्न उद्भवते की ती तर प्रत्यक्ष वस्तु नाही मग ती बाहेर पडली कशी??आणि तिचा विस्तार झाला म्हणजे काय??ह्या सगळ्याची




उत्तरे तत्वबोधात आपल्याला पाहायला मिळतात,,,

एकोहम बहुस्यांम ह्या स्फुरणाशी ह्या विधानाचा संबंध आहे,,ह्या स्फुरणानंतर मायेशी एकरूप होऊन त्रिगुणाची निर्मिती होऊन पंचमहाभूतात्मक अष्टधा प्रकृतीची निर्मिती झाली,,आणि ज्या ब्रह्मतत्वात एकोहम बहुस्यम हे स्फुरण झाले होते ते प्रत्येक तत्वात प्रत्येक घटकात शिरले,,आता ह्या सगळ्या विवेचनाच्या दृष्टीने केलेले कल्पना आहेत,,पण ह्याचा आशय हा की ह्या सृष्टीतील एकही जागा अशी नाही ज्या ठिकाणी ब्रह्म नाही,,चैतन्य नाही,आत्मतत्त्व नाही,,ही त्याची सर्वव्यापाकता आहे,,आता फक्त आपल्याला ती दृष्टी येणे महत्वाचे आहे,,,शिवाय एकाच तत्वाला स्फुरण झाले व त्याची नामरूपात्मक अभिव्यक्ती वेगळी झाली पण सर्वांचे साक्षी तत्व मात्र एकच आहे,,ही बाब एक सुंदर

कल्पनेच्या माध्यमातून आचार्यांनी व्यक्त केली,,

ह्याठिकाणी आणखी एक शब्द वापरला आहे आणि तो म्हणजे शुक्रम,,,ह्याचाच अर्थपरमतेजोमय,,,म्हणजे ते खूप चककते काय??अजिबात नाही,,पण त्याच्याच प्रकाशात आपण संपूर्ण जगताचा अनुभव घेऊ शकतो,,बुद्धीची देवता तेज आहे,,तेजाचे अस्तित्व असते म्हणून आपली बुद्धी कार्यरत असते,,पण हे तेज जेव्हा नाहीसे होते तेव्हा बुद्धीचेही कार्य रहात नाही,,म्हणून ह्या ठिकाणी तेज ह्याचा अर्थ त्याच्या अस्तित्वामुळे ह्या जगताचे ज्ञान आपल्याला होते,,असे तेजाचेही तेज असणारा हे तत्व म्हणजे परमतेजोमय असे तत्व आहे,,,हे प्रकाशदायी तत्व आहे,,मी आहे ही जाणीव देणारे हे तत्व,,,आणि म्हणून हे परम तेजोमय आहे,,,

तिसरा शब्द ह्याठिकाणी आला आहे तो म्हणजे हे आत्मतत्त्व अशरीरी आहे,,,आकायिक आहे,,म्हणजे काय??त्याला शरीर नाही तर ते कळले

# ईश उपनिषद – ३३

साधनेच्या क्षेत्रात अनेकदा साधकाला प्रश्न पडतात की नेमक्या कोणत्या मार्गाचे अनुसरण करावे?ज्ञान मार्गाचे??कर्ममार्गाचे ??की भक्तिमार्गाचे??आणि नेमके ह्या उपनिषदात ह्याचे उत्तर आपणास सापडते,,आणि साधनेचा उत्कृष्ट क्रम विकास सांगितला आहे,,,आणि साधनेच्या आशा टप्प्यावर साधक येतो की त्याला तत्वाचे ज्ञान प्राप्त होते,, आत्मतत्वाचे वर्णन करताना




आचार्यांनी आणखी एक शब्द आचार्यांनी वापरला आहे आणि तो म्हणजे आत्मा अशरीरी आहे,,,शब्दशः अर्थ घेतले तर आत्म्याला शरीर नाही,,,असा होतो आणि मग गोंधळ होतो,,,टीका होते की शरीर नाही तर तो दिसला कसा??आणि मग जो दिसलाच नाही त्याचे वर्णन कसे करायचे?? असे अनेक गोंधळ ह्यासाठी उत्पन्न होतात की आपण केवळ शाब्दिक गोंधळ करतो,,लक्षणेचा विचारच करीत नाही,,,शरीर हा शब्द आला की भारतीय तत्त्वज्ञानातील एक महत्वाची उपपत्ती चा आपल्याला विचार करावा लागेल आणि ती उपपत्ती म्हणजे पंचकोशात्मक व्यक्तिमत्वाची,,मानवाचे व्यक्तिमत्व हे पंचकोशात्मक असते,,,म्हणजे काय??बघा,,

१)अन्नमय कोष:–ह्याच्या नावातच ह्याचा अर्थ दडला आहे,,अन्नावर ज्याचे पोषण होते तो आपला स्थूल देह ,,,आपल्या पित्याने ग्रहण केलेल्या अन्नामुळे तो निर्माण होतो,,आपल्या अन्नग्रहणामुळे तो वाढतो आणि मृत्यूनंतर तो पुन्हा अन्न निर्मितीस कारणीभूत ठरतो,,,पंच ज्ञानेंद्रिय व पंच कर्मेंद्रियाने युक्त असा हा देह म्हणजे अन्नमय कोष होय

२) प्राणमय कोष:-अन्नमय कोषाहुन सूक्ष्म असणारा कोष म्हणजे प्राणमय कोष,,,आपण नित्य श्वास उश्वास घेतो,,आणि त्यामुळे आपल्या शरीरात प्राणवायू खेळतो,,व तो संपूर्ण देहाला व्यापते,,प्रत्येक पेशीपर्यंत तो जीवन चैतन्य पोहोचवतो म्हणून आपण प्राणायामाच्या माध्यमातुन आपले आरोग्य स्थिर राखण्याचा प्रयत्न करीत असतो,,


३)मनोमय कोष:-आपल्या व्यक्तिमत्त्वातील तिसरा महत्वाचा कोष म्हणजे मनोमय कोष,,,हा प्राणमय कोषापेक्षा सूक्ष्म आहे,,ह्याचे महत्वाचे कारण म्हणजे प्राणमय कोष हा आपल्या देहापुरता मर्यादित आहे पण मनोमय कोष मात्र आता देहाच्या अतीत जाऊन सुख दुःख राग द्वेष प्रेम आशा विविध भावनांची अनुभूती घेतो,,मनाचे स्थान आपल्या विचारात असते,,मन सतत संकल्प व विकल्प करीत असते,,,आणि अतिशय चंचल असा हा व्यक्तिमत्त्वातील घटक पण साधनेच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्वाचा घटक,,,कारण जेवढे मन शांत स्थिर तेवढी साधना बळकट होते

४)विज्ञानमय कोष:-हा बुद्धिमय कोष आहे आणि हा मनापेक्षा सूक्ष्म आहे,,ह्याचे कारण मन हे आपणास माहीत असलेल्या प्रांतातच विहार करते पण बुद्धी मात्र अनभिज्ञ प्रांतात विहार करते,,,मनाचे विकसित रूप म्हणजे बुद्धी ,,कारण मन संकल्प विकल्प करते तर बुद्धी निर्णय देते,,,निश्चयातमीक मन म्हणजे बुद्धी असे म्हटले तर वावगे होणार नाही,,,

५)आनंदमय कोष:-ज्यावेळी आपणास शरीर मन बुद्धी ह्याच्या पलीकडे जाऊन आनंदाची अनुभूती येते,,,सुषुप्ती अवस्थेत जी जाणिवेच्या स्तरावर असते तेव्हा आपण ही अवस्था अनुभवतो,,,उदा जाणिवेच्या स्तरावर ज्याला आम्ही गाढ निद्रा म्हणतो त्यावेळी आपण सर्व जाणिवेच्या पलीकडे असतो,,,त्यावेळी आपण अत्यंत आनंदाचा अनुभव घेत असतो,,पण ही अवस्था अविद्येची असते,,,आणि नेणिवेची म्हणजे जेथे आपले सर्व अनुभव सम्पलेले असतात,,,हा आनंदमय कोष होय,,,,

# ईश उपनिषद – ३४

व्यक्तिमत्वाचे पंचकोशात्मक विवरण आपण पाहिले,,हे पंचकोष म्हणजे स्थूलकडून सूक्ष्मकडे जाणारे व्यक्तिमत्व विशेष आहेत,,,आता प्रश्न असा उदभवतो की हे कोष आहेत म्हणजे काय??हे परस्परात मिसळले आहेत का??हे काही पापुद्रे असतात का??नाही ह्यातील काहीही नाही,,,आपले स्थूल व्यक्तिमत्व व आपलेसूक्ष्म व्यक्तिमत्व ह्याचे ते निर्देशन आहे,,,शरीर




स्थूल,,त्यापेक्षा मन सूक्ष्म,मनापेक्षा बुद्धी सूक्ष्म ,,आणि बुद्धिपेक्षा आनंदमय कोष सूक्ष्म,,,स्थूल देह अन्नातून निर्माण होतो,अन्नावर संवर्धित होती,,आणि त्याच्या नाशानंतर पुन्हा अन्ननिर्मिती साठी तो कारणीभूत होतो,,,आपल्या शरीराचे मनाचे बुद्धीचे समन्वय असणे अत्यंत गरजेचे असते,,अन्यथा समन्वय नसेल तर असे व्यक्तिमत्व विघटित व्यक्तिमत्व मानले जाइल,,,

मित्रानो एक प्रश्न असा उद्भवतो की आपण जे खातो त्यामुळे हे इतर कोष बनतात काय??अजिबात नाही,,,निर्मिती प्रक्रियेत आपण जे खातो त्यामुळे कोष बनतात असे नाही ,,,पण हो आपल्या अन्नाचे संस्कार मात्र ह्या कोशाच्या कार्यावर परिणाम करतात,,आपण काय पाहतो ऐकतो ह्यावर आपल्या मनावर सातत्याने संस्कार होतात,,आणि मनावर झालेल्या संस्कार मग परिपकव झाले की बुद्धीत परिवर्तित होतात,,,आपल्याला

नेमके हे कळले तर आपल्या व्यक्तिमत्वाची कार्य प्रणाली आपली लक्षात येईल,,,कसे???बघा ज्यावेळी आपल्याला लक्षात येईल की मी मनाच्या स्तरावर जास्त भावनाप्रधान झालेलो आहे त्यावेळी कधीच निर्णय घेऊ नये,,,केवळ शरीरसुखाचाच विचार करणारी व्यक्ती जीवनात क्षणिक सुखानाच प्राधान्य देईल मग त्यात त्याचे मन बुद्धी कार्यरत असत नाही,,खूप छान आहे हे स्वतः ला जाणून घेणे,,,

आता अन्नमय कोष म्हणजेच माझे शरीर कुणाच्या आधारे कार्यरत आहे हा विचार केल्यास माझ्या प्रत्येक अवयवाचे कार्य हे प्राणिक चेतनेने सुरू आहे,,प्राणमय कोष कार्यरत आहे,,,माझ्या इंद्रियमध्ये कार्य करण्याची प्रेरणा देणारे घटक माझ्यातील मनोमय कोष आहे,,आणि मनावर अंकुश ठेवणारा घटक आहे बुद्धी,,,पण बुद्धीत तेज उत्पन्न करणारा घटक कोण,,,आता मी गाढ झोपेत गेलो,,मला माझे अजिबात भान नसते,,पण असे कोणते तत्व असते जे पुन्हा मला जागे करते??

आणि पुन्हा माझ्या मनाचे व्यवहार सुरू होतात??ह्याचे सर्वांचे उत्तर आहे जो सर्वांचा द्रष्टा आहे,,ज्याचा द्रष्टा कुणीच नाही,,ज्याच्या सत्तेवर सगळे व्यवहार चालतात,ज्याच्या सत्तेवर अखिल सृष्टीचे कार्य सुरू आहे,,जो स्वयंप्रकाशित आहे,,असे ब्राह्मतत्व आत्मतत्त्व हे सर्वात विद्यमान आहे,,ते सगळ्या स्थूल सूक्ष्म शरीराला प्रकाशित करते असे आत्मतत्त्व हे अशरीरी आहे,,त्याला स्थूल शरीर असण्याचा प्रश्नच उदभवत नाही .

# ईश उपनिषद – ३५

आत्मतत्वाचे वर्णन करताना आचार्यांनी पुढचा शब्द वापरला तो आहे. अस्नाविरम,,,,अर्थात स्नायू विरहित,,,आत्मा हा स्नायू विरहित आहे,,,स्नायू हे स्थूल शरीरात असतात,,आणि आत्मा हा स्थूल शरीर नसल्यामुळे त्याला स्नायू असण्याची सुतराम शक्यता नाही,,,आत्म्याला स्थूल शरीर नाही सूक्ष्म शरीर नाही कारण शरीर नाही हे सर्व नकारात्मकतेने




आचार्यांनी सांगितले,,,ह्यालाच शास्त्राच्या भाषेत नेती नेती म्हणतात,,,,मग आत्मतत्त्व म्हणजे नेमके काय हा प्रश्न राहतोच,,ह्यासाठी आता आचार्य आत्म्याचे नित्यलक्षणाच्या माध्यमातून आत्मतत्त्व म्हणजे काय हे सांगत आहे,,,


सर्वप्रथम त्यांनी तत्वाचे वर्णन करताना आत्मा हा शुद्ध आहे असे म्हटले आहे,,,आता शुद्ध आहे म्हणजे काय??ही अशुद्धी का येते??बघा शरीराच्या स्तरावर अशुद्धता येते ती अस्वच्छते मुळे,, मनाच्या स्तरावर अशुद्धता येते ती षड्रिपु मूळे, बुद्धीच्या स्तरावर अशुद्धता येते ती मल विक्षेप व अवरणामुळे,,पण आत्मतत्त्व हे सगळ्यांचे साक्षी आहे,,त्यामुळे त्याच्या संदर्भात अशुद्धतेचा प्रश्नच उदभवत नाही,,आत्म्याच्या ठिकाणी कोणतेच स्फुरण नाही त्यामुळे त्याच्या ठिकाणी विकार नाही,षड्रिपु नाही,,कारण तो तिन्ही शरीराच्या अतीत आहे,तो ह्या सर्वांचस प्रकाशक आहे,,,

पुढचा शब्द वापरला आहे,,अपाप विद्धम,, म्हणजेच आत्मा निष्पाप आहे,,,पाप व पुण्य ह्या क्रिया नाहीत तर प्रतिक्रिया आहेत,,,अजूनही हा विचार समाजात रुजला नाही,,आश्चर्य आहे,,आम्ही क्रियाना पाप ठरवितो,,सर्वात जास्त तत्वज्ञानाची हानी कशामुळे झाली असेल तर ती पाप पुण्याच्या संकल्पनेने,,,हे करा पुण्य मिळेल ते करू नका पाप लागेल,,,खूप भीषण आणि अस्वस्थ करणाऱ्या गोष्टी आहेत,,,वास्तविक एखादी क्रिया कृती आपण करतो त्यापासून प्रतिक्रियात्मक दुःख निर्माण होत असेल तर ते पाप आहे,,,आणि आनंद होत असेल तर ते पुण्य,,,फक्त हा आनंद किंवा दुःख निरपेक्ष हवे,,,आता आत्मतत्वाचा ठिकाणी कोणतीही क्रिया किंवा प्रतिक्रिया नाही,,कारण ते सूक्ष्म शरीराच्या पलीकडे तर आहेच पण ते सूक्ष्म शरीराचा द्रष्टा पण आहे,,पापही आणि पुण्याची त्याच्याच प्रकाशात होतो,,,त्यामुळे तो पाप पुण्याच्या पलीकडे आहे,,,

ह्यानंतर आचार्यांनी जो शब्द वापरला तो आहे कविः,,अर्थात तो सर्व द्रष्टा आहे,,ह्याचे सुंदर विवेचन द्रुक दृश्य विवेक ह्या ग्रंथात आपणास पहावयास मिळते,,,सर्व चेतन अचेतन चराचर सृष्टी ज्याच्या तेजाने प्रकाशित होते असा तो सर्व द्रष्टा आहे,,त्याचा द्रष्टा कुणीही नाही,,,त्याच्या प्रकाशातच सर्व व्यवहार होतात,,,

# ईश उपनिषद – ३६

हरिओम,,,आत्मतत्वाचे वर्णन आचार्य करीत आहेत,,एक खूप छान शब्द ह्याठिकाणी वापरला आहे,,मनीषी::ह्याचा अर्थ ज्याचे आपल्या मनावर नियंत्रण आहे,,तसेच जो आपल्या मनाचा शास्ता आहे,,,मन ह्या विषयावर खूप कुतूहल असते,,आणि माणसाची ओळख ही मन ह्या घटकाने होते,,जसे मन तसा व्यक्ती,,आणि मन म्हणजे विचारांचा




प्रवाह,,,म्हणजेच माणसाचे विचार हे माणसाची खरी ओळख आहे,,पण ह्या मनाचे कार्य कसे चालते,,विचार कुठून येतात??ते आपल्याला कसे समजतात??म्हणजेच ह्या विचाराने कोण प्रकाशित करतो???शिवाय मन हे माझे आहे आणि नियम असा आहे की जे माझे आहे ते मी नाही,,मग मन जर माझे असेल तर ते मी कसे असेल,,,पण माझे इंद्रिय तर माझ्या मनाचेच ऐकतात ,,मग ह्या मनाला प्रकाशित करणारे किंवा मनावर शासन करणारी बुद्धी आहे,,,आणि बुद्धीला तेज देणारे हे आत्मतत्त्वआहे,,,ह्या दृष्टिकोनातून विचार केल्यास माझ्या मनाला प्रकाशित करणारे हे आत्मतत्त्व आहे,,

शिवाय एक अजून नियम लक्षात ठेवावे लागेल की जे जड आहे ते स्वयंप्रकाशी नाही,,आणि जे पंचमहाभूतात्मक आहे ते स्वयं प्रकाशित नाही,,,ह्या दृष्टिकोनातून विचार केल्यास मनाचा तो शास्ता आहे,,ह्याचाच आणखी एक अर्थ निघतो की हे आत्मतत्त्व सर्वज्ञा आहे,,सर्व जड व


चेतन सृष्टीला जे प्रकाशित करते असे स्वयंप्रकाशी असे हे तत्व आहे,,,

परिभू:,,तो सर्वात विद्यमान आहे,,,अनुरेणुहून सुक्ष्मस्तीसूक्ष्म जागा अशी नाही जेथे तो नाही,,,त्याने सर्व विश्व व्यापले आहे,,,असे म्हणत असताना जी अष्टधा प्रकृती आहेत त्यात पंचमहाभूते आणि त्रिगुण आहे,,ही मूळ मायेची निर्मिती आहे,,आणि मूळ माया हे त्या तत्वाचे एकोहम बहुस्यम हे स्फुरण आहे,,समुद्र विहीर नदी कोणताही पाण्याचा स्रोत घ्या त्यात पाणी आहेच,,,सोन्याचे दागिने कोणतेही घ्या त्यात सोने तत्व सर्वसामान्य आहे,,,असेच सृष्टीतील कोणताही घटक घेतला तरी त्यात तो आहेच,,,

स्वयंभू:-तो सर्वात विद्यमान आहे त्याने सर्व सृष्टी निर्माण केली पण तो मात्र स्वयंभू आहे,,,ह्याठिकाणी विज्ञानवादी लोकांची एक टीका होते की कार्य दिसते म्हणजे कारण असलेच पाहिजे,,,पण ह्या तत्वाची कितीही वंशावळी काढली आणि कारणांची कारणे शोधली तरी सर्व कारणाचे एक महाकारण असते ज्याचे कारण कुणीच नाही पण जेविनाकारणही नाही,,,असे हे तत्व स्वयंभू आहे,,,,

# ईश उपनिषद – ३७

हरिओम::आत्मतत्वाचे वर्णन नेती नेती ह्या तत्वाच्या आधारे केल्यानंतर आचार्यांनी त्याची नित्य लक्षण सांगितले,,ह्या चौथ्या तरंगाचा अंतिम म्हणजेच आठव्या श्लोकात आचार्यांनी आत्मतत्वाचा वर्णनाचा उच्चांक दिला आहे,,ह्या श्लोकातील शेवटच्या ओळीचा शब्दश: अर्थ आहे,,,''अनादी काळापासून त्याने ज्याच्या त्याच्या योग्यतेनुसार कामे




वाटून दिली आहेत,,'''किती छान,, बघा,,,आपण सृष्टीतील प्रत्येक घटकांकडे पहिले तर ह्याची प्रचिती येते,,,सूर्य उगवतो मावळतो,वारे वाहतात, ऋतू आपले कार्य चोख करतात,,जीवन मृत्यू चे चक्र अव्याहत सुरू असल्यामुळे सृष्टी चक्र व्यवस्थित सुरू राहते,,झाडे ,पाने फुले,पशु पक्षी सर्वांचे आयुष्य निर्धारित आहे,सर्वांचे कार्य निर्धारित आहे,,प्रत्येक घटक हा एकमेकांवर अवलंबून आहे,,**जिवो जीवस्य जीवनम**,,ह्या तत्वावर सृष्टीचा समतोल राखला जातो आहे,,विचार करा ह्यातील एक जरी घटकाने आपले कार्य सोडले तर?? आकाश आहे तो वायूला धारण करतो,,वायू हा सर्व सृष्टीत प्राण व चैतन्य प्रदान करतो,,,वायू च्या आधारे अग्नीचे अस्तित्व आहे,,वायू मुळे अग्नी प्रज्वलित राहतो हे आता विज्ञानानेही सिद्ध केले आहे,,वायूच्या प्रकोपाने अग्नी जास्त प्रज्वलित होतो,,,त्याला शांत करण्याकरिता पाण्याची आवश्यकता आहेच,पाणी हे तर जीवन आहे,,प्रत्येक जीवाची धारणा


पण्यामुळेच तर होते,,ह्या पाण्याला आपल्या उदरात सामावून घेणारी पृथ्वी,,आणि अखिल सृष्टीला अन्नाचे दान देणारी पृथ्वी,,काय काय दडले आहे तिच्या उदरात,,,ह्या सर्व घटकांचे कार्य पूर्व निर्धारित आहे,,आणि प्रत्येकाचा स्वतः चा गुणधर्म आहे,,,अंतरीक्षाचा विचार केला तर चंद्र सूर्य तारे ह्या सर्वांच्या कक्षा ठरल्या आहेत,,त्या कक्षेत त्यांचे अरिभ्रमण अखंड सुरू आहे,,सृष्टीचा विचार केल्यास इथे प्रत्येकाचा जन्म मृत्यू ठरले आहे,,प्रत्येकाचे किती श्वास असतील हे मोजले आहे,,,एक जाणार दुसरा येणार हे नक्की आहे amazing शरीरात प्रत्येक अवयवाचे स्थान व कार्य ठरले आहे,,,,, शरीरात कोठेही जोड न मारता हाडे आपल्या जागी आहेत,,,प्रत्येक अवयव आपल्या जगेवर आहे पण शरीर कोठेही शिवलेले नाही,,,

एवढे सर्व पाहता कोण आहे ह्या सर्व गोष्टींचा द्रष्टा,,,कोण आहे ह्या सर्वांचा निर्माता,,पाश्चात्य म्हणतात सूक्ष्म जीवपेशीपासून उत्क्रांत होत मानव प्राणी घडला पण ह्या सूक्ष्म जीवपेशींचा निर्माता कोण??त्याच्या उत्क्रांतीच्या टप्प्यांचा निर्धारक कोण???त्याचा द्रष्टा कोण??करण नियम असा आहे की कार्य घडले म्हणजे कारण असलेच पाहिजे,,,हा सगळा विचार करता ह्या सर्वांच्या अधिष्ठान असलेले तत्व एकच आहे ते म्हणजे आत्मतत्त्व,,,,

# ईश उपनिषद – ३८

श्लोक क्र ९ ते ११ हा पाचवा तरंग,,आणि ह्या विचारतरंगात एक महत्वाचा मुद्द्यावर आचार्यांनी भाष्य केले,,आणि तो मुद्दा म्हणजे ज्ञानप्राप्तीसाठी नेमके कोणत्या मार्गाचे अनुसरण करावे??केवळ कर्म की उपासना?? ह्याचे उत्तर ह्या श्लोकात बघावयास मिळते

श्लोकाचा शब्दशः अर्थ असा की ,,**जे अविद्याची उपासना करतात




ते घोर काळोखात प्रवेश करतात,,आणि जे विद्येत रममाण होतातते जणूकाही त्याहूनही अंधकारात पडतात,,***(झाला न गोंधळ!)

ह्याठिकाणी अविद्या म्हणजे अग्निहोत्रदीकम कर्म असा अर्थ आचार्यांनी दिला आहे,,कारण आचार्यांच्या काळात अग्निहोत्रदी कर्म ह्यापुरतीच कर्माची संकल्पना होती,,महाभारतात निष्काम कर्माची संकल्पना आपणास शिकावयास मिळते,,,विद्या ह्याचा अर्थ देवतांची उपासना ध्यान,,,

अविद्याची उपासना म्हणजे कर्ममार्ग,,,वास्तविक कर्म करून चित्तशुद्धीनंतर उपासना व ध्यान ज्ञान हा क्रमविकासाची मार्ग असतो,,,,आपले कर्तव्य कर्म योग्य केले की चित्त शुद्ध होते,,,ह्याठिकाणी कर्माचे अनुष्ठान वर्णन केले आहे,,कर्माचे अनुष्ठान हे सकाम व निष्काम आशा दोन्ही प्रकारचे असते,,

सकाम कर्म हे काही अपेक्षेने केले जाते,,ह्यात प्रामुख्याने ज्याला आपण कर्मकांड म्हणतो हे कर्म केल्याने त्यापासून ज्ञानाची प्राप्ती होणार नाही,,कामना पूर्ण झाल्यासारख्या वाटतील पण कामानाना पूर्णविराम नसतो,,त्या वाढतात,,आणि कर्मकांडातून अहंकारही निर्माण होतो,,,म्हणून केवळ कर्मकांड करणारे जे लोक आहे ते अज्ञानाचा अंधकारात चाचपडत

राहतात,, त्यांना जीवनात आनंदाची प्राप्ती होत नाही,, कर्मकांडातून जणू काही सुख मिळाल्यासारखे वाटेल ,,,पण सुख एकटं कुठे येत??त्याचा सोबती असतो न त्याच्यासोबत,,,दुःख त्याचे नाव,,,देवा मला नोकरी मिळू दे एखादे व्रत करते,,,नोकरी मिळाली,, सुख आल्यासारखे वाटले,,,पण नोकरी टिकवताना किती दुःख,,,आणि ती सुटल्यावर तर विचारूच नका,,,सुख टिकले का??


मग कर्म हे निष्काम पणे केले तर त्यातून चित्तशुद्धी ही फलश्रुती मिळते,,,पण ज्ञान प्राप्ती नाही,,, ह्या ठिकाणी एक बाब महत्वाची आहे की केवळ कर्म किंवा केवळ उपासना ह्या वेगवेगळ्या असू शकत नाही,,पण काही लोक कोणतीही उपासना न करता केवळ कर्म करतात,,त्यांना त्यांच्या कर्म मार्गाचे तत्कालीन फळ जणूकाही मिळेलंही पण त्याला ज्ञान प्राप्ती होणार नाही,,,एकाचे अनुष्ठान सोडून दुसऱ्या मार्गाचे अनुष्ठान अयोग्य आहे,,,,कायेच्या स्तरावर कर्म ,,वाचेच्या स्तरावर नाम ,,आणि अंतकरणाच्या स्तरावर ध्यान ह्या बाबी महत्वाच्या आहेत,,, बाब खूप महत्त्वाची आहे की आपले नित्य कर्म कर्तव्य कर्म झाल्याशिवाय ध्यानात उपासनेत लक्ष लागणार नाही,,,ध्यानात लक्ष लागणार नाही,,एक अनुष्ठान दुसऱ्या अनुष्ठानाशिवाय शक्य नाही,,हा विचार खूप महत्त्वाचा आहे,,

नियत कर्म व कर्तव्य कर्म पूर्ण केल्याशिवाय ध्यानातही लक्ष लागणार नाही,,मित्रानो विचार करा आपण आपल्या बँकेचे व्यवहार पूर्ण न करतात घरी आलो तर आपले इतर कोणत्याही कामात लक्ष लागेल का,,,आणि आपले चित्त ठिकाणावर राहील का??माझेकडे दिवभरात सोपविलेली कामे कोणती व ती कामाचे योग्य नियोजन करू ते कार्य अत्यंत प्रामाणिक पणे मी पूर्ण केली असेल मी त्या कार्यात माझे पूर्णपणे प्रामाणिक योगदान दिले असेल तर चित्तात शांतता आपण अनुभवू शकतो,,ही गोष्ट तेवढीच महत्वाची आहे,पण त्यात काही अपूर्णता राहिली तर रात्री तीच अपूर्णता मला स्वस्थ पणे झोपू पण देणार नाही,,,आणि सातत्याने माझा पाठपुरावा करेल मग जी बाब व्यवहारात घडते तीच बाब साधनेत बाधा ठरते,,,म्हणून केवळ कर्माने ज्ञानप्राप्ती होणार नाही .....

# ईश उपनिषद – ३९

आपल्याला नेहमी हा प्रश्न बसतो की मी कर्म करावे उपासना करावी की भक्ती करावी की फक्त ज्ञान मार्ग चोखळवा??आणि ह्या प्रश्नाचे अत्यंत सहज आणि सुंदर उत्तर आचार्यांनी दिले आहे,,

वास्तविक पाहता कर्म भक्ती उपासना आणि ज्ञान हे चारही मार्ग एकमेकांपासून भिन्न नाही,,वेगळे नाही,,,शारीरिक स्तरावर निष्काम कर्म केल्याने मनाची शुद्धी होते व ह्या शुद्ध अंतकर्णानेच उपासना योग्य दिशेने होते,,,उपासनेने चित्त अधिक शुद्ध झालेकी त्या शुद्ध अंतःकरणात भक्ती




रुजते,,भक्ती उपासना ह्या मनाशी निगडित आहेत आणि एकदा भक्तीयुक्त अंतकरणाने व्यक्ती भारावून जाते तेव्हाच ज्ञानाचे बीजारोपण होऊ शकेल,,,अगदी एखाद्या फोटोग्राफर सारखी ही भूमिका आहे,,फोटोग्राफर प्रत्येकाला आपल्या स्थानावर बसवितो,,आणि सर्वात शेवटी क्लिक करतो,,हे क्लिक करणे हे ज्ञान प्राप्ती आहे आणि त्यासाठी शरीर मन बुद्धी चित्त अहंकार ह्याची योग्य व्यवस्था करणे आवश्यक असते,,योग्य व्यवस्था रचना मांडणी केली पण क्लिक केले नाही तर फोटो व्यवस्थित होणार नाही,,,आणि क्लिक केले पण दृश्य हलणारे होते,,फोटो व्यवस्थित निघणार नाही,,,

ह्या श्लोकात अविद्या हा शब्द उपासना मार्गासाठी वापरला आहे,,,आपण खूप उपासना करतो पण त्यातून मिळणार आनंद हा कायम स्वरूपी टिकत नाही,,आणि मग आपण पुन्हा दुसऱ्या उपासनेच्या मागे लागतो,,,पण उपासना की मनाच्या शुद्धतेसाठी आहे,,जीवनात भौतिक सुख प्राप्त करण्यासाठी नाही हे जर एकदा कळले तर मी ईश्वराची एवढी

उपासना केली तरी त्याची फलश्रुती मला मिळाली नाही आणि मला खूप खूप दुःख सहन करावे लागले,,,हे विधान वापरताना माझा उपासनेचा उद्देशच चुकीचा होता हे मला निश्चितच कळायला हवे,,,शिवाय मी जी उपासना केली त्याला कर्मकांडाचेच स्वरूप नाही का आले??मग कर्तृ भाव प्रबळ झाला,,,आणि परिणाम???दुःख,,,,कर्माचा उद्देश काय उपासनेचा उद्देश काय??ही दृष्टी पक्की हवी,,,

केवळ उपसनाच करणारे लोकांना मग ज्ञानाची प्राप्ती तर होत नाहीच पण त्याच्या जीवनात दुःख येते ते अधिक अंधकारात जातात,,ह्याचे महत्वाचे कारण म्हणजे त्या उपासनेची फलश्रुती कळलेली नाही ,,,,आणि मग ह्या अज्ञानातून व्यक्ती दुःखाच्या अज्ञानाचा काळोखात जाते,,,किती छान,,,बघा न आपले व्यवहारातील काही शब्द वाक्य असतात की मी देवाचे इतके केले पण काय फायदा झाला,,शेवटी तर माझ्या वाटेला दुःख भोगणे आलेच न,,,देवाला माझी भक्ती दिसली नाही का??एवढे उपास केले पण मला दुःख मिळाले,,,मग आता माझा देववरचा विश्वासच उडाला आहे,,,***आता ह्या विधानाचा विचार केला तर लक्षात येत की मुळात ज्या कृतीचा जो उद्देशच नाही तर साध्य होण्याचा प्रश्नच कुठे उदभवतो,,,ह्यात देवाला दूषणे देण्याची काय गरज,,,,

# ईश उपनिषद – ४०

विद्या म्हणजेच उपासना,,आणि अविद्या म्हणजे कर्मकांड,,,केवळ कर्मकांड केले पण उच्च उपासना नाही केली,,ह्या उलट केवळ उपासना केली पण आपले कर्म समर्पित भावनेने केले नाही त्याचे फळ वेगळे प्राप्त होते,,,पण ह्या दोहोंचा समन्वय आवश्यक आहे,,,चित्त शुद्धीसाठी निष्काम कर्म करून शुद्ध झालेले चित्त उपासनेसाठी लावणे आवश्यक आहे,,

दहाव्या श्लोकात आचार्यांनी हा मुद्दा सांगताना हेच विशद केले आहे की विद्येने वेगळे फळ मिळते व अविद्येची वेगळे फळ मिळते,,ह्या ठिकाणी




एक बाब आणखी विशेषत्वाने बघावायची आहे ती ही की हे फळ जे विद्या व अविद्येतून मिळते आहे हे त्यांनी म्हणजेच ऋषींनी कथन केलेले आहे,,,हे जेव्हा आचार्य मान्य करतात तेव्हा ह्यातून असे ध्वनित होते की प्रस्थापित मत आवर्जून आग्रह पूर्वक स्वीकारावे असे हिंदू तत्वज्ञान सांगत नाही,,उलट ते कसोटीस उतरल्यावर स्वीकारण्याची मुभा ह्या ठिकाणी हिंदू तत्वज्ञान देते,,,

शिवाय एक आणखी एक गोष्ट ह्याठिकाणी महत्वाची आहे की वास्तविक विद्या ह्या शब्दाचा अर्थ संस्कृत उपपत्तीनुसार शास्त्रानुसार विद धातू पासून विद्या हा शब्द उत्पन्न झाला,,,आणि त्यापासून विद्या व अविद्या हा शब्द निर्माण झाले ,वास्तविक अविद्या ह्यात अहा नकारवाचक शब्द आहे पण अविद्या म्हणजे ‘’’विद्या नाही ‘‘असा ह्या ठिकाणी होत नाही तर अविद्या म्हणजेच विद्यासदृश असा ह्या ठिकाणी आहे,,हेच

संस्कृत भाषेचे व वेदांताचे सौन्दर्य आहे,,ह्या ठिकाणी व्यंजना महत्वाची नाही तर लक्षणा महत्वाची आहे,,,

मित्रानो हिंदू तत्वज्ञानाचे व वेदांताचे हेच खरे सौन्दर्य आहे,,पण हे सौन्दर्य पाहण्यासाठी त्यात सखोल बुडी मारावी लागते,,पण नेमके ह्याच बाबतीत आम्ही कमी पडलो आणि ह्या तत्वज्ञानाकडे आम्ही पाठ फिरवली,,आणि धर्म संकल्पनेला कर्म कांडात बंदिस्त केले,,आणि धर्मसंकल्पना कालबाह्य ठरविला,,,वास्तविक हिंदू धर्म व वेदांत तत्वज्ञान हे जेवढे नित्यनूतन आहे तेवढे क्वचितच कुठे सापडेल,,,कोणताही काळ असू देत ह्या संकल्पनामध्ये युगानुकूल लवचिकता आहे एवढेच नाही तर त्या सार्वभौम आहेत,,,किती छान,,

कर्म हे निष्कमतेने व्हावे व त्यायोगे त्यातून चित्तशुद्धी हे ध्येय गाठावे,,उपासना ही उच्च कोटींची व्हावी व त्यातून मनातील संकल्प विकल्प दूर व्हावे,,असे झाले ते ते मन व चित्त साधनेच्या माध्यमातून तत्वाची प्राप्ती करून घेऊ शकेल,,,


म्हणजे आता ही गोष्ट सिद्ध होतेच की स्वरूपाची प्राप्ती करून घ्यायची असेल,स्वतः ला जाणून घ्यायची असेल तर निश्चित पणे केवळ कर्म आणि उपासना करूनच थांबता येणार नाही,,करण हाच साधनेचा क्रमविकास आहे,,,त्याच्याही पलीकडे जावे लागेल,,हो न,,,

# ईश उपनिषद – ४१

कर्म की उपासना??हा प्रश्न कायमच आपल्या मनात असतोच,,,ह्याचे खूप सुंदर उत्तर आचार्यांनी ह्या ११ व्या श्लोकात दिले आहे,,

शब्दशः अर्थ:–जो विद्या आणि अविद्या ह्या दोहोणाही केले जाण्यास योग्य आहे असे जाणतो तो अविद्येने मृत्यूला पार करून विद्येने अमृतत्वास प्राप्त होतो,,,,

कर्माचे फळ काय आणि उपासनेचे फळ काय?? ह्याचे सुंदर उत्तर आचार्यांनी दिले,,पण त्यापूर्वी ही सुद्धा बाब ह्या ठिकाणी स्पष्ट होते की केवळ कर्म किंवा केवळ उपासना करणे ह्याने क्रमविकास साधणार नाही तर ह्या दोहोंचा क्रम समुच्चय असणे गरजेचे आहे,,




तुज सगुण म्हणू की निर्गुण रे??हा प्रश्न आणि

सगुण निर्गुण एकू गोविंदू रे,,,हे संतांनी दिलेले उत्तर,,, केवळ कर्म केल्याने आणि तेही निष्कमतेने केल्याने चित्त शुद्धी होते असे विधान आपण केले पण म्हणजे काय??चित्त शुद्ध होते म्हणजेच कोणत्याही कर्मातून मला फळाची अपेक्षा न राहता ईश्वरार्पण भावना मनात निर्माण व्हायला सुरुवात होते,,**तुझे कारणी देह माझा पडावा**,,,ही भावना निर्माण व्हायला सुरुवात होते,,आणि शरीराच्या स्तरावरून आमच्या मनाचे उन्नयन होते,,,आणि मग माझे रोजचे कर्म सुद्धा ईश्वरार्पण भावनेने सुरू होते,,आणि कर्म जर ईश्वराला अर्पण करायची तर ती वाईट असतीलच कशी?? आता ह्या कर्माचे ध्येय उदात्त असल्यामुळे शरीराच्या स्तरावर मग माझी काही हानी होईल हा भावच मनात येत नाही,,,बघा न आई आपल्या बाळासाठी जेव्हा काही करते तेव्हा ती किती निःस्वार्थ भावनेने करते त्याचा तिला थकवा वाटत

नाही,,स्वतः च्या शरीराचीही ती पर्वा करीत नाही,,पण आपल्या बाळाचे जीवन आनंदी व्हावे हाच भाव तिचा दृढ असतो,,,एखादा सैनिक जेव्हा सीमेवर कार्य करतो तेव्हा त्याचे ध्येय उदात्त असते त्यामुळे आपल्या शरीराची पर्वा ते करीत नाही,,,ही सर्व निष्काम सेवेची उदाहरणे आहेत,,,आता आशा निष्काम कर्माने तो मृत्यूला पार करतो म्हणजे काय??ह्याचा अर्थ सर्वसामान्यपणे असाच घेतला जातो की कर्मकांड केले की मृत्यू टळतो,,, आणि व्यक्ती वाचते,,,बरोबर आहे न,,,आणि ह्यासाठी आम्ही किती उपासना करतो???कारण शरीराच्या स्तरावर मला सर्वात जास्त भय हे मृत्यूचेच असते,,,पण लक्षत घ्या आपण आपले श्वास मोजूनच ह्या जगात प्रवेश केला आहे पण ते किती एवढेच आपल्याला माहीत नाही,,,हे सत्य पचवायला कठीण आहे,,पण सत्य आहे,,,आता हे सत्य जर मला पटले तर माझी प्रत्येक कृती ही निष्कामतर होईलच व ह्यातून माझ्या शरिराचे हे क्षण भंगुरुत्व मला उमजायला मदत होईल,,आणि आता शरीराच्या स्तरावर येणाऱ्या मृत्यूचे भय त्याला वाटत नाही,,मला मृत्यू येणारच आहे पण माझ्या मृत्यूच्या आधी माझ्या जीवनाचे ध्येय मला पूर्ण करायचे आहे हा भाव दृढ होतो,,,आणि मग **देह जावो अथवा राहो** हा भाव दृढ होतो,,मृत्यूचे भय रहात नाही,,,तो केव्हाही येवो,am ready for my physical death, because I am not only body,,,My body is my instrument given by GOD,,,I have to use it for my higher purpose,,,and my higher purpose is to know my ""Swarup"" ह्या दृष्टिकोणातूनतो मृत्यूला पार करतो,,,

पण एक लक्षात घ्या की निष्काम कर्माने ही चित्तशुद्धी झाली तरी जीवभाव जात नाही,,देहभाव गेला पण जीवभाव गेला नाही तर कितीही निष्काम कर्म केले तरी त्यापासून आनंदाची प्राप्ती होणार नाही पण कर्तृभाव प्रबळ होईल,,आणि मी तुमच्यासाठी एवढे केले त्याचे परतफेड तुम्ही कशी केली??मी सर्वांच्या साठी आयुष्यात झिजलो पण त्याची कुणालाही कदर नाही,,,मग आता मी कुणासाठी का झिजावे???हा भाव माझ्या निष्काम कर्मातील मोठा अडथळा आहे,,,म्हणून हा जीवभाव संपून जाणे गरजेचे आहे,,,

# ईश उपनिषद – ४२

कर्म की उपासना ह्या प्रश्नाचे उत्तर आचार्यांनी दिले,,,निष्काम कर्माने तुझे कारणी देह माझा पडावा हा भाव निर्माण होतो पण जीवभाव जात नाही,,

उपासनेने अमृतत्व प्राप्त होते असे आचार्यांनी नमूद केले आहे,,,म्हणजे काय??खरच ह्या देहाला अमरत्व प्राप्त होते का??आणि हे शक्य आहे का??मग मी एक लाख वेळा महामृत्युंजयचा मंत्र केला की खरच माझ्यावरील मृत्यूचे संकट टळेल का? आणि नाही टळले तर एवढी उपासना करून फायदा काय??मग हे सर्व थोतांड आहे,,,कसे विवेकहीन विधाने आम्ही करतो,,,




ह्यासाठी अमरत्वाची संकल्पना जाणून घेणे खूप गरजेचे आहे,,,विचार करा अमरत्व ही संकल्पना कशाशी निगडित असू शकते??जे नाशवंत आहे त्याच्याशी तर निश्चितच नाही,,काय काय नाशवंत आहे???उत्तर आहे जे जे उपजे ते ते नाशे,,,ज्याला ज्याला निर्मिती आहे त्याला त्याला विनाश आहे,,,मग ह्या नियमस अनुसरून माझ्या शरीराची उत्पत्ती झाली तर त्याच्या विनाश निश्चित आहे,,,


पण हा जो जीवभाव आहे तो जीवभाव जर वजा करता आला तर???माझे शरीर हे मला ह्या जगात कार्य करण्याकरिता मिळालेले उपकरण आहे,,त्याला त्याची मर्यादा आहे,,आणि त्या मर्यादेत मला ह्या जगात कार्य करायचे आहे,,,हा जो भाव आहे तो दृढ करायचा,,आणि

देहाशी मनाशी असणारे व्यवहार ह्यांची क्षणिकता जाणून त्याला स्वीकारून आपले जीवन जगणे महत्वाचे आहे,,ह्या सर्व उपकरणांची निगा तर घ्यायचीच आहे,,,पण ते नाश पवणार आहे,,,पण त्याला प्रकाशित करणारे जे तत्व आहे ते आत्मतत्त्व ही माझी खरी ओळख आहे,,आणि त्याला मृत्यू नाही,,,

समुद्रातील येणारी प्रत्येक लाट संपुष्टात येते पण पाणी तत्वाला मृत्यू नाही,,,मातीचा घडा फुटला,,आणि त्यातील आकाश तत्व हे घड्याबाहेरच्या आकाश तत्वात मिसळून गेले,,,पण त्यामुळे घाटातील आकाश संपले असे होत नाही,,,हे ज्याने जाणले त्याने खऱ्या अर्थाने अमरत्वाची प्राप्ती केली,,**आपुले मरण पहिले म्या डोळा**,,'''आनंदाचे डोही आनंद तरंग'',,ही अनुभूती यायला वेळ लागत नाही,,, उपासनेच्या माध्यमातून आपल्या मनाला वळण लागते आणि मग मनाचाही क्रमविकास होऊन बुद्धीच्या स्तरावर मी देह नसून मी आत्मतत्त्व आहे हा निर्णय होतो आणि मग ,,''देह जावी अथवा राहो,,,,आम्ही तो केवळ वस्तूची अहो,,,हा भाव दृढ होतो आणि हेच अमरत्व आहे,,,हाच खरा मोक्ष आहे,,,आणि उपासनेच्या माध्यमातून शरीर मन बुद्धी ह्यांच्या अतीत होऊन आपले स्वरूप जाणणे ह्यालाच तर अमरत्व म्हणतात,,, शरीर मन बुद्धीच्या तदात्म्यामुळे आलेला जीवभाव विसर्जित करणे महत्वाचे,,,विसर्जित केलेली वस्तू आपण पुन्हा उपयोगात आणत नाही,,एकदा हा जीवभाव विसर्जित केले तरी जीव जाइल पण भाव अर्थात तत्व कायम राहील,,,किती छान,,,पण हे सर्व करताना कर्म उपासना ह्यांचा क्रम समुच्चय गरजेचेच आहे,,,ह्या समुच्चयातूनच आत्मतत्वाचा पुनरशोध आपणास लागतो,,आणि देहोहं ते शिवोहं ब्राह्मोहं हा शोध पूर्ण होतो,,,मग देहदी व्यवहार करणारी व्यक्ती आपले अनुसंधान अखंड ठेवते,,,आणि ह्या जगात वावरते,,,,,,

# ईश उपनिषद – ४३

ईश उपनिषदाच्या ह्या पाचव्या तरंगात श्लोक क्र ९ ते १४ श्लोक अंतर्भूत आहेत,,ह्यात प्रामुख्याने आपल्याला कायम पडलेल्या प्रश्नाचे उत्तर ह्यात दिले आहे,,,कर्म की उपासना ह्या प्रश्नांची उकल आचार्यांनी खूप छान केली,,,आणि आपल्या हे लक्षात आले की कर्माने चित्त शुद्ध झाले की त्या शुद्ध अंतकरणाने मग उपासनेच्या माध्यमातून शुद्ध तत्वाची प्राप्ती होईल,,




पण आता आणखी एक प्रश्न आपल्या मनात येतो की मी व्यक्तची उपासना करावी की अव्यक्तची,,,अगदी आपल्याच भाषेत सांगायचे झाले तर सगुणाची उपासना करायची की निर्गुणाची??
ह्या प्रश्नाचे उत्तर ह्यापुढील श्लोकात मिळते,,,

१२ व्या श्लोकाचा शब्दशः अर्थ पुढीलप्रमाणे आहे,,,**जे अव्यक्त म्हणजे कारण ब्रह्माची उपासना करतात ते घोर आंधक्कारात प्रवेश करतात आणि जे कार्य ब्रह्मात रत राहतात ते जणू त्याहूनही घोर अंध:कारात प्रवेश करतात,,,***

ह्या ठिकाणी अव्यक्तसाठी कारणब्रह्म ,व व्यक्त साठी कार्यब्रह्म हा शब्द वापरला आहे,,अव्याकतासाठी कारण ब्रह्म हा शब्द वापरण्याचे कारण म्हणजे ,जे ब्रह्म सर्वव्यापक आहे ते सर्व चराचर सृष्टीचे कारण आहे,,ते सर्वदूर घनदाट भरले आहे,,पण त्याची सिध्दता कोणत्याही प्रमाणाने होऊ शकत नाही,,ते डोळ्यांनी दिसत नाही ते ज्ञानेंद्रियना कळत

नाही,,कारण ते स्वतः प्रकाशक आहे,,,त्याच्याच सत्तेवर हे जगत आपणास जणूकाही भासते,,,ह्या जगताचे ते अधिष्ठान आहे,,त्याला जाणून घ्यायचे असेल तर साधकाला केवळ शब्दाने ते समजणार नाही,,पण त्यासाठी साधकाने काही पूर्वतयारी केली असेल तर विविध प्रमाणाचा आधार तो घेऊन त्याला जाणण्याचा प्रयत्न करू शकेल,,,


पण ह्यासाठी साधक साधनचतुष्टय संपन्न असायला हवा,,शम दम उपरम तीतीक्षा श्रद्धा समाधान हे गुण साधकाच्या अंगी आले तर तो अव्यक्तची उपासना करू शकेल,,अगदी आपण व्यवहारात पाहतो न की १० वर्ग पास झाल्याशिवाय ११ व्या वर्गात प्रवेश मिळत नाही,,,१० व्या वर्षी आपण अचानक एम ए च्या अभ्यासाचा विचार करू शकणार नाही,,आपल्या बुद्धीची झेप तेवढी राहणार नाही,,,मानसिक तयारी राहणार नाही,,त्याचप्रमाणे अव्यकताची उपासना करण्यासाठी साधन चतुष्टय संपन्न साधक असावा लागतो,,,ही संपन्नता अभ्यासाने येईल,,,अनेक वर्षाची कठोर मेहनत त्यासाठी आवश्यक आहे,,,

पण ही कठोर मेहनत घेण्याची तयारी असायला हवी,,,आणि ही तयारी होण्यापूर्वीच जर मी अव्यक्तची उपासना करीत असेल तर एकतर ती केवळ पुस्तकी होईल क

आणि त्यातून खूप वैचारिक गोंधळ वाढण्याची शक्यता जास्त आहे,,शिवाय जास्त वैचारिक गोंधळातून ज्ञानाबाबत अनास्था निर्माण होण्याची धोका नाकारता येत नाही,,,आणि ह्याच दृष्टिकोनातून केवळ अव्यक्तची उपासना करणारे लोक ज्यांनी कोणतीही पूर्वतयारी केली नाही ते गोंधळाच्या घोर अंधकारात जातो,,,,

# ईश उपनिषद – ४४

व्यक्तीची उपासना की अव्यकताची उपासना??नेमके कोणती उपासना आपण करावी हा नेहमीच प्रश्न,,,मग अव्यकताची उपासना करायची हे निश्चित झाले पण माझी तयारी परिपूर्ण झाली आहे का हे आपणच ठरवायला हवे,,,आणि मग जे सर्वांचे कारण आहे व जे सर्वात व्यापून उरले आहे त्याची म्हणजेच निर्गुण निरकाराची उपासना करावी,,




कार्य ब्रह्म म्हणजेच सगुणाची उपासना करणारे जर फक्त सगुण उपसनाच करीत असतील तर नेमके काय घडते??बघा,,चित्त शुद्धीसाठी बहिरंगी उपासना गरजेची आहेच,,,ईशवरची उपासना,,सगुण साकाराची उपासना ही साधनेच्या सुरवातीच्या काळात आवश्यक आहेच,,ह्यातून परमेश्वराबाबत दिव्य भाव मनात जागृत होईल,,ह्यासाठी काही कर्मकांड पण करावे लागेलच,,,पुष्कळदा आक्षेप घेतला जातो की रोज दगडाच्या पितळेच्या मूर्ती का धुवायच्या??आणि त्यावर बरेच जण टीकाही करतात,,,पण ही बहिरंगी उपासना आहे,,,जे जे माझे दिनचर्या आहे तीच दिनचर्या माझ्या ईशवरची पण आहे,,मला रोज अंघोळ करावी लागते रोज जेवण लागत तसाच ते ईश्वरसाठी पण मी केले त्यातून दिव्य भावाची निर्मिती होतेच,,,देवाला नैवेद्य दाखवून नंतर जेवल्यास ते अन्न प्रसाद बनते,,,आणि त्याच अन्नबाबत आपला भाव बदलतो,,हो न,,,

पण आपल्याला काही विशिष्ट उंचीवर जायचे असेल तर काही पायऱ्या चढाव्याच लागतील,,,तसेच निर्गुण उपासनेसाठी मला सगुण उपासनेच्या पायऱ्या चढाव्याच लागतील,,,


बरेचदा काय होत की खूप कर्मकांड आपण करतो आणि मग हे कर्मकांड एक अहंकाराचे कारण होते,,,आणि त्यापासून मग साध्य काहीच होत नाही,,,मी रोज दोन तास पूजा करतो,,माझ्या सारखी पूजा माझ्या घरी कुणीच करीत नाही,,,ह्या वाक्यात दोन तास आणि माझ्यासारखी हे दोन शब्द मग अहंकाराचे कारण ठरतात,,,मग मी जास्त वेळ पूजा करतो म्हणजे मी आता श्रेष्ठ साधक आहे हा भाव उपासनेत निर्माण झाला की उपासनेचा आशय हरवितो,,,आणि साधक आणखी घोर आंधक्कारात जातो,,,

पण आता सगुण उपासना चांगली की निर्गुण उपसनाचंगली??अर्थात सगुण उपसनेतून चित्ताची शुद्धी करून ते चित्त निर्गुण उपासनेकडे लावणे केव्हाही चांगले,,,तुज सगुण म्हणू की निर्गुण रे,,सगुण निर्गुण एकू गोविंदू रे,,,ही एकत्वाची अनुभूती हा साधनेचा हेतू आहे,,,

# ईश उपनिषद – ४५

ईश उपनिषदाच्या ह्या पाचव्या तरंगात एक अतिशय आपल्या जिव्हाळ्याचा विषय स्पष्ट करून सांगितलं आहे,,,कर्म की उपासना??ह्या दोहोंचा क्रम समुच्चय आवश्यक आहे,,,ह्या दोहोंचे फळ काय ह्याबाबतचे विवेचन ह्यात आहे,,,

आपला आणखी एक महत्वाचा प्रश्न की व्यक्ताची उपासना करावी की अव्यकताची??व्यक्ताची म्हणजेच सगुण साकाराची उपासना,,,अगदी सुरवातीच्या काळात व्यक्ताची उपासना म्हणजेच पंचमहाभूतांच्या पूजनाने असायची,,,पौराणिक कालखंडात ह्याची जागापंचायतन पूजनाने घेतली,,शिव वैष्णव शक्ती गणेश आणि सूर्य ,,,,असे हे पंचायतन होय,,,ह्या सर्वांच्या पूजनाचे एक विशिष्ट पद्धती आहे,,ही पूजन हे व्यक्ताची पूजन आहे,,,आता ह्या व्यक्ताच्या पूजनाकडून अव्यक्त च्या पूजनाकडे जायचे म्हणजे काय???




*****( ह्याठिकाणी आणखी एक बाब लक्षात ठेवावी लागते की वास्तविक पाहता उपासना हे कर्म आहे,,आणि अव्यक्त आत्मतत्त्व के कर्मातीत आहे,,,त्याला कर्माने पूजता येणार नाही,,)*********

पण उपासना ह्याचा अर्थ ह्याठिकाणी आहे अंतरंग साधना,,,अव्यक्तला जाणून घ्यायचे असेल तर अंतरंगसाधना महत्वाची असते आणि अंतरंग साधनेचा मार्ग हा बहिरंग उपासनेच्या मार्गाने सुरू होतो,,,

आता व्यक्तकडून अव्यक्तकडे जायचे म्हणजे काय??बघा आपण ज्याची उपासना करतो उदा,,समजा आपण श्रीरामाची उपासना करीत असू तर आपण श्रीरामाच्या मूर्तीची पूजाकरणार त्याचसोबत आपण त्याच्या गुणांचेही वर्णन करणार,,,‘‘तो सर्वज्ञा आहे,व्यापक आहे,,त्याच्या सत्तेने हे सर्व जीवन सुरू आहे,,तो ईश्वर आहे,,सर्वसाक्षी आहे,,असे आणि कितीतरी गुणांचे आपण वर्णन करतो,,हेच वर्णन आपण शिवाचे करतो,हेच वर्णन विष्णू चे शक्तीचे सूर्याचे,,अगदी आपण ज्याला ईश्वर मानतो त्याचेही हेच वर्णन आपण करतो,,,ही सगुण साकार परमेश्वराची पूजा,,, आता साधनेच्या मार्गात आपण आणखी पुढे जातो आणि सगुणनिरकाराची साधना करतो म्हणजेच आता फक्त ज्या परमेश्वराची मी पूजा करतो त्याचे गुणांचे वर्णन मी करतो,,,त्याच्या गुणांचे स्मरण मी करतो,,, आता ज्याचे पूजन केले ,ज्याच्या गुणांचे स्मरण केले त्याला जाणण्याची तीव्र इच्छा मनात जागृत होते,,आणि येथूनच सुरू होते अव्यक्तची उपासना,,,म्हणजेच अव्यक्तला जाणून घेण्याची प्रक्रिया,,आणि मग त्याचा मार्ग संतांनी सांगितला तो म्हणजे नामानेत्याबाबत ची भक्ती व प्रेम वाढविणे,,,ध्यानाने त्याला चित्तात ठसविणे,,आणि तत्वज्ञानच्या माध्यमातून त्याला जाणणे,,,


***नाम ध्यान आणि तत्वज्ञान,**

आता तत्त्वज्ञानाच्या माध्यमातून जाणणे म्हणजे काय???शास्त्राने मार्गदर्शन केले आहे की तत कथनं, तत चिंतनम,,, शास्त्राचे श्रवण,, मनन आणिनिधीध्यासन,,,,त्यांच्याबाबत खूप श्रवण करणे,,,त्याचेच चिंतन करणे ,,आणि त्याच चिंतनाने आपले संपूर्ण जीवन व्यापून टाकणे,,,किती छान आहे हे सर्व,,,आपल्या प्रेमसपदाच्या सहवासात नित्य असणे आणि त्याच्याशी नित्य एकरूपता अनुभवणे,,,

(कार्य ब्रह्म व कारण ब्रह्माची उपासना व त्याचे फलश्रुती पुढील भागात)

# ईश उपनिषद – ४६

संभवात म्हणजे कार्य ब्रह्म व असंभवात म्हणजे कारण ब्रह्म,,,,आणि ह्या दोहोंची उपासना,,,आणि ह्या दोहोंच्या उपासनेचे फळ,,,विषय ह्याठिकाणी आहे,,कार्य ब्रह्म व कारण ब्रह्म हे दोन शब्द ह्या ठिकाणी आलेले आहेत,,,मग हे दोन शब्द ऐकले की मनात विचार येतो की ब्रह्म दोन आहेत का???नाही,,,




बघा कोणतेही दृश्य कार्य जेव्हा असते तेव्हा त्याचे कारण विद्यमान असतेच,,,कार्याच्या मागे जे कारण असते ते दोन प्रकारचे असते,,

१)उपदान करण,,

२)निमित्त कारण,,,,

उदा मातीचा घट जर आपण पहिला तर त्यात माती हे उपदान कारण आहे आणि तो घट बनविणारा कुंभार हे निमित्त करण आहे,,,आता घटाच्या बाबतीत उपदान व निमित्त कारण हे दोन वेगवेगळे आहेत,,,पण ह्या जगताचा विचार केल्यास निमित्त कारण व उपदान कारण एकच आहे कारण सृष्टी घडविणारा ईश्वर व त्याने घडविलेले सृष्टी ह्याचे मूळ कारण ब्राह्मच आहे,,,

मग आता कारण ब्रह्माची उपासना म्हणजे अव्यक्तची उपासना व कार्य ब्रह्माची उपासना म्हणजे व्यक्ताची उपासना,,,

व्यक्ताची उपासना केली तर चित्ताची शुद्धी होईल पण स्वरूपाची

प्राप्ती होणार नाही आणि अव्यक्तची उपासना केली तर शांती जरूर मिळेल पण भ्रांती जाणार नाही,,व त्यामुळे तो अधिक अंधकारात जाईल,,,


ह्या ठिकाणी हिंदू तत्वज्ञानाचे एक आणखी वैशिष्ट्य म्हणजे हे तत्वज्ञान कुणीही कुणावर लादले नाही ह्याची पुष्टी खुद्द आचार्यांनी दिली आहे हे तत्वज्ञान आम्हाला आमच्या आचार्यकडून मिळाले व ते आम्ही मांडले असे नमूद करण्यात आले आहे,,,हे तत्वज्ञानाचे सौन्दर्य आहे,,,,

आता कारण ब्रह्म व कार्य ब्रह्म ह्याची उपासना वेगवेगळी समजण्याचे काहीच कारण नाही कारण तो साधनेचा क्रम विकास आहे,,,व्यक्ताची साधना करून व्यक्ती देहबुद्धीच्या अतीत जातो आणि ह्या अशयाने तो मृत्यूवर विजय मिळवितो,,,त्याचा देह जाणार हे त्याने जाणलेले असतेच पण त्याचसोबत मी देह नाही हे ही त्याला उमगले असते,,,आणि अव्यक्तची उपसनेतून मी देह नसून अहं ब्राह्मस्मि हा त्याचा निर्णय झाला असतो आणि ह्याच दृष्टिकोनातून तो अमरत्व प्राप्त करतो,,,,

(ह्या मुद्द्याचे अधिक विवेचन पुढील भागात,,)

# ईश उपनिषद – ४७

ईश उपनिषदाच्या ह्या पाचव्या तरंगात आपण साधनेमध्ये येणाऱ्या सर्वसामान्य जे प्रश्न उदभवतात त्यावरील भाष्य पाहिले,,,साधनेची मुख्य उपकरणे जी आहेत ती म्हणजे मन आणि बुद्धी,,,आणि ही उपकरणे शुद्ध असणे अतिशय महत्वाचे आहे कारण ती आपल्याला ईश्वर चिंतानासाठी वापरावयाची आहेत,,,




पहिला प्रश्न होता की कर्म की उपासना,,,कर्मगत अंधकार दूर करण्यासाठी ह्याचे उत्तर महत्वाचे ठरते,, निष्काम कर्माने चित्त शुद्धी करून शुद्ध झालेले चित्त उपासनेसाठी उपलब्ध करून घ्यावे,,,ह्यातील एक घटक सोडून केवळ दुसऱ्या घटकांचे पालन करता येणार नाही ,,,ह्याने प्रमाद उदभवण्याची शक्यता जास्त असते,,हा साधनेचा क्रमविकास साधला तर जीवनातील कर्मगत अंधकार दूर होईल,,

दुसरा प्रश्न आहे की उपासना ही व्यक्ताची करावी की अव्यक्तची,,,हा हृदयगत अंधकार आहे,,कारण केवळ बहिरंग उपासना म्हणजे व्यक्ताची उपासना केली तरी चित्त शुद्ध होईल पण प्राप्तव्या पर्यंत पोहोचू शकणार नाही,,आणि केवळ अव्यकताची उपासना केली तर जास्त गोंधळ निर्माण होईल,,,म्हणून व्यक्ताच्या उपसनेकडून अव्यक्तची उपासनेकडे जाऊन आत्मविचारकडे बुद्धी वळविणे हा हृदय गत अंधकार दूर करण्याचा

उपाय आहे,,,

तिसरा प्रश्न ह्याठिकाणी उपस्थित केला की कार्य ब्रह्माची उपासना करावी की करण ब्रह्माची???हा बुद्धिगत अंधक्कार आहे,,,प्रत्येक निर्माण झालेल्या घटकांचे कारण असतेच,,,पण कारणाचे कारण जेव्हा आपण शोधतो तेव्हा त्याचे मूळ कारण आपणास सापडते,,कार्य ब्रह्म म्हणजेच व्यक्ताची उपासना करून ही बुद्धी अव्यक्तची साधनेत लावणे ह्यालाच बुद्धिगत अंधकार दूर करणे म्हणतात,,,

ह्या तरंगात घोर अंधक्कार हा शब्द वारंवार आलेला आहे,,ह्याचा संदर्भ बदलून तो शब्द आपल्यासमोर वारंवार येतो,,,बघा मनाच्या बुद्धीच्या स्तरावर आपण अंधक्कारतच असतो,,कारण आपल्याला मुळातच मन बुद्धी म्हणजे काय ह्याचे आकलन नसते,,,त्यामुळे मनाचे बुद्धीचे कार्य स्वरूप विस्तार विकास ह्याबत आपण जागरूक नसतो,,,आणि त्यात महत्वाचे प्रश्न पडतात की मी निष्काम कर्म करू भक्ती करू की उपासना करू की ज्ञानमार्गाचे आचरण करू???

निष्काम कर्माने कर्मगत अंधक्कार दूर करावा,,भक्ती व उपासनेने हृदय गत अंधक्कार दूर करावा व ज्ञानमार्गावर वाटचाल करून बुद्धिगत अंधक्कारदूर करावा,,,हे त्याचे उत्तर आपल्याला ह्या तरंगात आचार्यांनी दिले आहे,,


कर्म भक्ती उपासना ज्ञान ह्या साधनेच्या पायऱ्या आहेत हे सोपान आहेत,,ते आपल्याला चढावेच लागतील पण चढताना प्रत्येक पायरीचे भान ठेवूनच,,,कारण प्रत्येक मार्ग हा तत्वाकडे नेणार आहे,,,

# ईश उपनिषद – ४८

ईश उपनिषदाच्या सहाव्या विचारतरंगात आपण प्रवेश करीत आहोत,,,या सहाव्या तरंगात श्लोक क्रमांक १५ ते १७ असे तीन श्लोक आहे,,आत्मसाक्षात्काराच्या आनंद मिळावा ह्यासाठी प्रत्यक्ष आत्मतत्वाचीच प्रार्थना ह्याठिकाणी आपणास आढळते,,,

श्लोक क्र १५ चा शब्दशः अर्थ

सुवर्ण अच्छादनाने सत्याचे मुख झाकलेले आहे,हे सूर्यदेवा,सत्य धर्माचे आचरण करणारा जो मी त्याच्याकरिता ते तू दूर कर,,




ह्याच्या विस्तृत विवरणाकडे वळण्यापूर्वी एक बाब येथे नमूद करावीशी वाटते की ह्या श्लोकात सूर्य देवतेचा उल्लेख आहे ह्याची कारण वेद कालखंडात पंचमहाभूते व सूर्य ह्यानेच देवता मानीत असत,,पौराणिक काळात मात्र पंचायतन देवता ह्याच्या उपासनेचा प्रघात सुरू झाला,,,ह्यासात

प्राचीन काळातील या देवतेपैकी सूर्य देवता ही अशी वैश्विक देवता आहे की जी विश्वाचा निर्माता धारणकर्ता व विनाशकर्ता ह्याचे प्रतीक मानण्यात आलेली देवता आहे,,,ह्याचा आधुनिक संदर्भ पण वैश्विकच आहे,,कारण आपल्या सृष्टीचक्रातून सूर्यच वजा केला तर??? सूर्याची कृपा अखिल सृष्टीवर असण्याची गरज ही सर्व कालिक आहेच,,

ह्या उपनिषदाची सुरवात होती ती हे जगत ईश्वराने व्यापले आहे,,''ईशा वास्यम ईदम सर्वम''ह्या मंत्राने ही सुरवात होती,,,आणि ह्या श्लोकात ह्याच ईश्वराला प्रार्थना केली आहे की हे ईश्वरा आता हे सत्यातत्व अनाच्छादित कर,,,


ही वेदांत अभ्यासाची एक पद्धत आहे,,ज्यात उपक्रम आणि उपसंहार ह्यात एकवाक्यता असते,,,ह्या जगतात सत्य तत्व जणूकाही वस्तू जगताचे आच्छादित झाले आहे आणि हे आच्छादन अज्ञानाने आहे,,पण मला ज्ञानाचा अनुभव घ्यायचा असेल तर हे आवरण दूर व्हायलाच हवे,,, आणि हेच आच्छादन दूर करण्याची प्रार्थना ह्याठिकाणी केली आहे,,,

पुषन हे सूर्याचे नाम आहे,,,पुषन म्हणजे पालनकर्ता,धारणकर्ता,,,संपूर्ण विश्वाचे पालनपोषण करणारा हा सूर्य म्हणजे संपूर्ण विश्वाचे केंद्र आहे असे म्हटले तर वावगे होणार नाही,,,सर्व शक्तीचे तो उगमस्थान आहे,,,तो पालनकर्ता धारणकर्ता असल्यामुळे तो आत्मतत्वाचे प्रतीक पण आहे,,,

# ईश उपनिषद – ४९

प्रत्यक्ष तत्वालाच आता तूच मला प्रसन्न हो ही प्रार्थना,,,आता ह्याठिकाणी ही प्रार्थना इष्ट देवतेला केलेली आहे,,,आणि ही प्रार्थना करताना जीवाची जी स्थिती आहे त्याचे अतिशय सुंदर वर्णन जणूकाही ह्याठिकाणी केलेले आहे,,,

हे सर्व जगत ईशमय आहे असे विधान जे ह्या उपनिषदाच्या सुरवातीला आले,,,त्याची अनुभूती येण्याचा हा क्षण,,,साधकाच्या साधनेमधील सर्व प्रश्नांची उत्तरे तर ह्या संपूर्ण विवेचनात मिळतातच पण साधनेचा




क्रमविकासही ह्या उपनिषदात आपणास पहावयास मिळतो,,, कर्म भक्ती उपासना ज्ञान ह्या सोपानातून आपण साधनेत कशी उंची गाठायची ह्याचे अत्यंत सुंदर मर्गदर्शन ह्या उपनिषदात आपणास पहावयास मिळते ,,,,

आता साधन करताना निष्काम कर्माच्या माध्यमातून चित्त शुद्धी झाली,,,शुद्ध चित्ताने भक्तिभाव दृढ झाला,,,दृढ भक्तिभावाने सगुणाची इष्टदेवतेची उपसनाही केली,,आणि उपसनेच्याच प्रक्रियेत ज्याची उपासना करतो आहे त्याचे अव्यक्त गुणांची पण जिज्ञासा निर्माण झाली आणि हळूच शिष्य ज्ञान मार्गावर आला,,,निर्गुणाची ओढ मनात निर्माण झाली,,,ते तत्व मीच आहे हे शाब्दिक दृष्ट्या कळले,,,आता हा मार्ग चालत चालता अगदी आशा ठिकाणी साधक येऊन पोहोचला की आता फक्त आत्मतत्त्व जाणणे बाकी आहे आणि जेव्हा तत्व प्रत्यक्ष अनुभवण्याची वेळ आली तेव्हा मधेच एक आवरण आले आणि सत्य पुन्हा झाकले

गेले,,,अगदी सूर्यावर ढगांचे आवरण यावे तसेच,,,,

आता हे असे का घडले??? ह्याचे महत्वाचे कारण म्हणजे अजूनही शिष्याच्या बुद्धीवरचे आवरण दूर झाले नाही,,,ह्यातील पहिले आवरण आहे अध्यासाचे,,,अध्यास म्हणजेच अपरिवर्तनशील तत्वावर भासणारे परिवर्तनशील जगत,,,अजूनही ही भ्रांती शिष्याची गेलेली नाही की हे जगत हे परिवर्तनशील आहे त्यामुळे ह्या परिवर्तनशील जगतातील कोणतीही वस्तू ही अपरिवर्तनीय नाही,,,आणि तरीही ह्या परिवर्तनशील जगतातील सगळ्या दृश्य वस्तू मी सत्य समजतो आहे,,,,सत्य म्हणजे ज्याच्यात तिन्ही काळात परिवर्तन होत नाही,,,आता दृश्य जगतातील कोणतीही वस्तू घ्या त्यात परिवर्तन होतात किंवा नाही ते पहा,,,,हे अध्यासाचे आवरण आहे,,,

दुसरे आवरण आहे अध्यारोपाचे,,,ह्या जगताला मी सत्य मानतो हा त्या जगतावर केलेला एक प्रकारचा अध्यारोपच आहे,,,अंधारात माझा पाय सापावर पडला,,खूप भीती वाटली,,पण टॉर्च घेऊन बघितले तर लक्षात आले की तो साप नसून दोरी होती,,,दोरीवर मी सापाचा अध्यारोप केला,,,हे जगत सत्य आहे असे आपण मानतो ,,,,आणि बुद्धीवर आवरण येते आणि सत्य स्वरूपाचे दर्शन घडत नाही,,,,

# ईश उपनिषद – ५०

ईश उपनिषदाच्या विवेचनाच्या आपण अशा ठिकाणी आहोत जो साधकाच्या साधना काळातील अतिशय महत्वाचा टप्पा आहे,,,सगळी साधना झाली आता स्वरूपाचे दर्शन होण्याचा कल आला पण अजूनही आवरण आहे,,आणि हे आवरण आहे अध्यासाचे आणि अध्यारोपाचे,,,

पण हे आवरण निर्माण झाले कारण हे मायेचे आवरण आहे हे द्वैता चे आवरण आहे,,,मायेचे पटलं अजून बुद्धी वरून निघाले नाही आणि जीव ब्रह्म ऐक्य भाव अद्याप निर्माण झाला नाही,,त्यामुळे जणूकाही सत्याचे मुख झाकल्या गेले,,आणि हे आवरण दूर करण्याची प्रार्थना ह्याठिकाणी इष्ट देवतेची केली आहे,,,




हा अनावरण सोहळा आहे,,,किती रम्य,,,आणि हे अनावरण कुणी करावे??तर प्रत्यक्ष रमतत्वनेच ह्याचे अनावरण करावे ही प्रार्थना आहे,,,आणि हे अनावरण का??करण सत्य तत्व शोधायला निघालेला जीवभाव जेव्हा त्याचे अधिष्ठान असणारे चैतन्य तत्व जाणून घेण्याचा प्रयत्न करतो,,,पण ह्या जीवभावला (ज्यात मन आणि बुद्धी अंतर्भूत आहे ) केवळ बाह्य वस्तू जगत जाणण्याची सवय जडली असते,,,त्यामुळे तो त्यामागील सत्य तत्व जाणू शकत नाही,,,आणि आता तर तो साधना उपासना करून सत्याच्या अगदी दाराशी आला आहे आणि आता त्याच सत्याचे तो दार ठोठावतो आहे,,साधकाच्या जीवनाचे साध्य सत्य तत्वाची प्राप्ती आणि त्यासाठीचे साधन म्हणजे सत्याचाच मार्गाचे

अनुसरण,,,साध्य जेवढे उदात्त तेवढेच साधनही उदात्त,,,साध्य साधन ह्याची एकजीवता,,,आणि आता ध्येयाच्या द्वारापाशी प्रत्यक्ष साधक पोहोचला आहे,,,

आपल्या लक्षात एक गोष्ट आली असेल की ,साधनेच्या ह्या पायरीपर्यंत जो साधक पोहोचतो त्याला प्रत्यक्ष परम तत्वाकडे हट्ट करण्याचा अधिकारही प्राप्त होतो,,,पण हा अधिकार जो प्राप्त झाला तो दोन गोष्टींमुळे,,,पहिली म्हणजे साधनेबाबत ची एकनिष्ठा आणि दुसरी म्हणजे साधनेबाबत नितांत प्रेम भक्ती श्रद्धा,,,व त्यातील सातत्य,,,ह्या साधनेच्या काळात कितीतरी कसोटीचा क्षण साधकाच्या जीवनात येतात,,, त्याची निष्ठा पणाला लागण्याचे क्षण येतात ,,पण साधक आपल्या मार्गावरून ढळता कामा नये,,,येणार प्रत्येक क्षण आपली निष्ठेची कसोटी घेणारा आहे हेच गृहीत धरून आपले साधन केले की सत्यातत्वचे दाराशी उभे राहून त्या परम तत्वालाच हट्ट करण्याचा अधिकार साधकाला प्राप्त होतो,,,

# ईश उपनिषद – ५१

आत्मसाक्षात्काराच्या अगदी सीमेवर उभा असलेला साधक,,अगदी सगळी साधना परिपूर्ण केलेली आहे,,नेती नेती म्हणत शरीर मन बुद्धी चित्त अहंकार ह्या सगळ्याच निरास केला आहे आणि आता संपूर्ण जीवभाव संपून जाण्याच्याच अवस्थेत आहे पण आता अगदी शेवटचा विचार शिल्लक आहे,,ह्या अवस्थेचे वर्णन आचार्यांनी ह्या १६ व्या श्लोकात केलेले आहे,,ह्या श्लोकाचा शब्दशः अर्थ,,,




‘‘‘हे सूर्यदेवा,एकमेव दृष्टचा,सर्वांचे नियमन करणाऱ्या ,सूर्या,,प्रजपतीच्या पुत्रा,तू आपल्या किरणांना आवरून घे,,तेजाला आपल्यातच गोळा कर,,तुझे कल्याण मय रूप आहे ते मी पाहतो,,,हा आदित्य मंडळाचा पुरुष आहे तो मी आहे,,‘‘‘

ह्याठिकाणी एक महत्वाचा मुद्दा असा की सूर्य देवाचीच प्रार्थना का??ह्याचे महत्वाचे कारण की शुक्ल यजुर्वेद संहितेचे जे संकलक द्रष्टे यज्ञावल्क ह्यांचे गुरू म्हणजे सूर्यदेव,,,,

ह्या १६ व्या श्लोकात सूर्याचे गुणविशेषणे आपणास बघावयास मिळतात,,आणि जी गुणविशेषणे सुर्यकरिता वापरण्यात आली आहेत तीच आत्मतत्वालाही लागू आहेत,,आणि मन बुद्धीच्या अतीत गेलेला जीव जो अध्यात्मिक दृष्टिकोनातून मरणासन्न अवस्थेत आहे,तो आता स्वतः च आत्मतत्त्व होण्यासाठी आत्मतत्वाला जाऊन भेटतो,,,

आत्मतत्वाची भेट झाली पण मी त्याचे रूप पाहतो आहे आणि त्याचे

वर्णन करतो आहे हा साधकाच्या विचारांचा शेवटचा धागा अजूनही शिल्लक आहे,,,आणि म्हणून आता ''हे सूर्य देवा आता तुझ्या किरणांना तूच आवरून घे'' असे म्हणत असताना त्यात हा भाव आहे की सूर्याची किरणे ही सूर्याचीच अभिव्यक्ती आहे,,आणि त्या किरणांचा परतीच्या प्रवासात ते पुन्हा सूर्यतच विलीन होतात,,,

आपल्या अनेक विचारांचे प्रतीक म्हणजे ही सूर्याची किरणे होत,,त्याचे मूळ उगमस्थान हे हे आत्मतत्वच आहे,,जेव्हा विचार आपल्या मूलतत्वाशी एकरूप होतील तेव्हा ते आत्मस्थ होतील,,,आणि हीच प्रार्थना ह्या ठिकाणी केलेली आहे,,,

आत्मसाक्षात्काराच्या पूर्वीची पायरी ह्याठिकाणी वर्णन केलेली आहे,,,ह्याठिकाणी साधकाच्या जीवभाव पूर्ण नाश पावला ''मी ब्रह्म आहे'' हा शोध साधकाला लागला त्याने त्याचा परामानंदही अनुभवला ,,,पण अद्याप मीच ब्रह्म आहे ही अनुभूती त्याला आलेली नाही आणि आता त्याचसाठी तो प्रत्यक्ष आत्मतत्वालाच प्रार्थना करतोय,,,किती छान,,,लाटेलाच कळावे मीच समुद्र आहे,,,अलंकाराला कळावे मी सुवर्ण आहे,,,वस्त्राला कळावे मीच कापूस आहे,,,घटाला अनुभव यावा मीच माती आहे,,,जगामध्ये ब्रह्म दिसे उघडे,,,,

# ईश उपनिषद – ५२

हरिओम, समुद्राला जाणणारी लाट ही समुद्रच झाली,,,लाटेने समुद्राची अनुभूती घेतली,,,ब्राह्मला जाणारच ब्रह्म होतो,,,देव पहावयास गेलो देव होऊनिया ठेलो,,,ही अनुभूती,,,आहे,,ह्याबाबत उपनिषदाच्या तत्वज्ञानात वारंवार उल्लेख आला आहे,,,असा जीवभाव नष्ट होणे हे मानवी जीवनाचे प्राप्तव्य आहे,,,आणि जीवभाव एकदम नष्ट होणार नाही तर त्यासाठी क्रम विकास साधनेतून साधावा लागतो,,,जीवनाचे ध्येय जाणावे लागते,,जीवनाचे प्रयोजन जाणावे लागते,,,आणि मानवी जन्माची सार्थकता साध्य करावी लागते,,,आणि ही सार्थकता येण्यासाठी जिवाभावाचे पूर्ण विसर्जन ,,अहंकाराचे पूर्ण विसर्जन व्हावे लागते,,इतके की आता एकही तरंग शिल्लक नाही व पुन्हा तरंग उठण्याची शक्यताही नाही,,,निर्विकल्प समाधीची अवस्था,,,ह्या ठिकाणी मी तो आहे ही भाषाच संपते त्याजागी ते मी आहे ही अनुभूती येते,,,जीवभावाचा हा पूर्णतः शेवट आहे,,,आणि मी त्या सत्य तत्वाचा आहे ही अनुभूती ज्या महात्म्याने येते त्याची प्रत्यक्ष मरण अवस्था काशी असते ह्याचे सुंदर वर्णन ह्या १७ व्या श्लोकात आपणास बघावयास मिळेल,,,

पण ही अवस्था प्राप्त करण्यासाठी जीवाला विविध टप्पे पार करावे लागतात ह्याचे सुंदर मार्गदर्शन ह्या उपनिषदात केलेले आहे,,,वास्तविक माणूस हा जीवनभर मन आणि बुद्धीच्या अधीन असतो,,पण मन आणि बुद्धीचे कार्य जाणून घेऊन त्याला साधनेकडे वळविणे गरजेचे आहेच,,,आणि ह्यासाठी समर्पित कर्माच्या माध्यमातून म्हणजेच कर्मयोगाचे आचरण करून भक्तीच्या मार्गाने ईश्वराचे सगुण उपसनेतून त्याच्या निर्गुण निरकाराची साधना करणे व ज्ञान मार्गाच्या आचरणाने त्याला जाणून घेणे महत्वाचे असते,,आणि म्हणूनच कर्म

भक्ती उपासना व ज्ञान ह्याची समनव्यात्मक भूमिका की मानवाच्या क्रमविकासाची महत्वाची आहेच,,,हे साधनेचे सोपान चढता चढता साधकाच्या जीवनात येणारा आत्मसाक्षात्काराच्या क्षण ,,व त्याच वेळी त्याचा जिवाभावाचा मृत्यू,,,नाश,,, ही साधनेची परमोच्च अवस्था,,आणि अहं ब्राह्मस्मि ही अनुभूती,,,मग असा जो परिपूर्ण महात्मा आहे त्याची मरण काळी अवस्था काशी असते ह्याचे १७ व्या श्लोकात केलेले वर्णन शब्दश पुढीलप्रमाणे,,,,

''माझे प्राण अविनाशी तत्वात प्रविष्ठ होवो,,नंतर हे शरीर भस्म होवो,,हे ओंकारा मना ,केलेल्या कर्माचे स्मरण कर,,केलेल्या कर्माचे स्मरण कर'''


विस्तृत विवेचन पुढील भागात......

**ओम श्री चिन्मय सद्गुरवे नमः**

# ईश उपनिषद – ५३

हरिओम,,साधकाच्या जीवभाव आत्मतत्वाची अनुभूती घेतो व ते तत्व मीच आहे ही ती अनुभूती आहे,,,ही अनुभूती येते तेव्हा साधकाच्या जिवाभावाचा शेवट झाला असतो,,,मग त्याचे त्याच्या स्वतः च्या मृत्यूकडे पाहण्याचा दृष्टिकोन कसा असतो??स्वतः चे शरीर स्वतःचे कुटुंब पैसा मन बुद्धी इ कडे पाहण्याची त्याची दृष्टी कशी असेल ह्याचे सुंदर वर्णन ऋषींनी ह्या ठिकाणी केले आहे,,,

हा साधक मृत्यू चे अतिशय आनंदाने स्वागत करतो,,त्याचे मृत्यू हा




आनंद सोहळा बनतो,,,,त्याचा मृत्यू हा देहाचा आहे पण ज्या आत्मतत्वाची अनुभूती त्याने घेतली आहे ते तत्व अमर तत्व आहे,,आणि म्हणूनच त्याचा मृत्यू हा त्याच्या अमरत्व चा शुभारंभ असतो,,मृत्यू हा मंगलमय असतो,,,केवळ जुने वस्त्र बद्दलविण्याचा सोहळा,,,जिवाभावाचे त्याचे मरण तर त्यानेच स्वतः पाहिलेले असते,,,,आपुले मरण पाहिले म्या डोळा,,,ही अनुभूती त्यांची असते,,,त्यामुळे कोणते शरीर कोणत मन,,ते तर केव्हाच लय पावले आणि ब्राह्मलिन झाले,,,आता जी आहे ती केवळ उपाधी,,,आणि ही पण उपाधी चा त्याग त्यांनी केव्हाच केलेला असतो,,,

आता फक्त हाच आरव असतो की त्याचे प्राण हे वायुतत्वाशी एकरूप होवो,,आणि त्याचे शरीर जेथून त्याने प्राप्त केले त्या पृथ्वी तत्वाशी ते एकरूप होवो,,,ज्या पंचतत्वपासून मानवी स्थूल शरीर मिळाले आहे ते त्याच पंचतत्वाला समर्पित होवो ही भूमिका त्याची असते,,,

त्याच्या सूक्ष्म देहाबाबत चा विचार केल्यास त्याचा जो आत्मसाक्षात्काराच्या क्षण असतो त्याचेच स्मरण होवो ही त्याची त्याच्या अंतकरणाला आदेश असतो,,ती परम अनुभूतीचा त्याला स्मरण व्हावे हाच त्यांचा आरव असतो,,,ह्याच साठी केला अट्टाहास,,,शेवटचा दिस गोड व्हावा,,,

हा शेवटचा क्षण ज्याला साधता आला त्याचा मृत्यू सोहळा हा दुःखाचा होईलच कसा??आणि अशा साक्षात्कारी चा मृत्यू झाला ते अपणातून निघून गेले हे मानायचेच कसे?? तो तर त्यांच्या अमृतत्वाचा शुभारंभ आहे,,,साधना करायची ती याचसाठी,,,जगताचे परिवर्तनशील स्वरूप जाणयचे,त्याचे क्षण भंगुरुत्व जाणयचे,,त्यापासून मिळणारे दुःख जाणून घ्यायचे त्यावर मात करायचे,,सुखाचे क्षणाचाही क्षण भंगुरुत्व जाणयचे आणि सुख दुःखातीत होण्यासाठी प्रयत्न करायचा व अखंड आनंदाची अनुभूती घ्यायची,,,


ह्या श्लोकांच्या शेवटी जी प्रार्थना आहे त्याचा आशय हाच आहे की आत्मसक्षत्काराच्या ह्या क्षणाचे स्मरण कर,,,जेव्हा अंतिम काळ येतो अंतिम क्षण येतो तेव्हा नेमकी आठवण कशाची यावी ह्याचे सुंदर मार्गदर्शन ह्याठिकाणी आहे,,,आपले उत्कट अनुभव आपल्याला शेवटच्या क्षणी आठवतात,,,मग ह्या उत्कट क्षणात परम उत्कट क्षण कोणता???तोच हा आत्मसाक्षात्काराच्या क्षण,,,

:::::मित्रानो आता आपण ईश उपनिषदाच्या अगदी अंतिम टप्प्यावर पोहोचलो आहोत ,,,,पुढील भागात,,,,,

# ईश उपनिषद – ५४

ईश उपनिषदाच्या ह्या सातव्या तरंगात १८ वा श्लोकाचा शब्दशः अर्थ

‘‘हे अग्निदेवते,आम्हाला धनाप्रत कल्याण मार्गाने ने,,हे देवा,तू सर्व कर्माला जाणणारा आहेस,,आमच्या मार्गातील प्रतिबंध,ते सर्व पाप तू दूर कर,,आम्ही आपणाला वारंवार विन्य पूर्वक सादर प्रणाम करतो,,,




हा उपनिषदाचा उपसहरात्मक श्लोक आहे,,वेद काळात अग्नी ही देवता होती म्हणून अग्नी देवतेला गुरू आणि शिष्याने केलेली ही प्रार्थना होय,,,

आम्हाला धनाप्रत ने:::ह्याठिकाणी धन ह्याचा अर्थ पैसे भौतिक संपत्ती नाही तर गुणांची संपत्ती आहे,,आणि हे गुण प्रामुख्याने परम शांती,मुक्ती हे आहेत आणि ह्या संपत्तीतून आम्हास परम सुख प्राप्त व्हावे ही उदात्त प्रार्थना ह्या ठिकाणी केलेली आहे,,,

तू सर्व कर्माने जाणणारा आहेस,,,कर्माचा तूच मूलस्रोत आहे,,,त्यामुळे माझ्या कर्मातील प्रतिबंध म्हणजेच माझ्या कर्मात कोणताही स्वार्थी भाव येऊ देऊ नकोस,,माझे प्रत्येक कर्म ईश्वरार्पण बुद्धीनेच व्हावे,,,‘‘तुझे कारणी देह माझा पडावा‘‘,,,ईदम न मम हा भाव प्रत्येक कर्माच्या मागे असावा,,ही कर्मातील यज्ञभाव आमचा असावा,,मग ते कर्म कोणतेही असो,,,

आमचे संपूर्ण जीवनच आम्ही समर्पित करीत आहोत,,आम्ही आपल्याला प्रणाम करतो,,,किती उदात्त प्रार्थना आहे,,,किती उत्कट भाव आहे हा,,

आपल्यातील सर्वोत्कृष्ठतेची समर्पण ईश्वराला करणे हा खऱ्या अर्थाने केलेला प्रणाम होय,,,मन बुद्धी सहित ईश्वराप्रति समर्पण भाव हीच तर नमस्काराची मुद्रा आहे,,,भाव महत्वाचा,,,,

ह्या उपनिषदात आपण एकूण सात तरंगाचा अभ्यास केला ,,,आणि ह्या सात तरंगातून आत्मज्ञानाची सोपान आपण चढलो,,,हा मार्ग चालताना प्रत्यक्ष गुरूंनी सांगितलेल्या मार्गावरून आपण जाण्याचा प्रयत्न केला,,,आणि आज आपण सातवा विचार तरंगातून त्या ईश्वराला प्रार्थना केली,

,ह्या ठिकाणी हे उपनिषद संपत नाही,,कारण साधनेला शेवट नसतो,,,म्हणून ह्या उपनिषदातील पहिला श्लोक पुन्हा म्हणूया व साधनेच्या क्षेत्रात अजून अग्रेसर होऊ या

ईशा वास्यम ईदम सर्वम,,यत्किंच जगत्याम जगत

तेन त्यकत्येनं भुज्जीथा,मा गृध: कस्य चिडघनम ।।

(संस्कृतमधील चुकांबद्दल क्षमस्व)

**ईदम न मम ....**

**ईदम न मम ....**

**ईदम न मम ....**

# माझी पुस्तके

१) शैक्षणिक चिंतन – विसा बुक्स, नागपूर

२) उद्योन्मुख भारतीय समाजातील शिक्षण, विसा बुक्स, नागपूर

३) शिक्षणोपनिषद् – मंगेश प्रकाशन, नागपूर

४) संस्कारधारा – सुनंदा प्रकाशन, अकोला

५) शंभरी ओलाडतांना –

६) मूल्यशिक्षण – पार्थ प्रकाशन, पूणे

७) दुर्वांकुर – किर्ती प्रकाशन, अकोला.

८) सदाफुली – किर्ती प्रकाशन, अकोला.

९) भज गोविंदम् – किर्ती प्रकाशन, अकोला.

१०) True Love – किर्ती प्रकाशन, अकोला.

११) Problem ? Shoot – किर्ती प्रकाशन, अकोला.

१२) ईशावास्योपनिषद् – किर्ती प्रकाशन, अकोला.



# प.पू. गुरुदेव स्वामी चिन्मयानंद ह्यांचे चरणी

**डॉ. वसुधा विनोद देव**